# माणूस

शनिवार । २८ मे १९७७ । ७५ पैसे

यशवंतराव चव्हाण
आणि
वि. स. पागे
यांचा प्रबंध

बी. पी. सी. सी. / एम्. पी. सी. सी. /
आणि आता
नवी पी. पी. सी. सी.
( पै पाहुणा कॉंग्रेस समिती )

मुंबईच्या
महाराष्ट्र कॉंग्रेस शिबिरात
' माहितगार '

# साप्ताहिक माणूस

वर्ष सोळा–अंक बावन्नावा

२८ मे १९७७

मूल्य पंचाहत्तर पैसे



संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे


वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४३४५९


## महाराष्ट्र काँग्रेसचे शिबिर

# वि. स. पागे यांचा प्रबंध का जाळण्यात आला ?

माहीतगार

काँग्रेसच्या पराभवानंतर व महाराष्ट्रात नेतृत्व बदल झाल्यावर महाराष्ट्र काँग्रेसचे शिबिर १२ व १३ मे रोजी मुंबईत भरले. यशवंतराव चव्हाण यांनी शिबिराचे उद्घाटन केले. मनमोकळी चर्चा व्हावी हा शिबिराचा हेतू असतो. तो बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाला. चर्चा मोकळी झाली; पण त्यातून व्यक्त झालेल्या विचाराची अंमलबजावणी होणार का, हा प्रश्न आहे. जे मतप्रवाह व्यक्त झाले ते पाहता कार्यकर्त्यांचे विचार अंमलात आणणे महाराष्ट्र काँग्रेसला शक्य होणार नाही. 'वसंतदादा पाटील यांचे मंत्रिमंडळ फार मोठे आहे. ते पंचवीस टक्क्यांनी कमी करावे. मंत्रिमंडळातील बरेच मंत्री भ्रष्ट आहेत. ह्यांना काढून स्वच्छ मंत्रिमंडळाचा चेहरा होईल असे ते बनवावे. मंत्रिमंडळात आपल्याच पै–पाहुण्यांना घुसवले आहे. मंत्रिमंडळात त्याच त्याच चेहऱ्याचे ठोकळे आहेत. त्याग–सेवा यांचा सुतरामही संबंध नाही, अशांना पदाधिकारी बनवले आहे,' ही टीकेची सूत्रे होती. हे विचार लक्षात घेऊन त्या दिशेने अंमलबजावणी करावयाची म्हटले तर अनेकांना मंत्रिमंडळातून वगळावे लागेल. त्याला मुख्यमंत्री वसंतराव पाटील यांची तयारी नाही. प्रमुख नेत्यांच्या भाषणात एकमेकांना काटशह देऊन, उपहासाने बोलून नेतेच नेत्यांविरुद्ध टीका करत होते. यामुळेच चव्हाण यांनी या शिबिरात झालेल्या भाषणाचा सूर जिल्हा पातळीवर होणाऱ्या शिबिरात लावू नका. तो लावाल तर पक्षबांधणीचे काम होणार नाही, असा इशारा दिला.

शिबिरापुढे यशवंतरावांनी उद्घाटनाचे भाषण केले ते पराभूत सेनापतीने सैरावैरा पळताना सैन्याला थोपवून धरण्यासाठी भाषण करावे, ह्या थाटाचे झाले. काँग्रेस पक्षातून जनता पक्षात जाणाऱ्यांना रोखण्याचा उपाय म्हणून शिबिराचे प्रयोजन केले होते. 'काँग्रेसचा त्याग केला जाऊ नये म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी जनता पक्ष म्हणजे जनसंघच कसा आहे हे कार्यकर्त्यांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न केला. ब्रिजमधील खेळाचा नियम सांगून यशवंतराव म्हणाले, 'कोणता पत्ता टाकावा असा संभ्रम होतो, तेव्हा हुकमाचा पत्ता टाकावा असा नियम ब्रिजमध्ये आहे. आता आपल्यापुढे शंका आली आहे. तेव्हा मूलभूत धोरणाच्या हुकमाचा पत्ता टाका.' काँग्रेसजनांच्या दृष्टीने आज 'मूलभूत धोरण' कोणते असेल तर ते सत्ता! उत्तर भारतातून सत्ता जाणार हे स्पष्ट झाले आहे. केंद्रातील सत्ता

गेलीच आहे यामुळे महाराष्ट्रातील काँग्रेसजन व त्यांचे नेते अस्वस्थ झाले आहेत. शिवाय यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाविरुद्ध उभा राहिलेला शंकरराव चव्हाण यांचा गटही या नेत्यांना अस्वस्थ करून सोडत आहे **काँग्रेसमधून हा गट बाहेर पडल्याशिवाय राहात नाही.** शंकररावांनी काढून दादांना मुख्यमंत्री करण्यासाठी सध्या गोळा करण्यात पुढे असलेले काहीजणही काँग्रेस सोडणार आहेत. यामुळे महाराष्ट्र काँग्रेसचे भवितव्य धोक्यात आले आहे. शंकरराव चव्हाण व त्यांचा गट यशवंतराव चव्हाणांना सध्या डोकेदुखी झाला आहे. शिबिरात शंकरराव पत्रकारांकरता राखून ठेवलेल्या जागेवर बसले होते. त्यांना व्यासपीठावर बोलवा असे यशवंतरावांनी मुख्यमंत्री दादांना सांगितले. दादा शंकररावांजवळ गेले व व्यासपीठावर बसण्याबद्दल विनवू लागले. शंकररावांनी ते मानले नाही. दादा एकटेच व्यासपीठावर आले. त्यांच्याबरोबर शंकरराव आले नाहीत. तेव्हा शिबिरात एकदम गंभीर वातावरण निर्माण झाले. सर्वांना बरोबर घेऊन जाण्याचे निमित्त करून शंकररावांना मुख्यमंत्रिपदावरून काढले; पण सर्वजण 'बरोबर राहणे' आताच अडचण झाले आहे, याची जाणीव यशवंतरावांना होऊन चुकली आहे. मात्र आता त्यांच्याजवळ कोणताही उपाय राहिलेला नाही.

¤

काँग्रेस सोडू पाहणाऱ्यांना थोपवावे हा यशवंतराव चव्हाण यांचा प्रयत्न असल्यामुळेच त्यांनी उद्घाटनाच्या भाषणात 'पक्षातून कोणी जात असेल तर त्यांना जाऊ द्या,' अशी भूमिका घेऊन चालणार नाही. रागाने, कोणी शंकेने, कोणी विरोधाच्या भावनेने, तर कोणी पुढचा हिशोब म्हणून पक्षातून जाण्याचा विचार करत असले तर त्यांना पक्षातून जाऊ द्या असे न म्हणता, बंधुभावाने त्यांच्याशी वागून ही मंडळी पक्षात कशी राहतील याचा प्रयत्न झाला पाहिजे. विशेषतः महाराष्ट्रात हा प्रयत्न अगत्याने केला पाहिजे,' असे यशवंतराव चव्हाण म्हणाले.

पक्ष सोडू पाहणाऱ्यांनाही यशवंतरावांनी सल्ला दिला. 'मानाचे प्रसंग होते तेव्हा पक्षात आणि पक्ष संकटात असताना पक्ष सोडण्याचा विचार करू नका. पक्षाच्या संकटाच्या काळातही पक्षात राहिले पाहिजे. काँग्रेसमध्ये राहून काँग्रेसच्या निष्ठेने काम केले पाहिजे,' असेही यशवंतरावांनी सांगितले. समजा, शंकरराव चव्हाण गट काँग्रेसमध्ये राहिला आणि त्याने विरोधी कारवाया केल्या तर, पक्ष मजबूत होणार नाही, हे यशवंतरावांना जाणवत असल्यामुळेच त्यांनी 'काँग्रेसमध्ये राहून काँग्रेसच्या निष्ठेने काय केले पाहिजे,' यावर भर दिला आहे. देशाच्या अन्य भागात काँग्रेसची वाताहत होऊ लागली आहे. अशा काळात महाराष्ट्रात काँग्रेसला तिच्यापासून वाचवावे. डोंगरावरून घसरत खाली चाललेला माणूस वाळक्या गवताच्या बुडख्याचाही आधार घेऊन घसरगुंडीतून वाचण्याचा प्रयत्न करतो. तसाच यशवंतराव चव्हाण यांचा हा प्रयत्न आहे.

**त्यांचा हा प्रयत्न असल्यामुळेच शिबिरासाठी विधानपरिषदेचे अध्यक्ष वि. स. पागे यांनी लिहिलेला पहिला प्रबंध यशवंतराव चव्हाण यांनी जाळून नष्ट करण्यास सांगितले व सुधारित प्रबंध शिबिरापुढे वाचण्यास सांगितले. पागे यांचा पहिला प्रबंध तुम्ही तरी कसा मान्य केलात असे यशवंतरावांनी मुख्यमंत्री वसंतरावदादा पाटील यांना विचारले. पागे यांनी आपल्या पहिल्या प्रबंधात 'ज्यांना काँग्रेसमधून बाहेर पडावयाचे असेल तर त्यांनी खुशाल जावे. इतकेच नव्हे तर, जे पक्ष सोडण्याचा विचार करत आहेत, परंतु प्रत्यक्षात बाहेर जात नाहीत, अशांना पक्षातून काढून टाकावे' असा परिच्छेद घातला होता.**

शिबिराला हजर राहण्यासाठी यशवंतराव मुंबईला आले; पण रात्री उशीरा आले. वि. स. पागे यांचा प्रबंध दादा–नाईक–पागे आदी मंडळींनी छापण्यास दिला होता. शिबिरात पागे–प्रबंधाच्या छापील प्रती दिल्या जाणार होत्या. रात्री आल्यावर यशवंतरावांनी प्रबंधाची छापील प्रत वाचली. तेव्हा त्यांना पक्षातून जाण्याचा विचार करत असतील त्यांना खुशाल जाऊ द्यावे, वगैरे मजकूर पसंत पडला नाही. प्रबंधातील हा सर्व मजकूर काढून टाका, असे त्यांनी सांगितले. प्रबंध छापून तयार झाला होता. त्यामुळे, नेमका नको असलेला भाग काढून टाकणे अवघड होते. या प्रती जाळून नष्ट करा, असा सल्ला यशवंतरावांनी दिला. त्यामुळे छापलेला प्रबंध जाळावा लागला. चुकून एखादी प्रतही कोणाच्या हातात पडू नये म्हणून, प्रबंध जाळून नष्ट करावा असे यशवंतराव म्हणाले. ही घटना घडल्यामुळेच वि. स. पागे यांनी आपला प्रबंध वाचून दाखवला त्यावेळी कार्यकर्त्यांच्या हातात प्रबंधाची प्रत पडली नव्हती. प्रबंधाची सायक्लोस्टाईल प्रत १२ मे रोजी दुपारी ३ वाजल्यानंतर वाटली गेली. शिबिर घेण्याचे ठरले व पंधरा दिवस आधी ते जाहीर करण्यात आले, तेव्हाच पागे यांचा प्रबंध शिबिरापुढे ठेवला जाईल, असे सांगण्यात आले होते. पागे यांना प्रबंध तयार करण्यास वेळ मिळाला नाही, घाईघाईत तो सादर केला, असे कारणही सांगता येणार नाही. इतका कालावधी मिळालेला असतानाही प्रबंध वाचण्यात आला तेव्हाच कार्यकर्त्यांना तो का देण्यात आला नाही, याचे कारण रातोरात तो नष्ट करावा लागला, हे आहे. रात्री उशीरा यशवंतरावांनी मूळ प्रबंध वाचला. तो जाळण्याची सूचना केली. प्रबंधात दुरुस्ती करण्यात आली. दुरुस्त प्रबंध होऊन त्याचे सायक्लोस्टाईल करण्यासाठी रात्र अपुरी पडली, म्हणूनच १२ मे रोजी सकाळी प्रबंधाच्या प्रती तयार झाल्या नाहीत. दुरुस्त प्रबंधाची हस्तलिखित प्रतच पागे यांना वाचून दाखवावी लागली! पहिलाच प्रबंध वाचला गेला असता तर, महाराष्ट्राच्या काँग्रेसची दोन शकले शिबिरातच पाहण्यास मिळाली असती! यशवंतरावांनी हा प्रसंग तूर्त तरी टाळला आहे. पण हा प्रसंग कायमचा टळला, असे मात्र नव्हे. एक गट बाहेर पडण्याचा काळ थोडा लांबला एवढेच! बाहेर पडणाऱ्या गटाला जास्तीत जास्त लोक बरोबर घेऊन पडावयाचे असल्याने बाहेर पडण्याचा काळ लांबला आहे; पण तो फार लांबला जाणार नाही.

¤

शंकरराव चव्हाण यांची उमेदवारांची निवड चुकली, त्यांचे वागणे व त्यांची धोरणे यामुळे महाराष्ट्रात काँग्रेसचा पराभव झाला, असे यशवंतराव चव्हाण गटाचे म्हणणे होते. म्हणूनच मुख्यमंत्रिपदा-

वरून शंकरराव चव्हाण यांची उचलबांगडी करण्यात आली. महाराष्ट्र काँग्रेसच्या शिबिरात जी भाषणे झाली, त्यामध्ये शंकररावांविरुद्ध टीकेची झोड उठेल, असे कार्यकर्ते मानत होते. पण झाले नेमके उलटे !

काहींनी इंदिरा गांधी, संजय गांधी आदींच्यावर टीका केली. शंकररावांविरुद्ध राज्यातील पराभवाबाबत कोणीही टीका केली नाही. मात्र टीकेचे लक्ष्य बहुसंख्य कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री वसंतराव दादा पाटील यांनाच केले होते. त्यांच्या खालोखाल वसंतराव नाइकांवर हल्ला झाला.

कार्यकर्त्यांनीच नव्हे तर खुद्द वि. स. पागे यांनीही दादांना कोपरखळी मारली. श्रोते–कार्यकर्ते यांच्याकडे न पाहता व्यासपीठावर बसलेल्या नेत्यांकडे पागे पाहत म्हणाले,

'राजकारण कोणाला सोडता येत नाही. राजकारण सुटत नाही. राजकारणात हाताला काही लागत नाही, त्यावेळी राजकारण सोडायचे व हाताला काही लागते आहे असे दिसताच राजकारणात यायचे याला राजकारण सोडले असे म्हणता येत नाही.' पागे यांचे हे विधान वसंतरावदादा पाटील यांच्या अंतःकरणाला बरीच घरे पाडून गेले असावे, असे जाणण्याइतका दादांचा चेहरा पडला होता.

पागे यांनी दादांनाच कोपरखळ्या मारल्या असे नव्हे, यशवंतराव चव्हाण यांनाही त्यांनी त्या मारल्या. 'जनता पक्षाजवळ कार्यक्रम नाही, काँग्रेसने राज्यात राष्ट्रपती राजवट आणली. पण एकदम नऊ राज्यात राष्ट्रपती राजवट आणली नव्हती' असे यशवंतराव चव्हाण म्हणाले होते. त्यावर पागे म्हणाले, 'जनता पक्षाजवळ कार्यक्रम आहे. दहा वर्षांत बेकारी घालवू असे जनता पक्षाने जाहीर केले आहे. दहा वर्षात बेकारी घालवणे सोपे नाही. तो कार्यक्रम त्यांनी घेतला आहे. फार तर तुम्ही म्हणा, हे दहा वर्षांत होणार नाही. जनता पक्षाला दहा वर्षे सत्ता हवी आहे असे म्हणा. पण त्यांच्याजवळ कार्यक्रम नाही असे म्हणता येणार नाही !' राष्ट्रपती राजवटीबाबत यशवंतरावांनी उल्लेख केला त्याविषयी श्री. पागे म्हणाले, 'राज्यात राष्ट्रपती राजवट आणण्याच्या बाबतीत काँग्रेस व जनता पक्ष यांची तुलना करू नका. कारण ती बरोबर नाही. दोघेही सारखेच आहेत त्याबाबतीत ! फरक असलाच तर घाऊक व किरकोळ या स्वरूपाचा फरक म्हणावा लागेल. काँग्रेसने एकेक राज्यात राष्ट्रपती राजवट आणली म्हणून तिला रिटेल – किरकोळ म्हणा ! आणि जनता पक्षाने एकदम नऊ राज्यांत राष्ट्रपती राजवट आणली म्हणून त्या पक्षाला होलसेलर – घाऊक म्हणा !' पागे यांनी यशवंतरावांचे खोडून काढता येईल तेवढे मुद्दे शिबिरात खोडून काढले. यशवंतरावांनी पागे यांचा प्रबंध बदलला म्हणून तर यशवंतरावांविरुद्ध पागे बोलले नसतील ?

¤

वसंतरावदादा पाटील व वसंतराव नाईक यांच्याविरुद्ध चांगल्याच तोफा डागण्यात आल्या. दादांच्या मंत्रिमंडळात भ्रष्ट झालेले काही मंत्री आहेत, असा आरोप अनेकांनी केलाच, पण अर्थमंत्री यशवंतराव मोहिते यांनीही मंत्रिमंडळाच्या रचनेविरुद्ध टीकेची झोड उठवली. एका मंत्र्याने मुख्यमंत्र्याविरुद्ध जाहीरपणे आवाज उठवण्याचे महाराष्ट्रात मोरारजी – भाऊसाहेब हिरे यांच्यानंतरचे हे पहिलेच उदाहरण म्हणावे लागेल सध्याच्या मंत्रिमंडळात आपलेच पै – पाहुणे घुसवण्यात आले आहेत, असे श्री. मोहिते म्हणाले. माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी आपले नातेवाईक उत्तमराव राठोड, शंकरराव गुरव, पुतणे सुधाकर नाईक यांची वर्णी मंत्रिमंडळात लावली. त्यामुळे दादा – नाईक यांच्याविरुद्ध मोहिते बोलले. पै–पाहुण्यांची वर्णी लावली गेल्यामुळे बी. पी. सी. सी व एम. पी. सी. सी. चे विलीनीकरण होईल पण पी. पी. सी. सी चे काय? पी. पी. सी. सी. आहे तोपर्यंत काँग्रेस महाराष्ट्रात नीट राहणार नाही असे कार्यकर्ते म्हणतात. **पी. पी. सी. सी. म्हणजे काय ? तर पै–पाहुणे काँग्रेस कमिटी ! शंकरराव चव्हाण यांचे नाव न घेता मोहिते असेही म्हणाले की, पै – पाहुण्यांचे राजकारण केले म्हणून पहिल्याला घालवले. पण पुनः तेच करायचे होते तर दुसऱ्याची काय गरज होती ?**

**श्री. मोहिते यांनी नेतृत्वाविरुद्ध संतापाने आवाज उठवला. 'पक्षांतर्गत लोकशाहीबद्दल या शिबिरात बरेच बोलले गेले. पण पक्ष कोणत्या पद्धतीने चालणार ? पक्षांतर्गत लोकशाही राबवणार कशी ? आजची पक्षांतर्गत लोकशाही व्यवस्थापकीय लोकशाही (मॅनेजरियल डेमॉक्रसी) आहे. चार लोकांनी काय ते ठरवायचे आणि पक्षाने मानायचे, याला पक्षांतर्गत लोकशाही म्हणता येणार नाही. मॅनेजरियल लोकशाही पक्षाचा कबजा घेऊन काम करत असली तर ती लोकशाही नव्हे. माझी मते मी मांडण्याचा प्रयत्न केला आणि त्या मताप्रमाणे कार्यकर्ते घडवण्याचा किंवा पक्षात माझ्या मतांचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला तर माझे राजकीय भवितव्य काय राहणार ? असा प्रयत्न केल्यावरही माझे राजकीय भवितव्य धोक्यात येणार नाही, अशी लोकशाही पक्षात राहणार काय ?' असे प्रश्न श्री. मोहिते यांनी उपस्थित केले व नेतृत्व कशी दादागिरी करत आहे, हे दाखवून दिले.**

पक्षात खरी लोकशाही नाही. व्यवस्थापकीय लोकशाहीमार्फत काही लोकच महाराष्ट्र काँग्रेस चालवत आहेत. पै–पाहुण्यांचे राजकारण महाराष्ट्र काँग्रेसचे नेते करत आहेत, ही कारणे पुढे करून श्री. मोहिते यांनी काँग्रेस सोडण्याचा निर्णय घेतला तर आश्चर्य वाटायचे कारण नाही. ही घटना अनेक गोष्टींवर अवलंबून आहे. काँग्रेस नेतृत्वावर नाराज झालेले पक्षाच्या बाहेर पडून त्यांनी पर्यायी काँग्रेस स्थापन केली किंवा शेतकरी कामगार पक्षाचा जोर वाढण्याची शक्यता निर्माण झाली तर श्री. मोहिते यांच्या बाबतीत पक्षत्यागाची गोष्ट घडेल. काँग्रेसमधून बाहेर पडून जनता किंवा शे. का. पक्षात जाण्याऐवजी पर्यायी काँग्रेस पक्ष काढावा असा विचार काही काँग्रेस नेते करत आहेत. 'सत्ता घेणारा दुसरा राजकीय पक्ष नसल्यामुळे काँग्रेस पक्ष सोडणे अर्थशून्य ठरेल,' असेही श्री. मोहिते म्हणाले आहेत. केंद्रात अथवा राज्यात सत्ता काबीज करणारा दुसरा पक्ष निर्माण होताच मोहिते आजच्या विकलांग काँग्रेसमध्ये राहतील

पृष्ठ ३१ वर

# अवती-भवती

शरद कृष्णन्

## □ राजाश्रय लाभलेला योगी....

जनता सरकारने ज्या चार मंडळींचे परदेश-परवाने रद्द केले, त्यांपैकी ज्याच्याबद्दल सगळ्यात कमी माहिती आहे, अशी व्यक्ती म्हणजे धिरेंद्र ब्रह्मचारी. हे साहेबदस्तूर आले कोठून ? उद्योग काय करतात ? बघता बघता त्यांनी एवढी अवाढव्य संपत्ती गोळा कशी केली ? हे सारे प्रश्न लोकांच्या मनामध्ये नव्हते, असातला भाग नाही. तथापि बोलणार कोण ? एक तर योगीमहाराजांच्या आगेमागे संजय गांधी ! आणि कोणी बोलायला धजावलाच तर वर कोसळती आणीबाणीची कुऱ्हाड. त्यामुळे चिरंजीव संजयने जयबाबा म्हटलं की, अवती-भवतीच्या मंडळींनी त्याहून जोरात सूर लावायचा...बाबा की जय !! असा हा सगळा मामला. या राजाश्रित योग्याबद्दलच्या प्रश्नांना उत्तरे देण्याचे काम कलकत्त्याच्या अमृत-बझार पत्रिकेने केले आहे. कै. शास्त्रीजींनी जवळजवळ हाकलून काढलेल्या या बाबांना इंदिराबाईंच्या जमान्यामध्ये राजाश्रय मिळाला आणि बघता बघता महाराजांचे तेज आणि कीर्ती चारही दिशांना फाकली.

या योगीमहाराजांचे नाव काय ? त्यांचे वाडवडील काय करत होते ? स्वत: योगीमहाराज तर ब्र काढत नाहीत. त्यांच्या संदर्भातील एकमेव अधिकृत माहितीपत्रक म्हणजे त्यांचा परदेश-परवाना. हा परवाना सांगतो की, बाबांचा जन्म १९२५ सालचा. म्हणजेच त्यांची सध्याची उमर बावन्न वर्षांची. परंतु आजूबाजूचे चमचे सांगत असतात, महाराज आहेत सत्तरीचे, पण दिसतात कसे पाहा पन्नास वर्षांचे. आता पन्नास वर्षांचा बाबा पन्नास वर्षांचा दिसणार नाहीतर कसा दिसणार ? पण त्याचेही असले थापा मारून कौतुक. परदेश-परवाना पुढे असेही सांगतो की, महाराजांचा जन्म बिहार-मधील दरभंगा येथील. परवान्यावर नाव योगी धिरेंद्र ब्रह्मचारी असेच. म्हणजे आडनावाचा पत्ताच नाही. आणि तरीही योगीबाबांना परवाना द्यावा, अशी शिफारस त्या वेळच्या पंतप्रधानांच्या सचिवालयातील संयुक्त सचिव श्री. बेहल यांनी केली. आणीबाणीच्या काळात ज्यांच्यावर शासन प्रसन्न होते अशा अधिकाऱ्यांपैकीच हे बेहलमहाराज. पुढे नॅशनल टेक्स्टाईल कॉर्पोरेशनचे अध्यक्ष म्हणून त्यांची वर्णी लागली आणि नव्या मंत्रिमंडळातील उद्योगमंत्री नामदार मोहन धारिया यांनी कार्यमुक्त करीपर्यंत ते याच स्थानावर काम करत होते. धिरेंद्रबाबांचे दोन भाऊ आहेत, त्यांपैकी एक महाराजांच्या योगाश्रमातच काम करतात. हे गृहस्थ ज्या अर्थी शर्मा हे आडनाव लावतात त्या अर्थी महाराजांचे आडनावही शर्माच असले पाहिजे.

योगी धिरेंद्रबाबू पूर्वायुष्याबद्दल फारसे तपशीलवार बोलत नाहीत. स्थळाकाळाचा तपशील विचारला की चिडचिड करतात. त्यांच्या-संबंधी बारीक चौकशी केली असता असे समजले की, महाराजांनी रेल्वे खात्यामध्ये काही काळ नोकरी केलेली आहे. स्वत: योगी हे कधीच कबूल करत नाहीत. स्वत:संबंधी ते सांगतात ते एवढेच की, वयाच्या १४ व्या वर्षी त्यांनी घर सोडले आणि सुमारे तीस वर्षांपूर्वी लखनौ येथे पहिला योगाश्रम स्थापन केला. लखनौमधील आश्रमाची नेमकी जागा आणि आश्रम स्थापनेचे नेमके वर्ष यांचा तपशील महाराज देत नाहीत. त्यानंतर त्यांनी हिमालयामध्ये पदयात्रा केली आणि एका गुरूकडे योगाचे शिक्षण घेतले. सुमारे वीस वर्षांपूर्वी योगीमहाराज दिल्लीमध्ये आले. ज्ञानाचा प्रकाश सोडला तर ऐहिक मालमत्ता जवळ जवळ नव्हतीच आणि आज वर्षांनंतर, महाराजांचा दिल्लीमध्ये अगदी मध्यवर्ती ठिकाणी आश्रम आहे. येणाऱ्या पाहुण्यांची व्यवस्थित सरबराई व्हावी म्हणून अद्ययावत पद्धतीचे बांधकाम असलेले एक सोळा खोल्यांचे अतिथिगृह आहे. येणाऱ्या अतिथींकडून दररोज साठ ते शंभर रुपये भाडे गोळा केले जाते. या अतिथिगृहाच्या वापराबद्दल अनेक सुरस आणि चमत्कारिक कथा ऐकू येतात. याखेरीज विष्णुदेवी हिल्सजवळ योगाचे शिक्षण देणारे एक केंद्र आहे व जम्मू येथे आणखी एक योगाभ्यास केंद्र आहे.

स्वामींची ही सारी भरभराट गेल्या बारा वर्षांमधील आहे. त्यातही संजयबरोबर त्यांचे सूत जमल्यापासून त्यांच्या उत्कर्षकालाला एक वेगळीच गती आलेली दिसते. योगीबाबांचा देशांतर्गत प्रवास सुरक्षित व त्वरित व्हावा म्हणून त्यांना एरोस्पटाईल कंपनीने एक छोटे विमान भेट दिले आहे. केवळ योगायोगाची गोष्ट म्हणजे याच कंपनीकडून इंडियन एअर लाइन्सने एअर बसेस विकत घेतल्या आहेत. दुसऱ्या आणि तिसऱ्या बससंबंधीचा व्यवहार चालू असताना कंपनीने उदार होऊन स्वामीजींना वर उल्लेखिलेले विमान भेट म्हणून दिले आहे. ही भेट देणे सोयिस्कर व्हावे म्हणून कस्टम खात्याने सारे नियम धाब्यावर बसवले आणि डिकीचा कर वसूल न करता हे विमान योगीमहाराजांपर्यंत पोचवले. याच पद्धतीने तीन वर्षांपूर्वी योगी धिरेंद्रबाबूंसाठी टोयोटा गाडीही आणण्यात आली.

१९६७ साली रोल्सराईस कंपनीमधील आपले शिक्षण अर्धवट टाकून संजय गांधी स्वदेशी आल्यावर त्यांचे आणि महाराजांचे मेत-कूट जमले आणि १९६९ साली महाराजांना योगाश्रमासाठी जमीन मिळाली. शिफारस केली होती त्या वेळच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी. त्यानंतर लगोलग पुढील वर्षी हरियानाच्या बन्सीलालने चिरंजीव संजयला मारुतीचा खेळ मांडण्यासाठी दोन कोटी रुपये किमतीची जमीन केवळ ३५ लक्ष रुपयांमध्ये देऊन टाकली. संजयचे आश्रमातील जाणेयेणे वाढल्यावर कोणा छायाचित्रकाराने आश्रमाच्या परिसरामध्ये उभ्या असलेल्या गाड्यांचे छायाचित्र घेण्याचा प्रयत्न

केला मात्र, त्याला अशी बेदम मारहाण करण्यात आली की, ज्याचे नाव ते. त्या वेळेपासून दोघांनी हातात हात घालूनच काम केले. दिल्लीच्या पंचतारांकित निवासस्थानामध्ये या दोघांना अनेकांनी एकत्र पाहिले. पुढे योगीमहाराज अमेठी मतदारसंघामध्ये चक्क प्रचार करतच हिंडू लागले.

## मदतीचा वर्षाव

योगीमहाराजांचे सरकारदरबारी वजन जसजसे वाढू लागले, तसतसा मदतीचा ओघही वाढता राहिला. केंद्रशासनाच्या शिक्षण-खात्याकडून वीस हजार रुपये मिळाल्यावर योगीमहाराजांनी एकदम चार लक्ष रुपयांची मागणी केली. योगकेंद्र प्रस्थापित करण्यासाठी आपल्याला या रकमेची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. ही भलतीच मागणी त्या वेळी शिक्षण खाते सांभाळणाऱ्या डॉक्टर के. एल. श्रीमाळी यांनी धुडकावून लावली. पुढे शास्त्रीजींच्या जमान्यामध्ये योगीमहाराजांच्या संस्थेकडे असलेली जंतर-मंतर विभागातील छोटी जागाही काढून घेण्यात आली. इंदिराजींच्या जमान्यात शिक्षण-खात्याने योगीमहाराजांचा आगापिछा न पाहता त्यांना चार लक्ष रुपयांचे अनुदान देऊन पुन्हा सुस्थिर केले. दोन एकरांचा एक सुरेखसा प्लॉटही योगीमहाराजांचे बस्तान कायमचे बसावे, या हेतूने अल्प दराने देण्यात आला. पुढे दिल्ली डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनकडून बाजारदर देऊन जागा घेण्याइतपत आर्थिक सुस्थिरता महाराजांना प्राप्त झाली. केंद्रशासनाकडून महाराजांनी गेल्या सात वर्षांमध्ये सव्वीस लक्ष एक्केचाळीस हजार रुपये अनुदान म्हणून घेतले. बरे, मिळालेली रक्कम अनुदान असल्याने परतफेडीचा प्रश्नच नाही. जी दोन एकर जमीन महाराजांना केवळ एक लक्ष पंचवीस हजार रुपयांना विकण्यात आली तिची बाजारभावाची किंमत होती एक कोटी पंचवीस लक्ष रुपये !! म्हणजे सवलतीचे प्रमाण पडले शंभर पट. योगाश्रम ही तशी आटोपशीर संस्था. त्या संस्थेला पडणाऱ्या अनेकविध मर्यादा लक्षात घेऊन या राजाश्रय लाभलेल्या योग्याने एक राष्ट्रीय पातळीवरील योग शिक्षण देणारी संस्था काढण्याचा निर्णय घेतला. योगाचे शिक्षण आणि निसर्गोपचाराचे केंद्र अशी दोन उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवून धिरेंद्रबाबूंनी 'सेंट्रल रिचर्स इन्स्टिटयूट फॉर योगा' नावाची संस्था काढली.

## सेंट्रल रिसर्च इन्स्टिटयूट फॉर योगा

ही संस्था एक रजिस्टर्ड संस्था आहे. रजिस्टर्ड संस्थेची सूत्रे हातात असली म्हणजे पैसे जमविणे सोपे जाते, असे स्वतः योगीच म्हणतात. अर्थातच या संस्थेबाबतचेही अंतिम अधिकार योगी धिरेंद्र ब्रह्मचारी यांच्याकडेच आहेत. योगाच्या पुरातनशास्त्राचा व्यासंग वाढावा यासाठी या संस्थेमध्ये अनेकविध सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. योगशास्त्राचा पुस्तकी आणि प्रात्यक्षिक रूपाने परिचय करून घेण्याची उत्सुकता असलेल्या मंडळींना या संस्थेमध्ये मार्गदर्शन मिळते. योगोपचारांचा जो विभाग संस्थेमध्ये आहे, त्यामध्ये पन्नास खाटांची सोय आहे. अनेक महागडी वैद्यकीय उपकरणेही संस्थेमध्ये आहेत. योगी धिरेंद्र ब्रह्मचारी हे या संस्थेचे संचालक. त्यांच्या अवती-भवती सहकाऱ्यांचे कोंडाळे असते. पण त्यांपैकी एकालाही स्वतंत्र अस्तित्व नाही. योगी धिरेंद्रबाबूंबद्दल काहीही प्रश्न विचारला तर ही मंडळी पळ काढतात. एखाद भारीच पिच्छा पुरवणारा भेटला तर त्याला धिरेंद्रबाबूंसमोर नेऊन उभे करतात. पण स्वतः उत्तर देण्याचे कटाक्षाने टाळतात. या संस्थेच्या उपचार विभागाबद्दल योगीमहाराजांना विचारले असता ते म्हणतात, 'सर्व आधुनिक साधनांचा वापर करून आम्ही रोगाचे निदान करतो. परंतु उपचार मात्र योगशास्त्राच्या आधारे केले जातात. आमच्या या कार्यपद्धतीवर ज्यांचा विश्वास आहे तेच लोक आमच्याकडून उपचार करून घेतात.' आतापर्यंत किती लोकांना उपचार केले ? त्यांपैकी कितीजणांना गुण आला ? येथे दीर्घकाळ राहूनही गुण आला नाही म्हणून इतरत्र जाऊन किती रुग्णांनी उपचार करून घेतले, यासारखे प्रश्न विचारले की, एरवी शांत असलेले योगी एकदम चिडून म्हणतात, 'पाखंडी अगर भरवंसा नही तो आये हो क्यूं ?' विचारणाराला प्रश्न पडतो—यामध्ये मी पाखंडीपणा काय केला बुवा ? अहो महाराज, आपले जे काम आहे ते लोकांसमोर ठेवावे म्हणून मी ही माहिती विचारत आहे. असे सांगितले की, महाराज म्हणतात, 'की ये कोई फिल्म नही की, जिसे प्रचार की जरूरत है. ये एक नेक काम है, और जिन्हे इसकी कदर है वो लोग हमेशा आते रहते है।' आता सरळ प्रश्नांना बगल देऊन महाराज अशी वाकडी वाट तुडवू लागल्यावर त्यांना बोलणार कोण ? विचारणारा बिचारा एकंदर पाणी जोखतो आणि बाहेरचा रस्ता धरतो.

आपला समाज आधीच अंधश्रद्ध. त्यामध्ये हे असले महाराज राजाश्रयाचा आधार घेऊन रुबाब ताणू लागले की, चांगलीच पंचाईत होते. आता या महाराजांचा आश्रम आणि दस्तुरखुद्द महाराज यांच्याबद्दल जनतेच्या मनामध्ये ज्या काही शंका आहेत, त्यांचा निचरा केला जाईल असे आश्वासन शिक्षणमंत्र्यांनी दिले आहे. योगी महाराजांच्या संस्थेची मदत थांबवण्यात आली आहे. गेल्या वीस वर्षांमध्ये या राजाश्रित योग्याने नेमके काय मौलिक संशोधन केले, हे जाणून घेण्याची लोकांना उत्सुकता आहे. दिल्लीमध्ये योगी धिरेंद्र ब्रह्मचारी हे एक बडे प्रकरण होते, आणीबाणीच्या कठोर पर्वामध्ये आणि संजयच्या चलतीच्या जमान्यामध्ये बाबांनी भरपूर पैसा गोळा करून ठेवला. निवडणुकांचे निकाल हाती आल्यावर महाराजांना एकदम वाटू लागले की योगशिक्षणाचे हे मौलिक कार्य परदेशी जाऊन केले पाहिजे. भारतीय संस्कृतीचा हा पारंपारिक वारसा संगती घेऊन मी अमेरिकेला जाणार, असे महाराज उघडपणे म्हणू लागले. महाराज ही काय चीज आहे, हे दिल्लीमध्ये सगळ्यांनाच माहीत होते. महाराजांचे आणि संजयचे साटेलोटेही दिल्लीकरांच्या परिचयाचेच. स्वाभाविकपणेच स्वामी जेव्हा अमेरिकेच्या गोष्टी करू लागले तेव्हा आता हा पलायनाचा प्रयत्न आहे, हे शासनाच्या लक्षात येण्यास वेळ लागला नाही. आणि म्हणूनच संजय–बन्सी–शुक्ला या कुविख्यात त्रिकूटाबरोबरच, भारतीय संस्कृतीचा पारंपरिक वारसा परदेशी नेऊ पाहणाऱ्या स्वामींचे पंख छाटण्याचे काम शासनाला करावे लागले. स्वामी सध्या एकदम नरम आले आहेत. जास्त बोलत नाहीत. वातावरण आपल्याला प्रतिकूल आहे, याची त्यांना जाणीव आहे. जाणकार असे सांगतात की, स्वामी आता खरोखरच योगाचा अभ्यास करतात. □

## □ पिता पुत्रांचा किस्सा

कलकत्याहून प्रसिद्ध होणाऱ्या आनंद बझार पत्रिकेमार्फत 'संडे' नावाचे जे साप्ताहिक प्रकाशित होत असते; त्याने निवडणुकांमध्ये जबर मार खाल्लेल्या कॉंग्रेसवर एक विशेष अंक सादर केला. आता अर्धांग झालेल्या रुग्णासारखी अवस्था असलेल्या 'कॉंग्रेसवर हा जो अंक काढला आहे, त्याच्या मुखपृष्टावर कॉंग्रेस स्वतःचाच विनाश करून घेईल काय ?' असा प्रश्न विचारला असून मुखपृष्ठावर पडत्या कॉंग्रेसला सावरण्याचा प्रयत्न करणाऱ्या यशवंतरावांची तसबिर आहे. याच अंकामध्ये पिता– पुत्रांचा किस्सा म्हणून एक चौकट सादर करण्यात आली आहे. विद्यमान पंतप्रधान मोरारजी देसाई आणि यशवंतराव चव्हाण यांच्या संदर्भामध्ये ही चौकट आहे. भस्मसात झालेल्या कॉंग्रेसच्या राखेतून शक्तिशाली बनून उभे राहण्याचा प्रयत्न जर कोणी करत असेल तर ते यशवंतराव चव्हाण अशी तारीफ करून चव्हाणांचे नव्या लोकसभेमधील पहिले भाषण फार मोठी तारीफ घेऊन गेल्याचेही नमूद करण्यात आले आहे. त्यांच्या या भाषणाची केवळ कॉंग्रेस खासदारांनीच नव्हे तर जनता पक्षाच्याही अनेक खासदारांनी भरपूर तारीफ केली होती. नामदार मोरारजी देसाई आणि खासदार यशवंतराव चव्हाण यांनी दोन विरोधी पक्षांचे नेतृत्व करावे, हा एक विचित्र योगायोग आहे. मोरारजी देसाई यांनीच १९५२ साली ते त्यावेळच्या मुंबई राज्याचे मुख्यमंत्री असताना चव्हाणांना आपल्या मंत्रिमंडळामध्ये घेतले होते.

१९५५ साली संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याने ज्यावेळी उग्र स्वरूप धारण केले होते, त्या वेळी यशवंतरावांनी मोरारजींवर पुण्यामधील एका सभेमध्ये टीका केली होती, त्या संदर्भात मोरारजी आपल्या आत्मचरित्रामध्ये लिहितात– "१९४२ पासून माझे आणि यशवंतरावांचे संबंध जिव्हाळ्याचे होते. अशा स्वरूपाच्या टीकेची मला त्यांच्याकडून मुळीच अपेक्षा नव्हती. त्यामुळे यशवंतरावांनी केलेल्या टीकेमुळे मी व्यथित झालो. तथापि काही दिवसांतच यशवंतरावांना आपली चूक उमगून आली. त्यांनी माझी गाठ घेतली आणि झाल्या प्रकाराबद्दल खेद व्यक्त केला, त्यानंतर आत्मचरित्रात मोरारजीभाईंनी, चव्हाणांनी त्यांना लिहिलेल्या पत्रातील काही भाग उद्धृत केला आहे. 'तुमच्याबद्दल नितांत आदराची भावना असताना तुम्हाला – अडचणीची वाटेल अशी परिस्थिती मी कशी निर्माण करेन ? मी या संबंधात तुमच्याशी बोललोही आहेच. मला हे पण नमूद केलेच पाहिजे की, गेल्या काही वर्षांमधील माझे सार्वजनिक जीवन हे तुम्ही घालून दिलेल्या मार्गानेच आकाराला आले आहे. तुमच्यासारख्यांच्या मार्गदर्शनापासून प्रेरणा घेऊनच आम्हाला अधिक यश संपादन करता येईल." उभा महाराष्ट्र मोरारजीभाईंच्या विरुद्ध खदखदत असताना, एका ठिकाणी दोनचार शब्द वेडेवाकडे बोलले गेल्यावर, त्यामुळे होणारा परिणाम सावरून धरण्यासाठी यशवंतरावांनी त्या कालखंडामध्ये हे जे पत्र लिहिले आहे, ते त्यांच्या स्वभाववैशिष्ट्यांवर प्रकाश टाकणारे आहे. पण झालो एवढी क्षमायाचना पुरेशी नाही असे समजून यशवंतराव पुढे लिहितात– 'मी वर लिहिलेला शब्दन् शब्द खरा आहे, यावर तुम्ही पूर्ण विश्वास ठेवावा. मात्र इतके लिहूनही मी जे काही केले ते योग्य नव्हते, असे आपल्याला वाटत असेल तर आजवर मी जे काही संपादन केले ते सारे बाजूला ठेवून राजकीय रंगमंचावरून निवृत्त होण्यासही मी तयार आहे. पित्याने आपल्या पुत्राला प्रकाश दाखवावा, त्याप्रमाणे अंधकारामध्ये चाचपडणाऱ्या मला आपण मार्गदर्शन करावे, अशी मी आपणाला विनंती करतो.'

अर्थात यशवंतरावजी राजकीय रंगमंचावरून कधीच बाजूला झाले नाहीत. उलट त्यांचे तेज वाढत गेले. आणि पुढे मोरारजी केंद्रीय मंत्रीमंडळामध्ये गेल्यावर यशवंतरावजी प्रथम मुंबई राज्याचे आणि पुढे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. चीनच्या हल्ल्याने देश अस्वस्थ झाला असताना मोरारजींच्या सांगण्यावरूनच जवाहरलालजींनी यशवंतरावांना दिल्लीमध्ये बोलावून घेतले आणि केंद्रीय मंत्रीमंडळामध्ये संरक्षण मंत्री म्हणून त्यांचा समावेश केला. त्यावेळी सध्या जनता सरकारच्या मंत्रीमंडळामध्ये मंत्रीपद भूषवणाऱ्या ओरिसाच्या बिजू पटनाईक यांच्या नावाचाही विचार झाला होता.

कॉंग्रेसमधील यादवीनंतर इंदिराजींना जे यश मिळाले त्यामध्ये जगजीवनराम, मरहूम फकरूद्दिन अली अहमद, आणि यशवंतराव चव्हाण या तिघांचा वाटा फार मोठा होता.

निवडणुकीच्या पूर्वी, आणि निवडणुकीचे एवढे महाभारत झाल्यावरही यशवंतरावांनी बाईंचाच पाठपुरावा केला. कॉंग्रेस अध्यक्षपदासाठी बाईंनी ब्रह्मानंद रेड्डी यांचे नांव पुढे केल्यावर चव्हाणांनी आपले बळ त्यांच्याच पाठिशी उभे केले. पश्चिम बंगालचे सिद्धार्थ शंकर रे यांनी यशवंतरावजींचा खूप अनुनय करून पाहिला परंतु चव्हाण बधले नाहीत. बाईंचे समाधान, आणि संसदेमधील स्वतःच्या स्थानाची सुरक्षितता या दोन्हीसाठी त्यांना ब्रह्मानंदजींना कॉंग्रेस अध्यक्षपदी बसवणे भागच होते. एकेकाळी मोरारजींबरोबर पिताजीचे नाते सांगणारे यशवंतरावजी, व्ही. व्ही. गिरी आणि संजीव रेड्डी यांच्यामध्ये झालेल्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीनंतर पलटी मारून मोरारजींच्या विरोधी गटामध्ये सामील झाले. दुसऱ्या तिसऱ्या क्रमांवर का होईना, सत्तेची फळे चांगली दहा वर्षे चाखली. आज क्रमांक पहिला मिळाला पण बाजू उलटली. दुसऱ्या बाजूला असलेले मोरारजी, आपल्या पहिल्या क्रमांकाच्या आधारे देशाचे पंतप्रधान झाले. तर त्याच क्रमांकावर असलेले यशवंतरावजी विरोधी पक्षाचे नेते ! ! □

## □ बायकोही काही कमी नाही !!

संजय गांधी यांच्याबद्दलच्या सुरस आणि चमत्कारिक कथा इतक्या फैलावल्या आहेत की त्या वाचणाऱ्यालाही त्याच्यामध्ये गोडी वाटेनाशी झाली आहे. आज मी सांगणार आहे ती गोष्ट त्याच्या बायकोची म्हणजेच अर्थात मेनका गांधी यांची. या इरसाल मवाऱ्याच्या या इब्लिस बायकोच्या कारवायांचा हा सारा तपशील नजरेखालून घातल्यावर बायकोही काही कमी नाही असे म्हणावेसे

वाटते. आणीबाणीच्या काळामध्ये नवरा बघता बघता नेता झाला. आणि वर करोडे रुपयेही आणू लागला तेव्हा बाई म्हणाल्या, मी तरी स्वस्थ का बसावे? त्यांनी काढले एक मासिक. मासिकाचे नाव 'सूर्य इंडिया'. सल्लागार संपादक सरदार खुशवंतसिंग आणि सहाय्यक संपादक मेनका गांधी. या मासिकाच्या जाहिरातींचे दर असे—

पूर्ण पान : ४ हजार रुपये.

पूर्ण पान रंगीत : ८ हजार रुपये.

कव्हर आतील बाजू : १० हजार रुपये.

कव्हर बाहेरील बाजू : १२ हजार रुपये.

अंकाची किंमत २॥ रुपये. पहिला अंक निघाला ऑक्टोबर १९७६ मध्ये. पहिल्या अंकापासूनच जाहिरातींचा पाऊस. आतला मजकूर तरी काय, तर वेश्यांच्या रंगीत कथा, हिजडे आणि त्यांच्या कथा. पुढील अंकातूनही मजकूर असाच भडक उथळ. अंकाचे एकंदर स्वरूप पाहून अडीच रुपयाला हा असला अंक घेण्यासाठी मंडळी कांकू करू लागली. अर्थात चिल्लर पोरासोरांमध्ये अंक खपतच राहिला. जाहिराती वाढतच राहिल्या. मार्च ७७—म्हणजे निवडणुका झाल्या त्या महिन्यामध्ये अंकात चक्क २५ पाने जाहिराती होत्या. अधिकृत दराप्रमाणे हिशेब करायचा म्हटला तर केवळ एका अंकाच्या जाहिरातीचेच एक लक्ष अठ्ठेचाळीस हजार रुपये जमा झाले! मोठ्या उद्योग समूहातून निघत असलेल्या आणि पहिल्यापासूनच विक्रीची गती घेणाऱ्या अंकाला दहा पंधरा वर्षांच्या यशस्वी अस्तित्वानंतरही जेवढे यश मिळू शकणार नाही एवढे यश केवळ सात आठ महिन्यात 'सूर्या'ला मिळून गेले. कारण या 'सूर्य-इंडिया'च्या संपादक पदाची सूत्रे होती मेनका गांधी यांच्या हाती आणि मालकांमध्ये होती त्यांच्या माहेरची माणसे. आता पंतप्रधानांच्या सुनेचे मासिक म्हटल्यावर जाहिरातदारांनी तरी हात आखडता का घ्यावा? बरं जाहिरातदारही उगाच असे तसे नाहीत. जाहिरातींबरोबरच पैसे देणारे, अथवा फारच झाले तर आठ पंधरा दिवसांमध्ये पैसे पोचते करणारे. त्यातून एखादा रखडलाच तर एखादे पत्र मेनकाबाईंच्या सहीने गेले की निमूट येऊन खंडणी भरत असे. ज्या मार्चच्या अंकाचा उल्लेख वर केला आहे, त्या अंकामधील २५ पानांपैकी आठ पानांची जाहिरात सार्वजनिक उद्योगधंद्यामार्फत आलेली. म्हणजे पैसे मिळण्याची पूर्ण सुरक्षितता आलीच. अशा बड्या जाहिरातदारांमध्ये पंजाब राज्य विद्युत महामंडळ, स्टेट बँक ऑफ इंडिया, एअर इंडिया, हिंदुस्थान फोटो फिल्म्स, उटकमंड, पंजाब सरकार यासारख्यांच्या जाहिराती आहेत. खाजगी जाहिरातदारांनी ज्या जाहिराती दिल्या आहेत—त्यामागे अंकापेक्षाही अंकाच्या संपादिका मेनका गांधी यांच्या नावाला बिचकून सलाम ठोकण्याची भावना आहे. खाजगी जाहिरातदारांचे एक ठीक आहे. देवाणघेवाण तत्त्व डोळ्यासमोर ठेवून त्यांनी जाहिराती दिल्या. पण ज्या सार्वजनिक उद्योगांसाठी सार्वजनिक पैशाचा वापर केला जातो, त्यांच्यावर असलेली सर्व बंधने झुगारून या जाहिराती दिल्याच कशा? जाहिराती देण्याबाबत जे नियम आहेत, त्यामध्ये एक वर्षाचे अस्तित्व किंवा आकर्षक विक्री यापैकी निदान एकाचा तरी विचार केला जातो. नव्यानेच निघालेल्या एका मासिकाने चार हजार ते बारा हजार असे काहीच्या काही दर ठेवावेत आणि जाहिरातीपासून मिळणाऱ्या फायद्याचा जराही विचार न करता सार्वजनिक उद्योगांमार्फत खुशाल जाहिराती दिल्या जाव्यात, हे आश्चर्यकारक नाही काय? आता मोकळ्या वातावरणामध्ये निदान हे प्रश्न विचारता येतात असे सांगून 'मदर इंडिया'चे बाबुभाई पटेल विचारतात की, 'माहिती आणि नभोवाणी खात्याचे मंत्री लालकृष्ण अडवाणी या संदर्भामध्ये काही करणार आहेत की नाहीत? व्यापारी हेतू साध्य करण्यासाठी पंतप्रधानांच्या मुलाने आपल्या आईच्या सत्तास्थानाचा हत्यारासारखा वापर केला. सूनही त्याच मार्गाने गेली. आता निदान या 'सूर्य-इंडिया'वर सार्वजनिक उद्योगधंद्यांनी किती रकमेची उधळण गेल्या वर्षभरामध्ये केली ते तरी कळू द्या', असा त्यांचा नारा आहे. दरम्यान 'सूर्य-इंडिया'चे प्रकाशन अद्यापही चालू आहे. फक्त आकार घटला आहे. जाहिराती मोठ्या प्रमाणावर अदृश्य झाल्या आहेत. मजकुराचे स्वरूपही बदलले आहे. म्हणजेच कोणत्याही नवीन प्रकाशनाने स्वतःचे अस्तित्व दाखवून देण्यासाठी जशी धडपड करणे आवश्यक आहे, तशी धडपड 'सूर्य-इंडिया' करत आहे. आता या सूर्याचा प्रकाश फाकतो की नाही, ते गुणवत्तेवर ठरणार आहे आणि गुणवत्तेचा प्रश्न आला की, मेनकाबाईंचीही तारांबळ आलीच. □

ग्रामीण आंदोलनांचा मागोवा घेणारे पुस्तक

**श्री ग्रा मा य न**

( दुसरी आवृत्ती : प्रकाशनाच्या वाटेवर )

श्री. ग. माजगावकर

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव । पुणे ३०

मूल्य : पंधरा रुपये

# टोपी फिरवली पण–

तारा पंडित

काँग्रेस राजवटीतील एक प्रतिष्ठित मंत्री. १०९ वर्षापासून त्यांच्या घराण्याचे एक इंग्रजी दैनिक प्रसिद्ध होत असते. त्याबरोबर एक बंगाली दैनिक नि एक साप्ताहिक पण निघत असते. इंग्रजी वृत्तपत्राची शताब्दी मोठ्या दिमाखात साजरी झाली होती. मंत्रिमहाशयांचे अगदी उत्तम चालले होते. वृत्तपत्रद्वारे इंदिरा-संजयादी मंडळींचे भरमसाट गुणगान होत असे. त्यामुळे मंत्र्याची प्रतिष्ठाही वाढीस लागली होती. पण अकस्मात काय झाले कोण जाणे ! सगळी हवाच बदलली. मे महिन्याच्या रखरख उन्हाळ्यात जशा पावसाच्या सरी कोसळताना सध्या दिसताहेत, तसा जबरदस्त बदल राजकीय वातावरणात घडून आला. जनता पक्ष नव्याने संघटित झाला व त्याने काँग्रेसला चित करून टाकले. पण याही परिस्थितीत मंत्रिमहाशय विचलीत झाले नाहीत. त्यांची संजय-स्तोत्राची आवर्तने सुरूच होती. परंतु यामुळे झाले भलतेच. ह्यांच्या वर्तमानपत्राकडे लोक ढुंकून पाहिनासे झाले आणि मंत्र्यांकडेही उपेक्षेने पाहू लागले. आता अंगाशीच शेकले तेव्हा मंत्री विचारात पडले. आसन तर गेलेच. आता वृत्तपत्रांवरही गदा आली. त्यांनी उपाय योजला. हळूच टोपी फिरवली. वृत्तपत्राची भाषाच बदलून टाकली. आणीबाणी, इंदिरा, संजय ही नावे बाद झाली. त्याऐवजी जयप्रकाश, मोरारजीभाई, राजनारायण ह्यांच्या स्तुतीने फोटोसहित स्तंभ भरू लागले. दैनिकाचा खप आटोक्यात आला.

आता आसन पकडण्यासाठी धडपड सुरू झाली. एक महिन्यापूर्वी दिल्लीला उडत जाऊन काँग्रेस फॉर डेमॉक्रेसीमध्ये प्रवेश द्या म्हणून याचना केली गेली. पण तेथून त्यांना धुडकावून लावण्यात आले. मग खुद्द माहेरघरी–मला जनता पक्षात सामील करून घ्या म्हणून विनंती केली गेली. आमचे सेनसाहेब कृपाळू, म्हणाले–करून घेऊ. पण जनता पक्षाच्या तरुण नेत्यांना हे सहन होणे शक्य नव्हते. ते म्हणाले–यासाठी आम्ही जेलमध्ये गेलो नव्हतो. कोणाही माणसाला असे पक्षात सामील करून घेतले तर प्रतिमा डागाळणार नाही का ? आणि त्यांनी लागलीच उपोषण सुरू केले. इमारतीच्या आत जनता नेत्यांची बैठक आणि बाहेर तरुणांचे उपोषण. शेवटी नेत्यांनी बाहेर येऊन तरुणांना विनंती करून म्हटले, उपोषण सोडा. आम्ही त्या व्यक्तीला आपल्या पक्षात सामील करून घेणार नाही असे वचन देतो. तरुणांनी उपोषण सोडले. पण बिचारे भूतपूर्व मंत्री मोठ्या शोचनीय दशेचा अनुभव घेत आहेत. काँग्रेस सोडली म्हणून तिकडे थारा नाही अन् जनता पक्षात प्रवेश नाकारल्यामुळे इकडेही डाळ शिजली नाही. टोपी फिरवली पण– अपयशच पदरात पडले. अशा ह्या दुर्भागी काँग्रेस नेत्याचे नाव आहे तरुणकांती घोष आणि त्यांची वृत्तपत्रे म्हणजे ‘ अमृत बझार पत्रिका ’ (इंग्रजी), ‘ युगान्तर ’ (बंगाली) आणि ‘अमृत’ नावाचे साप्ताहिक.

टोपी फिरवणारे अनेक आहेत; पण ही एकेकाळच्या मंत्र्याची गोष्ट म्हणून सांगितली.

☐

# चक्रम्‌चक्री (१४)

दीर्घस्मृती विश्वनाथ

# सदूदादू मंडळी

कॉलेज-शिक्षकांनी परीक्षांवर बहिष्कार घालून आय्. आय्. टी., मेडिकल कॉलेजेस, मॅनेजमेंट कोर्सेस अशा ठिकाणी जाऊ इच्छिणाऱ्या पालकांचे प्राण कंठाशी आणले होते; त्या बहिष्काराचं पुढं काय झालं ?

काय व्हायचंय् ? नवे मुख्यमंत्री वसंतरावदादा यांनी कॉलेज-शिक्षकांच्या प्रमुख मागण्यांबाबत लेखी आश्वासनं दिली आणि उरलेल्या मागण्या ३० जूनपर्यंत निकालात काढू असं सांगितलं. त्यामुळे समाधान पावून शिक्षकांनी बहिष्कार मागे घेतला. म्हणून तर सगळीकडे सामसूम दिसते.

म्हणजे पुन: आश्वासनंच ! मागे प्रभा राव यांनीही काही कमी आश्वासनं दिली नव्हती. तो अनुभव असताना आश्वासनावर शिक्षकांनी विसंबून राहावं, हे चुकलंच असं म्हटलं पाहिजे.

त्याचं असं झालं की, मुळातच बहिष्कार कितपत यशस्वी होईल याविषयी शंका होती. कारण, बहिष्काराचा प्रचार करायला संघटनांना वेळच मिळाला नव्हता. त्यातून यावेळची मुख्यमंत्र्यांची आश्वासनं लेखी आहेत आणि जेव्हा वाटाघाटी सुरू झाल्या तेव्हाचा मुख्यमंत्र्यांचा नूर पाहून संघटनांच्या प्रतिनिधींना असं वाटलं की, वसंतरावदादांवर विश्वास टाकायला हरकत नाही. तिसरं असं की, जर सरकारनं आश्वासनं पाळली नाहीत तर, पुनः चळवळ करता येणारच आहे. आता काही आणीबाणी येण्याची शक्यता नाही. बरं, परीक्षांवर बहिष्कार काही हौसेनं घातला नव्हता. त्यामुळे बहिष्कार मागे घेतला, यात काही चुकलं असं दिसत नाही. शिवाय त्यानंतर वाटाघाटीही चांगल्या प्रकारे चालू आहेत. लवकरच दोन्ही बाजूस जो समझोता झाला, त्याचं पत्रकही निघेल.

पण शिक्षक आणि सरकार यांच्या दरम्यान शिक्षणसंस्था आणि विद्यापीठे असे दोन दलाल असताना त्यांना बाजूला सारून सरकारनं शिक्षकांशी परस्पर वाटाघाटी कराव्या, हे काही बरोबर झालं नाही.

बलोबर बोललात ! पण आपली ही दलाली टिकविण्याचा विद्यापीठांनी किंवा शिक्षणसंस्थांनी काही प्रयत्न तरी केला का ? सरकारने आपल्याला बाजूला सारून आपल्या नोकरांशी वाटाघाटी कराव्यात आणि त्यात जे ठरले ते बिनतक्रार अंमलात आणणं आपल्याला भाग पडावं, याची यत्किंचित् खंत या मंडळींना वाटलेली दिसत नाही. तसं नसतं तर, याबाबतीत आपली नापसंती त्यांना व्यक्त करता आली असती. पण तितका स्वाभिमानही शिक्षणसंस्था किंवा विद्यापीठे यांत नाही आणि असला तरी तो प्रत्यक्षात आणण्याची धमकही नाही.

## निष्प्रभ अवस्था !

विद्यापीठे आणि शिक्षणसंस्था अशा प्रभावहीन का झाल्या ?

ज्यांच्या हाती तिजोरीच्या किल्ल्या असतात तोच दुसऱ्याला वंगवू शकतो. जोपर्यंत शिक्षणसंस्था स्वत:ला लागणारा पैसा स्वत: उभा करत होत्या, तोपर्यंत शिक्षणक्षेत्राचे स्वातंत्र्य आणि पावित्र्य यांचे आपणच रखवालदार आहोत, हा त्यांचा बहाणा चालू शकत होता. आता रुपयातले ऐंशी पैसे सरकारकडून येतात. उरलेले वीस पैसे फीच्या. रूपाने विद्यार्थ्यांकडून मिळत असले तरी, बहुसंख्य विद्यार्थ्यांची फी सरकारच देत असते. म्हणजे त्या विसातले १५ पैसे देखील सरकारचेच. तेव्हा अशा स्थितीत, आमच्या नोकरांशी तुम्ही परस्पर बोलणी करू नयेत असे शिक्षणसंस्था सरकारला कोणत्या तोंडाने सांगणार ? हां, आता आपल्या नोकरांना—म्हणजेच महाविद्यालयीन शिक्षकांना त्या कदाचित म्हणू शकतील की, आम्हाला न कळवता तुम्ही सरकारशी काही करारमदार केलेत तर, ते आमच्यावर बंधनकारक नाहीत. पण इथेही अखेर त्यांना सरकारलाच तोंड द्यावे लागणार. ' न गणती मज, जातो तुच्छ मानून तूते ' ही दर्पोक्ती जुन्या ऋषींना शोभत असली, तरी सरकारी अनुदानावर आपला संसार सजवणाऱ्या आधुनिक शिक्षणसंस्थांना परवडणारी नाही.

पण आज सरकारवर पैशांसाठी अवलंबून नाही, असं कोण आहे ? नैतिक प्रभाव म्हणून काही असतोच की नाही ?

अहो, आपल्याकडील शिक्षणसंस्थांचा नैतिक प्रभाव पडेल, असं म्हणणं हे नासक्या दुधाला मोगऱ्याचा वास येईल, अशी अपेक्षा करण्याइतकंच वेडगळपणाचं आहे. या ना त्या प्रकारे स्वत:ची तुंबडी भरू इच्छिणाऱ्या गावगुंडांनी चालवलेला गणेशोत्सव आणि अधिकाराची व पैशाची हाव सुटलेल्या आगाऊ माणसांच्या टोळक्यांनी चालवलेल्या सध्याच्या शिक्षणसंस्था यात काही फरक नाही. स्वार्थ क्षणभरही विसरू न शकणाऱ्या व्यक्तींची सत्ता ज्या शिक्षणसंस्थात चालते, अशा शिक्षणसंस्थांनी मांडलेल्या विचारांना कोण महत्त्व देणार ? कोणत्या महत्त्वाच्या प्रश्नांवर काही लक्षणीय मतं आपल्या शिक्षणसंस्थांनी व्यक्त केलंय ? नवा आकृतिबंध, नवीन विद्यापीठांची स्थापना, शिक्षकांचे पगार आणि सेवा-नियम या सर्व गोष्टी शिक्षणसंस्थांची मते डावलूनच आजपर्यंत होत आल्या आहेत.

तुम्ही काही तरी भडक बोलता आहात. टिळक-आगरकरांची परंपरा सांगणाऱ्या आपल्या शिक्षणसंस्था आहेत. महाराष्ट्राचे भूषण म्हणजे स्वार्थत्यागी शिक्षण-महर्षींनी चालवलेल्या शिक्षणसंस्था असं नेहमी अभिमानानं म्हटलं जात असे. आता तुम्ही हे भलतंच सांगू लागलात.

टिळक-आगरकर या पुण्यश्लोक व्यक्ती होत्या. परंतु त्यांनी स्थापन केलेल्या संस्थात त्यांचे नैतिक दार्ढ्य उतरलेच पाहिजे, असा काही नियम नाही. खुद्द टिळक-आगरकरांच्या हयातीतच या संस्थांच्या नैतिक अध:पातास सुरुवात झाली होती. आणि आता तर, त्या नीतिमत्तेचे पायंडे सुद्धा दिसेनासे झाले आहेत.

## सदू-दादू आणि मंडळी

टिळकांच्या हयातीत आणि टिळक स्वतः संस्थेत काम करीत असता त्यांच्या शिक्षणसंस्थेचे वर्तन नीतीला सोडून झाले ?

त्याचे असे झाले की, इंग्रज सरकारने सरकारी कॉलेजांतून जो पगार शिक्षकांना मिळत असे त्या दराने फर्ग्युसन कॉलेजातील शिक्षकांना पगार मिळावा म्हणून अनुदान द्यायचे ठरविले. त्या वेळी संस्थेने सरकारला सांगितले की, सरकारने अनुदान दिले तरी, संस्था शिक्षकांना सरकारी दराने पगार देणार नाही, मात्र कागदोपत्री तितका पगार दिल्याचे दाखविले जाईल ! म्हणजे खोटे हिशेब दाखविले जातील. सरकारने ते मान्य केले. टिळकांनी आपल्या राजीनाम्याच्या पत्रात या खोट्या हिशेबांचा उल्लेख केला आहे.

हे थोडे गैर झाले खरे. पण अखेर हा सरकार आणि संस्था यांच्या दरम्यानचा

व्यवहार होता आणि या गैरप्रकाराला सरकारची संमती होती.

असे समाधान आपण वाटल्यास मानावे. पण 'छिद्रेष्वनर्था बहुलीभवन्ति' त्या वेळेस सुरुवात झाली. आता अशी परिस्थिती आहे की, शिक्षण-संस्थांतील जवळजवळ प्रत्येक व्यवहार हाच गैरव्यवहार झाला आहे. आमच्या सदू-दादूचंच प्रकरण घ्या, म्हणजे सफेद लफंगेगिरी कशाला म्हणतात ते कळून येईल.

हे सदू-दादू कोण ?

पुण्यात एक नामांकित कॉलेज आहे. तेथे सदू दादू हे दोघे आजीव सेवक आहेत. त्यांची खरी नावेही सांगायला तशी काही हरकत नाही. पण इथे आपणाला नावाशी काही कर्तव्य नाही. एकूण शिक्षण-संस्थांतून कसे व्यवहार चालतात त्याचा हा एक अतिसौम्य नमुना म्हणून मी सांगतो.

सांगा ती सदू-दादूंची गोष्ट.

१९६६ मध्ये महाराष्ट्र सरकारने कॉलेज-शिक्षकांना नवी वेतनश्रेणी (म्हणजे ७३ साली लागू करण्यात येणाऱ्या वेतनश्रेणीच्या पूर्वीची) लागू केली. या वेतनश्रेणीचा विशेष असा की, शिक्षकांचे तीन भाग पाडण्यात आले होते. कॉलेजात १०० शिक्षक असतील तर, ज्यास्तीत जास्त २५ शिक्षकांना ७००-४०-११००, जास्तीत जास्त २५ शिक्षकांना ४००-४०-८०० आणि उरलेल्या ५० जणांना ३००-२५-६०० या दराने पगार देण्यात येणार होते. त्यामुळे प्रथमतःच अशी परिस्थिती आली होती की, नवीन शिक्षकांना अत्युच्च श्रेणी मिळणे अशक्य होते. त्यामुळे सदू-दादूंच्या कॉलेजने असे ठरवले की, आजीव-शिक्षकांचे दरमहाचे पगार एकत्र करावेत आणि आजीव-सेवकांसाठी एक निराळीच वेतन-श्रेणी ठरवून तीनुसार पगार द्यावेत. हे ठरले १९६८ साली. ज्यावेळी सदू-दादू आजीव-सेवक झाले, त्यावेळी त्यांना हे स्पष्ट सांगण्यात आले होते की, आजीव सेवकांच्या वेतनश्रेणीचा फायदा त्यांना मिळणार नाही. सदू दादूंनी त्यावेळी हे मान्य केले. नंतर त्यांनी भुणभुण लावली की, 'आपण सारे भाऊ-भाऊ, मिळाली भाकरी वाटून खाऊ.' आजीव-सेवकातले जे श्रेष्ठी होते त्यांना या ना त्या कारणाने हे म्हणणे पटले. मग असे ठरविण्यात आले की, संस्थेतील पदाधिकाऱ्यांना म्हणजे प्रिन्सिपॉल, व्हाईस प्रिन्सिपॉल, सेक्रेटरी वगैरे-जे जादा भत्ते मिळतात तेही वर सांगितलेल्या फंडात मिळवावेत आणि अशा वाढीव फंडाचा उपयोग सदू-दादूंना आजीव-सेवकांची वेतनश्रेणी देण्यासाठी करावा. ही व्यवस्था ७१ सालापासून परवा-पर्यंत चालू होती.

मग आता काय झाले ?

आता सदू-दादू आणि कंपनीचे लोक स्वतःच पदाधिकारी झाले. आपले भत्ते आपल्याला न मिळता त्यांचा विनियोग तान्ह्या आजीव-सेवकांना बाळकडू देण्याकडे व्हावा हे त्यांना आता पटेना. म्हणून त्यांनी ठरवले की, पदाधिकाऱ्यांना जादा भत्ते देण्यात यावेत आणि तो खर्च संस्थेने सोसावा ! त्याबरोबर ७१-७७ ही सहा-सात वर्षे ज्यांचे भत्ते फंडाकडे वर्ग करण्यात आले होते ती माजी पदाधिकारी मंडळी 'मग आम्ही काय पाप केले होते ?' असा आक्रोश करू लागली. त्यामुळे ७१ साली झालेली चूक त्याच सालापासून दुरुस्त करण्यात आली. इंदिराबाईंचा कित्ता सदू-दादूंनी सही-सही गिरवला. त्यामुळे कित्येक पदाधिकाऱ्यांना सात-सात, आठ-आठ हजार रुपये मिळाले. एकूण साठ हजार रुपये आठ दिवसांत वाटण्यात आले, आणि हे केव्हा ? केव्हा ?

तर संस्थेला पस्तीस लाख रुपये कर्ज असताना ! त्याच वेळी, सेवक-शिक्षकांना दोन महिन्यांचा पगार आपण देऊ शकणार नाही, अशी दवंडी हीच मंडळी गावभर पिटत होती. इतकेच नव्हे तर, या सदू-दादूंच्या गोंधळाच्या कारभारामुळे काही सेवक-शिक्षकांना ओव्हरटाईम करावे लागले होते, त्यांचा मोबदला देखील द्यावयाची टाळाटाळ यांनी चालवली होती.

पण झाल्या त्या सगळ्या गोष्टी नियमाप्रमाणेच झाल्या ना ?

अहो, नियमानुसार वर्तन नेहमीच नीतीप्रमाणे असते असे नाही. सदू-दादूंनी नियमबाह्य गोष्टी केल्या नाहीत हे खरे, पण त्याचबरोबर त्यांनी संस्थेच्या हिताकडे दुर्लक्ष केले हेही खरेच. विशेष म्हणजे हे सगळे केवळ सदू-दादू-कंपूच्या स्वार्थासाठी झाले. या सगळ्याकडे कशी डोळेझाक करता येईल ? शिक्षण-संस्थांचे नैतिक सामर्थ्य कमी झाले ते या 'संस्थानिकां'च्या स्वार्थसाधू कारभारामुळे !

## दलाली संपवा !

म्हणजे या संस्था—शहाण्यांच्या हाती पैसाही नाही आणि त्याग किंवा कमीत कमी स्वच्छ कारभार यामुळे येणारं वजनही नाही. मग उपयोग काय यांचा ?

कसं बोललात. आपल्याकडे लोकसमजूत आहे ना की, मोहरांनी भरलेल्या घागरी—भोवती वळसा घालून बसलेला नाग असतो. त्या लोकसमजुतीतल्या नागासारखी शिक्षण-संस्थांची अवस्था आहे. पैसे समाजाकडून आलेले किंवा सरकारी; संस्थांकडून शिक्षण-कार्य करणारी मंडळी बहुतेक सेवक-शिक्षक, या दोघांमध्ये मलिदा खाणारी ही दलालांची टोळी हवी कशाला ? ही दलाली संपवून टाकली पाहिजे आणि महाविद्यालये सर्व शिक्षकांनी सहकारी पद्धतीने चालवली पाहिजेत.

पण हे सगळं काम फार किचकट आहे आणि ते काळजीकाटयाने करावयास पाहिजे. यातून काय खेकटी निघतील, याचा विचार तुम्ही केलात का ?

हे पाहा, एक गोष्ट मोडून दुसरी करायची असं ठरवलं की नाना अडचणी येणारच. सगळे प्रश्न कायमचे सुटतील अशी पद्धती कोणाला कधी बसवता आलीय् का ? दहा अडचणी सोडविण्यासाठी आपण जे प्रयत्न करतो त्यातून नव्या तितक्याच अडचणी निर्माण होतच असतात. पण जुन्या अडचणी आणि नव्या अडचणी यांत गुणात्मक फरक (क्वॉलिटेटिव्ह डिफरन्स) असतो. शिक्षण-संस्थांची दरम्यानगिरी सरकार आणि शिक्षक यांच्यामध्ये नको, हे आपल्याला मान्य असेल तर नवी घडी बसायला वेळ लागायचा नाही.

पण सरकारला हे पटेल का ?

तशी सुचिन्हे दिसतायत. कोल्हापूरच्या कुरुयात गोखले कॉलेजचा बंद पडलेला विज्ञान विभाग बडतर्फ शिक्षकांनी स्वतः चालवावा असं सरकारनं सुचवलंय, असं ऐकतो. तेव्हा कमीत कमी रुग्णाईत शिक्षण-संस्था तरी सेवक—शिक्षकांना चालवायला मिळतील असं वाटतं. आता आमच्या स्वच्छ दृष्टीला सर्वच शिक्षणसंस्था कमी—अधिक प्रमाणात व्याधिग्रस्त दिसतात, ते सोडा.

पण शिक्षकांनी संस्था चालवल्या तरी सदू—दादूसारखी मंडळीच म्होरके म्हणून वावरणार.

तो धोका कुठल्याही पद्धतीत आहेच. यासाठीच संस्थांच्या कारभारावर समाजाची निरंतर देखरेख हवी. दुर्दैवाने आपल्या समाजाचे शिक्षणाकडे अतिशय दुर्लक्ष होत आहे. संस्था बंद पडल्या, परीक्षांवर बहिष्कार टाकले की जरा खळबळ माजते. मागून पुनः चिडीचूप. हे बरोबर नाही. शिक्षणसंस्था या केवळ तांत्रिक दृष्टया खाजगी मालकीच्या आहेत. अखेर त्या सार्वजनिक संस्थाच आहेत. म्हणून त्यांच्या कारभाराविषयी समाजाने उदासीन राहाणे धोक्याचे आहे. □ ५

# नेहरू आणि सावरकर

## आजच्या संदर्भात मूल्यमापन

वा. दा. रानडे

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंचा तेरावा स्मृतिदिन काल साजरा झाला. आज २८ मेला स्वातंत्र्यवीर सावरकरांचा ९४ वा जन्मदिन आहे. नेहरू आणि सावरकर. भारताच्या आधुनिक इतिहासात दोघांचेही वैशिष्टयपूर्ण कर्तव्य व स्थान आहे. या दोन दिवसांच्या निमित्ताने आजच्या परिस्थितीच्या संदर्भात त्यांच्या पुनर्मूल्यमापनाच्या दृष्टीने काही विचार मांडीत आहे.

पंडित नेहरूंच्या स्मृतिदिनाला आजच्या संदर्भात विशेषच महत्त्व आहे. आणीबाणीच्या काळ्या कालखंडातून आपण नुकतेच बाहेर पडलो आहोत. महात्मा गांधी व पंडित जवाहरलाल नेहरूंचाच वारसा आणि परंपरा आपण पुढे चालवीत आहोत असा नेहरूकन्या इंदिरा गांधींचा दावा होता पण लोकसभा निवडणुकीत जनतेने त्यांचे व त्यांच्या पक्षाचे नेतृत्व झिडकारून हा दावा अमान्य केला आहे. धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद, लोकशाही आणि समाजवाद या तिन्ही ध्येयप्रणालींवर नेहरूंचा गाढा विश्वास होता. पण धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद मानणाऱ्या नेहरूंना धार्मिक तत्त्वावर केलेली भारताची फाळणी मान्य करावी लागली. मुस्लीम जातीयवादापुढे राष्ट्रवादाने शरणागती पत्करली पण याबद्दल एकट्या नेहरूंना दोष देता येणार नाही. महात्मा गांधींपासून सर्वच नेत्यांचे सामर्थ्य व नेतृत्व त्यावेळी अपुरे पडले. " देशाचे तुकडे करण्यापूर्वी माझे तुकडे करा " असे गांधीजी म्हणत असत. पण देशात पेटलेल्या जातीय दंगलींच्यामुळे नेहरू, पटेल आणि काँग्रेसपक्ष हतबल झाला होता. जिनांना त्यांचे पाकिस्तान देऊन टाकू या. म्हणजे तरी देशात शांतता प्रस्थापित होईल आणि विकासाच्या कार्यावर लक्ष केंद्रित करता येईल, या निर्णयास नेहरू, पटेल आले होते. ज्या आधारावर फाळणीला विरोध करण्याचा निर्धार गांधीजींनी व्यक्त केला होता, तो त्यांच्या पायाखालचा आधारच गेला होता. तरीसुद्धा आपल्याला जे न्याय्य वाटले त्यासाठी लढण्याची त्यांची जीवननिष्ठा होती; त्यांचे सारे जीवन म्हणजे सत्यासाठी, न्यायासाठी लढा होता. फाळणीविरुद्ध त्यांनी लढा का दिला नाही ? या लढ्यात गांधीजी एकाकी पडले नसते. सारा देश त्यांच्या मागे उभा राहिला असता, गांधीजींनी हा निर्णय का घेतला नाही ? नेहरू–पटेलांविरुद्ध लढा त्यांना करायचा नव्हता का पण सत्यासाठी, न्यायासाठी लढणे या त्यांच्या जीवननिष्ठेशी ते विसंगत होते. गांधीजींच्या नेतृत्वाची ती मर्यादा होती. नेहरूंनाही फाळणी मनापासून नको होती. पण आपण आपले ध्येय आणि देशात जातीय हत्याकांडात होत असलेली हानी यातून निवड करण्याचा प्रश्न आला तेव्हा नेहरूंच्या मानवतावादी मनात हत्याकांड थांबवावे हा विचार प्रभावी झाला व ते फाळणीला तयार झाले. जिनांना पाहिजे ते दिल्यावर जातीय संघर्ष निकालात निघेल ही नेहरूंची समजूत मात्र भ्रामक ठरली. आजच्या संदर्भात बोलायचे तर मात्र हिंदु-मुस्लीम जातीय संघर्षाची धार बोथट झालेली दिसते. गेल्या लोकसभा निवडणुकीत मुस्लीमांनी जनता पक्षांतर्गत जनसंघ उमेदवारांचा प्रचार केला तर जनसंघ व रा. स्व. संघाच्या कार्यकर्त्यांनी मुस्लीम उमेदवारांचा प्रचार केला. ही तात्पुरती अवस्था आहे की हिंदु–मुस्लीम सहकार्य खरोखरच वाढत आहे हे आजच सांगणे कठीण आहे.

नेहरू लोकशाहीचे पुरस्कर्ते होते. लोकप्रियतेचा उच्चांक त्यांनी गाठला होता. आपल्या सभांसाठी त्यांना ट्रकमधून लोक जमवावे लागले नाहीत पण या लोकप्रियतेचा गैरफायदा घेऊन त्यांनी आपल्या कन्येप्रमाणे स्वतःच्या हाती सर्व सत्ता केंद्रित करून हुकूमशहा बनण्याचा कधी प्रयत्न केला नाही. यशस्वी देशक म्हणून नेहरू कन्येने आपल्या कारकीर्दीची जाहिरात भाटांकरवी करून घेतली. तसे नेहरूंनी कधी केले नाही. इंदिरा गांधींप्रमाणे घराण्याची वंशपरंपरागत सत्ता प्रस्थापित करण्याचा त्यांनी कधी प्रयत्न केला नाही. आपल्या हयातीत कन्येला त्यांनी मंत्रिपदापासून दूरच ठेवले. असे असले तरी नेहरूंना सत्ता नको होती असा त्याचा अर्थ नाही. चीनच्या युद्धातील मानहानिकारक पराभवानंतर त्यांनी वास्तविक राजिनामा द्यायला हवा होता. पण त्यांनी तसे केले नाही. देशात बाह्यतः लोकशाही आली पण ही लोकशाही सत्ता पैसा, जात यांच्या प्रभावाने भ्रष्ट झाली होती. लोकशाहीची ही विकृती नेहरू थोपवू शकले नाहीत.

समाजवादाच्या बाबतीतही तसेच घडले. काही उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण झाले पण अर्थव्यवस्थेवरील आणि सरकारवरील उद्योगपतींची पकड कमी न होता वाढत गेली. समाजवादी कार्यक्रम निर्धाराने अंमलात आणण्यास शिस्तबद्ध पक्ष हवा असा पक्ष उभारण्यात नेहरूंना आणि त्यांच्या कन्येलाही अपयश आले. कन्येच्या काळात तर पक्षाने उधोगतीची परिसीमा गाठली. पक्षात फूट पडली. केंद्रातील सत्ता त्याने गमावली. जवळजवळ सर्व उत्तरभारत त्यांच्या हातून गेला. पराभवाच्या धक्क्यातून पक्ष अजून सावरला नाही पण आपल्या चुका प्रामाणिकपणे मान्य करण्याची नेहरू-कन्येची अजूनही तयारी नाही.

अलिप्ततेचे धोरण ही नेहरूंची परराष्ट्र धोरणाच्या क्षेत्रात महत्त्वाची देणगी. जगाची दोन बड्या सत्ता गटात विभागणी होऊन तिसरे महायुद्ध होण्याचा धोका त्यामुळेच टळला. पण हे धोरण अवलंबताना ध्येयवादाच्या आहारी जाऊन वास्तवाकडे दुर्लक्ष झाले चीनबद्दलचे धोरण चुकून पराभवाची मानहानी पत्करावी लागली.

धर्म निरपेक्ष राष्ट्रवाद, लोकशाही आणि समाजवाद याबाबत योग्य दृष्टिकोन नेहरूंनी

पृष्ठ २५ वर

## मुंबईच्या अवतीभवती वाढणाऱ्या कारखानदारी जगतात अलीकडे घडलेल्या काही सत्यघटनांवर आधारित एक छोटी कादंबरी ( उत्तरार्ध )

# ॥ ल ढा ॥

माधव शिरवळकर

प्रभाकरला उडवणं सोप होतं. मोठी थैली पुढे केली असती तर, कुणीही भाडोत्री प्रभाकरला उडवण्यासाठी म्हणून मिळाला असता. पण ह्यामुळे प्रचंड गोंधळ झाला असता. 'खून' म्हणून चौकशी झाली असती आणि पोलीस चौकशीत काही बाहेर पडलं असतं तर, प्रेस्टीज गेलं असतं. बरं, पोलिसांचं एक पाहून घेतलं असतं. पण नंतर कामगार चवताळले असते आणि काहीतरीच घडलं असतं नको ते.

आठवले म्हणत होते त्याप्रमाणे प्रभाकरला 'विकत' घेणं हे अशक्य होतं. पोलिटिकल पार्टी असती तरी, प्रकरण मिटलं असतं. निवडणुका जवळ आल्या होत्या. पण हे काहीच सरळसाधं नव्हतं.

प्रभाकरला कसा उडवायचा ? ? मोठं प्रश्नचिन्ह होतं.

● ●

वालावलकरसाहेबांशी बोलणी झाली त्याच दिवशी प्रभाकरची एक सभा कंपनीच्या गेटबाहेर झाली. त्यात त्यानं कामगारांना आशावाद धरायला सांगितला. पण नकार आला तर हिंमत असू द्या, म्हणून इशारा दिला. थोडं थांबावं लागेल, नेट धरावा लागेल. पण आज नाही उद्या सोक्षमोक्ष होणार हे भविष्यही त्यानं वर्तवून ठेवलं. वालावलकरसाहेब एम. डी. म्हणून नवे आले असले तरी, ते ह्या कंपनीचे मालक आहेत. आपण कामगार त्यांना परके नाहीत. त्यांना कामगारांच्या पोराबाळांचा घास हिरावून घेण्याचा अधिकार नाही, हे त्यानं बजावलं. कामगार काम करतात, त्यांना योग्य तो मोबदला मिळाला पाहिजे, कारण त्यांनाही जगायचं असतं. देशाच्या भवितव्याचा त्रीर्णी हातोडा कामगारांच्या हाती आहे. भांडवलदारांच्या हाती नाही हे स्पष्ट सत्य आहे. कामगार अर्धपोटी राहता कामा नये. तो सन्मानाने जगला पाहिजे. त्याला छेडण्याचा प्रयत्न झाला तर, त्याच्या हातातला हातोडा कामगार विरोधाचा चकणाचूर करील हे संबंधितांनी समजून राहावं हेच हितकर. बेछूट फायद्यासाठी, भरपेट डिव्हिडंडसाठी कामगारांना पिळू पाहणाऱ्यांचे डावपेच, त्यांचा मस्तवालपणा कामगार आपल्या हातोड्याने फोडून टाकील. आमच्यावर ही पाळी येणार नाही असंच आम्ही समजतो. तूर्त एवढंच पुरे. युनिअनसाठी कार्य, कष्ट, त्याग, निष्ठा यांची अधिक गरज आहे. आणि युनिअनला ते मिळतेय पुढेही मिळत राहील. युनिअन कामगारांची एकजूट अभेद्य, अभंग, अखंड राहील. माझ्यावरील तुमच्या विश्वासाचा आधार घेऊनच मी पावले टाकीत आहे. आपली मोहीम यशस्वी होणार आहे.

प्रभाकरने अत्यंत प्रभावी भाषण केले. सभा शांत राहिली. अवाक झाली. कामगार विचार करू लागले.

● ●

कामगारांची एकजूट अभेद्य होती, हे कालच्या सभेवरूनच वालावलकरसाहेबांनी ताडले. कालच्या सभेनंतरच्या घोषणा कानठळ्या बसविणाऱ्या होत्या. प्रभाकरने 'मागण्यासाठी लढा' हे सूत्र पुढे आणलं होतं. कामगारांनी ते वेड्यासारखं डोक्यावर घेतलं होतं.

साहेब 'कामगार' ह्या जातीवरच भडकले. कुणीही हाकलावं आणि त्यांनी चालावं असले मूर्ख लोक हे. कवडीची अक्कल नाही, किंमतही नाही. त्यात प्रभाकर शेलारसारखे वेडे ह्यांना भेटले. प्रभाकरने जर आपली बाजू सांगितली असती तर, प्रभाकरचं सोनं झालं असतं. युनिअनच्या बदल्यात त्याला ऑफिसरच्या ग्रेडपर्यंत चढवला असता. पण ह्यांच्या हे नशिबातच नाही. ह्यांचं मिसळपाव आणि चारमिनार सुटायची नाही.

● ●

बोर्ड-मीटिंग पुढे ढकलली तेव्हा प्रभाकर जाम भडकला. लंगड्या नारायण नवाथेनं ही बातमी सांगितली तेव्हा प्रभाकरने त्याला शिव्या घातल्या. 'चांगली बातमी आणरे नाऱ्या. साल्या, कधी तरी चांगली बातमी आण. कधी सुधारणार तू. काय बातम्या मिळतात तुला एक एक.'

भरभर भागवत, देसाई, पवार, चौगुले, देवळीकर, हळबे, परब, सिन्हा, वगैरे मंडळी जमा झाली. चर्चा खलबतं झाली. सगळ्यांची डोकी पिकून गेली. भागवत जाम चिडला. 'XXX त्या वाल्याच्या, आमच्यावर चढायला बघतो. प्रभ्या, तू सांगशील तर, केबिनमध्ये जाऊन तोंड फोडतो साल्याचं.'

प्रभाकरनं सर्वांना शांत केलं आणि आपला निर्णय सांगितला. सर्वजण गंभीर झाले आणि आले त्या दिशेला निघून गेले.

● ●

दुपारी लंचनंतर बैठा संप सुरू झाला. कामगार मशिनजवळ बसून राहिले. प्रॉडक्शन प्रोसेस थंडावली. सुपरवायझर भांबावले. प्रॉडक्शन मॅनेजर वालावलकरसाहेबांकडे बसला होता. स्टाफमध्ये कुजबूज चालली होती, गों गों गों करणारी मशिनरी शांत

होती. रोज गजबजणारे प्लॉटस श्रद्धांजलीला उभं राहावं इतके शांत होते. तेवढ्यात प्रभाकरच्या नेतृत्वाखाली तीस–चाळीस कामगार, निपूटपणे ऑफिसात शिरले. वालावलकर-साहेबांच्या केबिनमध्ये शिरून त्यांना घेराव करण्यात आला. साहेब भांबावले. तेवढ्यात प्रभाकर पुढे आला.

'मिस्टर शेलार, काय भानगड आहे ही?' साहेबांनी त्रासिक मुद्रेने विचारले.

'सगळी कारस्थानं तुम्हीच करा आणि वर आम्हालाच विचारा, हे काय आहे? साहेब, काम बंद आहे आणि प्रश्नाचं उत्तर मागण्यासाठी हा घेराव आहे.' प्रभाकर बेफिकिरीत म्हणाला.

'मिस्टर शेलार, तुम्ही फार अविचारी माणसं आहात. बोर्ड–मीटिंग पुढे ढकलली एवढं कळल्यावर तुम्ही हा गोंधळ घातलात. पण तुमच्यापैकी कोणीतरी येऊन विचारलं का, की मीटिंग पुढे का ढकलली म्हणून?'

'का ढकलली????' एकदम आवाज घुमला घेरावबाल्यांचा.

'आता आलात मुद्द्यावर. मी स्वतः मीटिंग पुढे ढकलली. मी त्याचं स्पष्टीकरण देतो. अगोदर घेराव सोडा. फक्त लीडर माझ्याशी बोलणी करील. मान्य असेल तर मी बोलतो. नाहीतर स्वस्थ बसतो.'

प्रभाकरने खूण करताच घेराव उठला व सभा सुटावी तसे तीस–चाळीस कामगार ऑफिसबाहेर पडले.

'मिस्टर शेलार, हे बघा, आत्ताच मी अकाउंटस्चा अहवाल परत पाठवणार होतो. हे बघा, ह्या महिन्यात आणि पुढच्या महिन्यात कंपनीची आर्थिक ताकद बघा किती आहे ती. जेमतेम मेंटेनन्स सुटणार आहे दोन महिन्यांनंतर एक्सपोर्टस्ची बिलं येणार आहेत. अँड गुड न्यूज फॉर यू–मी ठरवलंय की, तुमच्या मागण्या मान्य करायच्या. मी स्वतः ठरवलंय. एकतर्फी. आता येणाऱ्या एक्सपोर्ट बिलांतूनच तुम्हाला काही पेमेंट करता येणार आहे. ह्या बोर्ड मीटिंगमध्ये मांडलं असतं तर, कंपनीला आर्थिक ताकद नाही म्हणून मागण्या नामंजूर झाल्या असत्या. तुम्ही हे दोन महिने थांबा.'

'साहेब, हा काय पोरकटपणा चाललाय तुमचा? उद्या तुम्ही म्हणाल मरेपर्यंत थांबा. ह्याला काय अर्थ आहे?'

'हे बघा. तुम्ही ऐकून घ्या. शांत चित्ताने घ्या. प्रत्येक गोष्ट तुम्ही गरम डोक्याने घ्यायची म्हटलीत तर कठीण आहे. तुमच्या मागण्या मान्य झाल्यासारख्याच आहेत असं तुम्ही समजा. खुशाल समजा. फक्त बोर्ड मीटिंगमध्ये कागदोपत्री निर्णय ठरेल. मी तुम्हाला सांगतो तुम्ही हे दोन महिने थांबा. शेवटचे. आणि हा माझा शब्द.'

'साहेब, हा तुमचा शब्द नं?'

'हो.'

'मग हा शब्द लेखी द्या.'

'हे बघा शेलार, लेखी द्यायला माझी ना नाही. पण बोर्ड मीटिंगच्या अगोदर मी लेखी देणं म्हणजे इतर डायरेक्टर्सवर कुरघोडी करण्यासारखं नाही का? सांगा तुम्हाला काय वाटतं?'

'ठीक आहे. दोन महिने श्वास रोखतो.'

● ●

साहेब घरी पोचले. रात्री नऊच्या सुमारास. एम. डी. चा चार्ज घेतल्यापासून श्रम वाढले होते आणि ताण वाढला होता. आज प्रभाकर शेलारला काहीतरी सांगून उडवला होता. दोन महिन्यांनंतर तरी साहेब काय निर्णय घेणार होते? काही नाही. त्यांचा निर्णय ठरलेलाच होता. कामगारांना एक पै मिळायची नाही. दोन महिन्यांनंतर तो दिलेला शब्द त्यांचा नव्हताच. आणि दरम्यानच्या काळात राजकारण लढवायला अवधीही होता.

आज साहेब घरी पोचले. तेव्हा फार अस्वस्थ होते. कंपनीची ही ब्याद त्यांना संपवायची होती. पण आपला ताठरपणा ते सोडणार नव्हते. त्यांना आजपर्यंत फक्त यश माहीत होतं. आणि यशासाठी ते झगडणार होते. कामगारांना एक पैही द्यायची नाही हे त्यांचं धोरण होतं. आणि त्यासाठी ते वाटेल तेवढी आणि वाटेल ती तत्त्वे पायदळी तुडवणार होते.

घरी येऊन नेहमीप्रमाणे सूट काढून साहेबांनी पाय धुतले. जेवायचं नाही म्हणून सांगितलं आणि द्वारकाची चौकशी केली. तो आला नव्हता. ते विलक्षण संतापले. पण आज ते फारच दमले होते. आपल्या खोलीत जाऊन त्यांनी सिगरेटीमागून सिगरेटी ओढल्या धुराच्या दुनियेत ते हरवून गेले. बाहेर द्वारका आल्याचं कळलं. पण ते विचार करीत राहिले. डोक्यावरून हात फिरवत राहिले. मग बेडवर स्वस्थ पडले. लाईट ऑफ केला. पण डोळे मिटत नव्हते. झोप लागत नव्हती. डोक्यातला वणवा विझत नव्हता. विझला नसता.

साहेब पुन्हा उठले. क्षणभर मान सैल सोडली. मग झटकन उठून कपाटाकडे गेले. बाटली, ग्लास बाहेर काढला. कच्च्या व्हिस्कीचे घोट पोटात रिचवले. बाटली हलकी केली. डोकंही हलकं केलं आणि साहेब झोपेच्या आधीन झाले.

● ●

दोन महिने थांबणं कामगारांना वास्तविक मान्य नव्हतं. ते प्रभाकरशी वाद घालू लागले, 'इतके थांबलो. आता किती थांबायचं?' असाच सूर होता. तो तसा बरोबरही होता. पण प्रभाकरने काहीतरी समजूत घालून दिली. 'मित्रांनो, हे काम मोठं आहे. अवघड आहे. रक्तपात करून लढाया जिंकता येतात. पण रक्तपाताशिवाय लढाई जिंकायची तर, तडजोड करावी लागते. मित्रांनो, आपल्याला रक्तपात टाळायचाय शक्यतो. टाळायचाय. म्हणूनच भुकेल्या पोटीसुद्धा आपण आज परिस्थितीशी तडजोड केली आहे. मला मान्य आहे ही तडजोड आपल्याला महाग आहे, ती करणं आपल्या जीवावर आलं आहे पण मित्रांनो हा प्रयत्न शेवटचा आहे. ही शेवटची तडजोड आहे. मला हे समजतं की, ही तडजोड एकतर्फी आहे. पण लक्षात ठेवा, मॅनेजमेंटकडे जसे हुकमी एक्के असतात तसेच आपणा कामगारांकडेही काही हुकमी एक्के आहेत. हे दोन महिने कुणीही ओव्हर टाईम करायचा नाही. कंपनीच्या उत्पादनाला मदत करायची नाही. वर्क स्लो प्रोसेस ठेवायची. कामं मंद गतीनं करायची. आज तीन हजार बॉक्सेस पॅक होत असतील, तर ते निम्म्यावर आले पाहिजेत. हे निर्णय कटू आहेत पण मॅनेजमेंटला कामगाराचं मोल कळावं म्हणून हे कडू औषध त्यांना आवश्यक आहे.'

● ●

साहेब आजच्याइतके अस्वस्थ कधीच नव्हते. सिगरेटमागून सिगरेट चालल्या होत्या. एक दोन वेळा चहा झाला होता. पण त्याचा काही परिणाम नव्हता. एकूण परिस्थिती भयंकरच होती. गेले पंधरा दिवस प्रॉडक्शन

भलतंच उतरलं होतं. प्रभाकर घोलारला बोलावून विचारलं होतं. पण 'दोन महिने हे असंच चालणार' असे जेव्हा त्याने सांगितले, तेव्हा वालावलकरसाहेबांना वाटलं, ह्याचा खून करावा. एक्सपोर्ट ऑर्डर्स तुंबल्या होत्या. कंपनीच्या उत्पादनाला बाजारात प्रचंड मागणी होती. पण तेवढं उत्पादनच होत नव्हतं. अर्ध्याअधिक एक्सपोर्ट ऑर्डर्स वेळेवर डिलिव्हरी न गल्याने कॅन्सल झाल्या आणि लाखो रुपयांचं नुकसान झालं. साहेब ह्यामुळे अतिशय अस्वस्थ झाले. अतिशय.

त्यांनी त्या भरातच फोन उचलला आणि प्रॉडक्शन मॅनेजरला लावला. त्याला हवा तसा फायर केला. आणि 'प्रॉडक्शन वाढव नाहीतर नोकरी गेली समज,' इथपर्यंत ते वाटेल ते बोलले. प्रॉडक्शन मॅनेजरने हाताखालच्या सर्व सुपरवायझर्सना बोलावून झाडले. पण कामगार ऐकायलाच तयार नव्हते. 'स्लो वर्क' हा युनिअनचा आदेश होता. सगळे त्यापुढे हतबल झाले.

तो दिवसच साहेबांना फार अस्वस्थतेत गेला. त्या दिवशी साहेबांनी दिवसभर कुणाला न कुणाला उगाचच काहीतरी कारणं काढून फायरिंग दिली. दोन महिन्यांपैकी एक महिना संपत आला होता. दुसऱ्या महिन्यानंतर साहेबांना पुन्हा मागण्यांचा प्रश्न हाताळायचा होता.

त्या दिवशी साहेबांची मर्सिडीझ गेटमधून बाहेर पडली आणि वॉचमेन सलाम ठोकून मोकळे झाले. बंगल्यात गाडी पार्क करून साहेब घरी आले त्यांचं डोकं काही ठिकाणावर नव्हतं. दिवसभर फायरिंग करूनसुद्धा त्यांचं समाधान झालेलं नव्हतं. आल्या आल्या त्यांना पडवीत द्वारका दिसला नाही. ते लाल झाले. त्यांनी तरातरा आत जाऊन लीलाताईंना विचारलं, 'द्वारका कुठं गेला.' त्यांच्याकडून समाधानकारक उत्तर न मिळाल्यानं साहेब तसेच कपडे न काढताच बाहेर आले. लॉक करून ठेवलेली गाडी पुन्हा बाहेर काढली आणि तिने वेग घेतला.

गाडी वस्तीत जाऊन उभी राहिली. त्या वस्तीत ती गाडी म्हणजे उकिरड्यावर मोठा बत्तासा पडावा तशी दिसत होती. चौकशी करीत करीत साहेब प्रेमाच्या कोठीसमोर आले. चार-पाच वेश्या आपले अंगविक्षेप करीत माना हालवीत होत्या. दोन-तीन लाल तोंडाचे दलाल पुढे आले.

'क्यूं साब, आपके चाहिये कोई...?'

'इधर तुम द्वारका नामके आदमीको जानता है क्या?'

'द्वारका? नही भै. इधर आता है क्या?'

'वो अभी इधरही कही होना चाहिये.'

'कैसा है?'

'वो हाफ पॅंटवाला जरा हाफमॅड है.'

'हां हां. वो रे अपना ब्रह्मचारी. वो प्रेमाके पास है साब.'

'किधर है प्रेमा?'

'वो इधर सामने.'

त्या दलालांच्याबरोबर साहेब माडी चढून वर गेले तेवढ्यात त्या दलालांनी 'प्रेमा ओ प्रेमा' अशी जोरात हाक मारली. थोड्याच क्षणात प्रेमा बाहेर आली. तिचं ते सौंदर्य पाहून वालावलकरसाहेब दंग झाले. वेश्या इतकी सुंदर असू शकते ह्यावर त्यांचा विश्वासच बसेना. तिचा तो बांधा, तो केतकी गोरा वर्ण, त्या गालाच्या खळ्या, ते मासोळी रेखीव डोळे, वेश्येच्या चेहऱ्यावर न आढळणारी निरागस चमक आणि वेश्यांच्या इतर गोष्टींतले बरेच अपवाद-साहेब खरोखरीच पाहत राहिले.

प्रेमाच्या पाठोपाठ द्वारका बाहेर आला. दाजीला इथे पाहून त्याच्या पायांना कंपच सुटला. दातखीळ बसायची वेळ आली. साहेब पुढे झाले आणि द्वारकाच्या फाडकन्‌ मुस्कटात लगावली. बकोटीला पकडून त्याला गाडीत टाकले आणि वेगाने गाडी अंधर बंगल्यात शिरली. द्वारका अतिशय अपमानित झाला होता. त्याला एरवी मान-अपमान नव्हता, पण प्रेमाच्या समोर मुस्कटात खाणे ह्यापेक्षा मोठा अपमान नाहीच, अशी त्याची मनोधारणा होती. द्वारका त्या दिवशी रात्री ओक्साबोक्शी रडला. रडत रडतच झोपला. दाजीबद्दल त्याच्या मनात घृणा, तेढ निर्माण झाली.

साहेबांनी कपडे उतरवले. थंड पाण्याने तोंड धुतले तरी त्यांची अस्वस्थता जात नव्हती. आजही 'जेवायचं नाही' सांगून ते खोलीत सिगारेटचा धूर सोडत बसले. अनेक विचार त्यांच्या मनात घिरट्या घालीत होते. साहेब शरीराने जवळजवळ मेल्यासारखे झाले होते. मनाने ते कुठे कुठे फिरत होते ते त्यांचं त्यांनाच ठाऊक. साहेब खूप वेळ विचारमग्न राहिले. लीलाताई म्हणाल्यासुद्धा, 'झोपा आता, पुरे झालं.' पण साहेबांचं लक्ष नव्हतं. आल्याआल्या वास्तविक ते विकासची कॉलेजची-अभ्यासाची वगैरे चौकशी करीत, पण त्याच्याकडे आज ते फिरकलेही नव्हते.

रात्री अकरा वाजता त्यांना काय कल्पना सुचली कोणास ठाऊक. पुन्हा कपडे करून ते बाहेर पडले. लीलाताईंना त्यांचं ते लक्षण ठीक वाटलं नाही. 'कुठे चाललात?' असं त्यांनी विचारलं. तेव्हा 'एका पार्टीला जायचंय' असं म्हणतच साहेब बाहेर पडले. गाडी बाहेर काढली. फोकस बुबुळासारखे फिरले आणि गाडीने वेग घेतला.

ते पुन्हा त्या वस्तीत गाडी घेऊन जातील ह्यावर कुणीही विश्वास ठेवला नसता. पण गाडी लॉक करून ते भरभर प्रेमाच्या कोठीवर पोचले. प्रेमा गिऱ्हाइकाची वाट पाहतच बसली होती. साहेब तिच्या रूममध्ये शिरले. सूटवाला मघाचा साहेब परत आल्याचं पाहून ती चपापली. तेवढ्यात त्यांनी विचारलंच-

इथे राहायला आवडतं का तुला?'

'इथं रहावं लागतं. आवडत नसलं तरी.'

'हे असलं काम करणं आवडतं का तुला?'

'पोटासाठी करावं लागतं. आवडतं असं नाही. पण सवय झालीय.'

'किती कमावतेस दिवसात?'

'कमीत कमी शंभर.'

'तू बाहेर काम करशील का? चांगली नोकरी?'

'नोकरीत दिवसाला शंभर रुपये कसे मिळणार?'

'मिळतील. पण व्यवस्थित राहावं लागेल. चांगल्या लोकांच्यात. पूर्वीचं सगळं विसरावं लागेल. शिवाय तुझा इकडचा नरकवास संपेल.'

**रात्री अकरा वाजता साहेब गाडी घेऊन बाहेर पडले. कुठे चालले होते ते?**

'शंभर रुपये रोज मिळणार असतील तर चालेल.'

'उद्या ऑफिसवर ह्या माझ्या पत्त्यावर येऊन भेट.' कंपनीचं व्हिजिटिंग कार्ड तिला देत साहेबांनी सांगितलं. जाता जाता त्यांना पुन्हा आठवण झाली.

'हे बघ, ऑफिसवर येशील तेव्हा चांगलं पातळ, वेणी, चपला, पर्स वगैरे अशी ये. लोकांना तुझं रूप कळता कामा नये. तुला आता बदलावं लागेल.'

पुन्हा पहिल्यासारखं भरभर भरभर उतरून त्यांनी गाडी सुरू केली. काही क्षणांतच त्यांनी बंगला गाठला आणि आज मात्र ते शांत झोपले–दारू न घेता.

● ●

प्रेमा जेव्हा साहेबांच्या केबिनमध्ये घुसली तेव्हा तिकडच्या सर्व स्टाफ मेंबर्सच्या नजरा तिच्याकडे वळल्या. सरळ वेणी घातलेली, त्यावर मोगऱ्याचा मादक गजरा माळलेला, कपाळाला मध्यभागी बारीक कुमकुम, कानामध्ये फॅशनेबल रिंग्ज, हिरवी पोपटी साडी, तसाच मॅचिंग ब्लाऊज, पायात हीलच्या लेडिज चपला, काखेत कमरेपर्यंत लोळणारी पर्स, आणि तोंडावर बोलावणारे हसू. सगळे स्टाफ मेंबर्स सावरून बसले. साहेबांकडे ही अनोळखी पोरगी कोण असा प्रश्न त्यांना पडला पण हे त्यांनी ताडले की, बहुतेक नोकरीसाठी ओळखीने आली असणार. मग नंतर ती कुठल्या डिपार्टमेंटला यावी,–ह्यावर काथ्याकुट सुरू झाला. चोरून.

तिचा एकूण थाट पाहून साहेब मनात खूष झाले. आणि आपली योजना यशस्वी होईलच असा विश्वास त्यांना वाटू लागला. साहेबांनी तिला बसण्याची खूण केली. तिला तसंच बसवून त्यांनी तीनचार फोन कॉल्स अटेंड केले, नंतर तिच्याकडे वळून ते म्हणाले,

'हे बघ, ही आमची कंपनी आहे. इथे कंपनीत बाराशे माणसं काम करतात. इथे कँटिन आहे. खूप स्वस्तात इथे खाना मिळतो. ही झाली आमच्या कंपनीची ओळख. आता तुझी कामगिरी. पहिली गोष्ट म्हणजे तुला आमच्या कंपनीत नोकरी करावी लागेल.'

'पण मला तर, काहीच काम येत नाही.' प्रेमाने नाजूक स्वरातच सांगितले.

'त्याची आवश्यकता नाही. आमच्या इथे पॅकिंग डिपार्टमेंटला बायका काम करतात. ते नुसतं हाताचं काम असतं. त्यात विशेष काही नसतं. पगार चारशे रुपये मिळेल.'

'पण तुम्ही म्हणाला होता की, शंभर रुपये रोज मिळणार.'

'ऐकून घे. हा चारशे रुपये पगार तुला कंपनीकडून मिळेल, कंपनीच्या कामाचा. माझी कामगिरी निराळी आहे. ह्या कामगिरीसाठी तुला रोज शंभर रुपये मिळतील. म्हणजे महिना तीन हज्जार. पण कामगिरी फत्ते होण्यापूर्वी फक्त पाचशे मिळतील. अडीच हजार नंतर. पुढे प्रत्येक महिन्याला तीन हजार काही न करता.'

'काय काम आहे?'

'काम सोपं आहे आणि ते फक्त तुलाच जमण्यासारखं आहे नीट ऐक. पहिली गोष्ट म्हणजे तू एक लेडी वर्कर म्हणजे कामगार बाईमाणूस असणार आहेस. तुझं जे पॅकिंग डिपार्टमेंट आहे त्याच्याच शेजारी असेंब्लिंग डिपार्टमेंट असेल. ह्या खात्यात प्रभाकर शेलार नावाचा कामगार आहे. हुशार आहे. तडफदार आहे. बारीक निरीक्षण करणारा आहे. तो इथला युनिअन लीडर आहे. युनिअन म्हणजे इथल्या बाराशे कामगारांची एकजूट आहे. आणि ते फार मोठी, न परवडणारी पगारवाढ मागताहेत. सर्व कामगारांना हा प्रभाकर शेलार चिथावणी देतोय. तोच त्यांचा मुख्य आहे. मनुष्य तरुण म्हणजे सव्वीस सत्तावीसचा आहे. म्हणजे तुझ्यापेक्षा दोन एक वर्षांनी मोठा असेल.

'प्रभाकर शेलार तरुण आहे. तू तरुण आहेस. तुझ्याकडे सौंदर्य आहे आणि माणूस घायाळ करण्याची शक्ती आहे. तू काम करताना प्रभाकर शेलारला दिसशील अशीच व्यवस्था असेल. मला वाटते तोच तुझ्यासाठी वेडा होईल. आणि तुझं काम म्हणजे त्याला मुठीत ठेवायचा. त्यांच्या गोटातील बातम्या, त्यांचे पुढचे बेत आदी गोष्टी माझ्यापर्यंत पोचवायच्या. तुमच्या युक्त्या प्रयुक्त्यांनी त्याला अधीर कर. घायाळ कर. त्याला पूर्ण विश्वासात घे. आता एक महिन्यानंतर मी 'शब्द' न पाळल्याने कामगार गोंधळ करतील. त्यापूर्वीच एवढ्या अवधीत शेलार तुझ्या पुरा मुठीत आलेला असला पाहिजे. मग पुढे काय करायच ते सांगतो. पण कामगिरी एवढीच, त्याला घायाळ करून मुठीत ठेवायचा.'

'दुसरी गोष्ट. तुझे कोणी नातेवाईक आहेत का?'

'आहेत.'

'कोण कोण?'

'फक्त आई आहे.'

'तुम्ही तिकडे वस्तीतच राहता का?'

'हो.'

'मग तुला एक गोष्ट करावी लागेल. तू आणि तुझी आई दोघांसाठी मी एक भाड्याची डबलरूम देतो. चांगल्या वस्तीत. भाड्याबिड्याची काळजी नको. पण तू वेश्या होतीस ह्याचा कुणालाही थांगपत्ता लागता कामा नये. मग काय, जमेल ना कामगिरी?'

'रोज दहाजणांना घायाळ करणारी मी. एकाला कधीच 'गार' करीन. त्याच्या युक्त्या आमच्याकडे हव्या तेवढ्या आहेत.'

'गुड. हे बघ, तू कुठे राहायला जाणार आहेस हे त्या वस्तीत कळता नये. नाहीतर तुमचे दलालबिलाल तिकडे यायचे.'

'नाही, नाही. त्याची काळजी नको.'

'मी सांगतो त्याप्रमाणे कर. वस्तीतून एकदम नाहीसं व्हायचं. तुझ्या आईला अगोदर कल्पना देऊ नकोस ह्याची. एकदम नव्या जागेतच घेऊन ये. म्हणजे ती बडबड करायची नाही. हं, आणखी तुझा धंदा आता साफ बंद केला पाहिजे. कुणालाही तुझा नवा पत्ता कळता कामा नये. खुद्द माझा भाऊ द्वारका असला तरी. मी गावाला जातेय, अशी चिठ्ठी ठेवून वस्तीतून पळ काढायचा. लक्षात आलं सगळं? उद्या सकाळी पावणेआठला यायचं आणि पॅकिंग डिपार्टमेंटला जायचं. तिकडे तुला काम शिकवतील. लगेच शेलारची माहिती काढायच्या मागे राहा. ठीक आहे? उद्या सकाळी.'

'साहेब, पैसे?'

'हं. हे पाचशे रुपये.' कोटाच्या खिशातून शंभराच्या नोटांच्या चवडीतून त्यांनी पाच नोटा भिरकावल्या. जाता जाता तिला त्यांनी बजावलेच–

'हे बघा, पान खाणं बंद करा.'

● ●

पॅकिंग डिपार्टमेंट वर्कशॉपच्या अगदी एका बाजूला होतं. पण आज ते भर वर्कशॉपमध्ये आणा, असा मेमो आला. ताबडतोब कार्यवाही करा, असे फोन गेले. भराभर चक्रं

फिरली आणि पॅकिंग डिपार्टमेंट अॅसेंब्लिंगच्या शेजारी आलं. हे काय आणि कशासाठी चाललंय हे प्रभाकरला कळेना. पॅकिंग डिपार्टमेंट हलवण्याची काही एक गरज नव्हती. पण ह्या मॅनेजमेंटमध्ये सगळी गाढवं भरलीयत असं म्हणून प्रभाकरने तो विचार सोडून दिला.

● ●

राजा दुधाट शेवटी दुर्दैवीच ठरला. वास्तविक त्यानं जे केलं त्याची काहीही गरज नव्हती. पण राजा ओव्हर पोलिटिकल होता. प्रभाकरचं आणि राजाचं मतांच्या बाबतीत कधीच पटत नव्हतं. राजाचं तत्त्वज्ञान निराळं होतं. प्रभाकरशी न जमणाऱ्या राजकीय पक्षाचा तो सभासद होता. कामगार चळवळीविषयीची राजाची मतं फार मवाळ होती. पण राजामध्ये पाणी होतं. प्रभाकरला मी त्याची मतं बदलायला लावीन असं तो आत्मविश्वासानं म्हणायचा नेहमी. राजा बोलताना तोल सांवरून, सुसंबद्ध आणि संदर्भ न सोडता बोलायचा. अंगाचा किरकोळ राजा निर्व्यसनी होता. पण राजकारण त्याचा वीकपॉईंट होता. कुठलाही कामगार राजाइतका राजकारणात रस घेणारा नव्हता.

राजा ज्या कुठच्या पक्षाचा सभासद होता त्या पक्षाच्या सभेत राजाने एक ठराव मांडला. वालावलकर इंडस्ट्रीजमध्ये आपल्या पक्षाची युनिअन स्थापावी, असं मत त्यानं मांडलं. त्यासाठी तो कष्ट घ्यायला तयार झाला. युनिअनची ध्येये वगैरे तयार करण्याची तयारी त्यानं दाखवली. सभेनं ठराव मंजूर केला आणि राजा गुप्तपणे त्याच्या कामाला लागला. 'आता खरं म्हणजे राजा हे राजकीय भावनाविवशतेच्या अंमलाखालीच करीत होता. ह्यापासून काहीच निष्पन्न होणार नाही आणि उगाच खळबळ माजेल ह्याचा विचारच राजाने केला नाही. तो युनिअन उभारण्याची तयारी करू लागला.

राजाच्या पक्षाच्या मताचे दोन-चार कामगार होते. त्यांना राजाने गाठले. परंतु ही एकजुटीची मजबूत युनिअन असताना दुसरी युनिअन स्थापण्याची गरज नाही असं त्यांनी सांगितलं. वर इशारा दिला. हे असलं लफडं करू नकोस. मार पडेल.

पण राजा बधला नाही. त्यांच्या मागे मागे लागून त्यांना त्याने हैराण केले. त्याच्या युनिअनची गरज पटविण्याकरिता त्याने पन्नास उदाहरणं दिली. शेवटी वैतागून त्याला ते चार-पाच सभासद मिळाले. नंतर राजाने ताळ सोडला. राजाच्या युनिअनचं लफडं आख्ख्या कंपनीभर झालं. प्रभाकर चपापला. हे काय भलतंच चाललंय चांगला एकजुटीने लढण्याचा निर्धार असताना. प्रभाकर ताबडतोब राजाला भेटला. पण राजा एक शब्द ऐकेना. समजावून सांगितलं, कळकळीनं सांगितलं, दम देऊन सांगितलं, सगळ्या सगळ्या प्रकारांनी सांगितलं, पण राजा झपाटलाच होता. राजाने वाटेल ते तारे तोडले. प्रभाकरची युनिअन जमीनदोस्त होणार आहे असं भविष्य त्यानं मांडलं. त्याच्या युनिअनकडे स्वखुशीने कामगार येत आहेत असा प्रचार त्याने चालवला. कामगार हैराण झाले राजाकडे बघून.

प्रभाकरने युनिअनची मीटिंग बोलावली. त्यात राजावर आग पाखडण्यात आली. राजा 'पेशवाई' करणार आहे. असं प्रभाकर म्हणाला. तो म्हणाला, 'ज्याला ज्याला शक्य असेल त्यानं त्यानं राजाचं मन वळवावं. तो काही तरी खूळ लागल्यासारखं करतोय.' मीटिंग संपल्यानंतर जो तो राजावर तापला. 'च्यायची खवडी औलाद राजाची ह्या. साला आयला......'

नऱ्या कांबळे आणि इतर चौघांनी मिळून आणि ठरवून राजाला रात्री गल्लीत गाठले. राजाची बकोट पकडून त्याला दम भरला. पण राजा म्हणाला, 'माझं ध्येय मी सोडणार नाही.' नऱ्याने ढोसली होती. पण शुद्धीत होता. 'नमकहराम' म्हणत नऱ्याने राजाच्या दातावर एक फटका मारला. राजाचे शब्द ऐकून तो भडकला होता. नऱ्याने सुरुवात केलेली पाहून इतरांनीही त्याला चार-दोन लगावले. राजा धापकन खाली पडला आणि त्याच्या दातातून रक्त येऊ लागलं. राजा उठून रक्त पुसत पुसत अडखळत बोलू लागला, 'हे बघा, मी माझं मत आणि कार्य सोडणार नाही.' नऱ्याने आणखी एक फटका मारला आणि मांडीवर लाथ घातली जोरात. मग बरोबरच्या चार-चौघांनी लोखंडी सळयांनी राजाला धुण्यासारखे बडवले. राजा तिथेच बेशुद्ध झाला तेव्हा त्यांनी पळ काढला. दुसऱ्या दिवशी सकाळीच राजाचं प्रेत तिथे रस्त्यावर मिळालं. राजाचा खून झाला हे ऐकून प्रभाकर हादरला. हे कृत्य कोणाचं असेल ह्याचा पत्ता त्याला लागत नव्हता. हे लचांड त्याच्या गळ्यात येण्याचीच शक्यता होती. वातावरण भलतंच कोंदट होऊ लागलं.

नऱ्याला जेव्हा आपल्या कृत्याचा परिणाम कळला तेव्हा तो जाम घाबरला. पण ह्यामुळे पोलीस प्रभाकरला पकडणार असंही त्याला वाटू लागलं. सकाळी दहा वाजताच त्यानं स्वतःला बेड्या घालून घेतल्या. पैशाच्या देण्याघेण्यावरून चिडून मी राजाचा खून केला अशी कबुली त्याने दिली.

प्रभाकर मनस्वी बेचैन झाला. युनिअनसाठी राजाचा आणि नऱ्याचा दोघांचाही बळी गेला होता. नऱ्या युनिअनशी एकनिष्ठ राहिला होता. पळून जाणं, कांखा वर करणं वगैरे त्याला शक्य होतं. पण प्रभाकरसाठी बेड्यांचा दागिना मागून घेतला. त्यामुळेच प्रभाकर वाचला. त्या दिवशी प्रभाकरच्या डोळयातून पाणी आलं. दोनच थेंब.

● ●

सकाळी पावणेआठ वाजता जेव्हा प्रेमा कंपनीत आली तेव्हाच तिला हा प्रकार कळला होता. तथापि तिला त्याच्याशी काही कर्तव्य असण्याचं कारण नव्हतं. आदल्या दिवशी साहेबांकडून चक्रं बरोबर फिरली होती. पॅकिंग डिपार्टमेंटला जाताच येणाऱ्या सुपरवायझरबाईंनी तिचं स्वागत केलं. 'या ! तुम्हीच प्रेमा नाईक का ?'

'हो.'

नंतर प्रेमाला तिच्यासाठी खास म्हणून एक लॉकर देण्यात आला. ह्या लॉकरमध्ये सगळ्या चीजवस्तू ठेवायच्या, पर्स वगैरे. शिवाय कपडे मळू नयेत म्हणून गळयात अडकवायचा एक लांब गुडघाघोळ कपडा

**राजाचा खून झाला हे ऐकून प्रभाकर हादरला.**

दला. हा कपडा गळयात अडकवून शेजारच्या बाईकडून येणाऱ्या बॉक्सवर कंपनीचा रंगीत कागद गोंद लावून चिकटवायचा आणि एक स्टँप मारायचा एवढंच काम प्रेमाला देण्यात आलं.

राजाच्या प्रकरणाच्या मनस्तापामुळे प्रभाकर आज फॅक्टरीला आला नव्हता. त्याचं पंचिंगकार्ड तसंच बोर्डवर बेवारशी पडलेलं होतं.

संध्याकाळी जाताना प्रेमा साहेबांना भेटली. प्रभाकर न आल्याचं साहेबांना अगोदरच कळलेलं होतं. दुसऱ्या दिवशी फास टाकण्याचा सल्ला देऊन त्यांनी प्रेमाला तिच्या नव्या घरी जायला सांगितलं होतं.

प्रेमा एकाएकी गावाला का निघून गेली ह्याचं वस्तीला कोडंच पडलं. उमाबाई, शामाबाई, शेवंती वगैरे सगळया वेश्या तिचाच विषय घेऊन बोलत बसल्या. पदराचं भान ठेवणं हा त्यांच्या लेखी गुन्हाच होता.

द्वारका जेव्हा वस्तीत गेला तेव्हा तोही चक्रावला आणि कधी नव्हे तो विचारात पडला. गावाला जाण्याचं काही प्रेमानं सांगितलेलं नव्हतं. जायचं असतं तर ती नक्कीच बोलली असती. द्वारकाचा विश्वास मर्यादेपलीकडचा होता. काहीतरी विशेष झालं म्हणूनच ती गेली असणार. पण त्यामुळे द्वारका मात्र कमालीचा नर्व्हस झाला. त्या दिवशी वस्तीत येऊन तो 'सुका' परत गेला.

दोन महिन्यांपूर्वीचा प्रसंग द्वारकाच्या मनात केव्हाचा ठाण मांडून बसला होता. तेव्हा एके दिवशी द्वारका असाच प्रेमाकडे गेला होता. प्रेमाच्या शरीराशी खेळत त्यानं विषय एकदम लग्नावर आणला होता. प्रेमाने आपल्याशी लग्न करावे ही द्वारकाची प्रामाणिक पण वेडी इच्छा होती. द्वारका वेडसर होता. त्याची इच्छाही तशीच होती. प्रेमाकडे येणारे सगळेच रंगात आले की असं काहीतरी बडबडायचे. पण द्वारकाचं निराळं होतं. पुरं भोगून झाल्यानंतरही तो तिला लग्नाचं विचारत राहायचा.

त्या दिवशी वैतागून प्रेमानं काहीतरी समजूत काढायची म्हणून द्वारकाला दोन चार थापा मारल्या. 'मी भटजींना विचारलंय. ते म्हणाले, दोन महिन्यांनंतर लग्नाला चांगली वेळ आहे. तेव्हा आपण लग्न करायचं नक्की.' ह्या प्रेमाच्या खोटया शब्दांवर द्वारका वेडा झाला. पडवीत बसून तो स्वतःशीच हसत राहायचा. त्याची इच्छा दोन महिन्यांनी पुरी होणार याची त्याला खात्री होती.

पण आज अचानक प्रेमा गावाला निघून गेली म्हणजे ? काही असो. आठ दिवसांनी ती येणार आणि आपल्याला भेटणार, अशी समजूत द्वारकाने करून घेतली होती. द्वारका पुन्हा पुन्हा प्रेमाचं शरीर डोळयापुढे आणीत राहिला आणि स्वतःच्या लग्नाची स्वप्ने रंगवू लागला. पडवीत बसून हसत राहिला आणि साहेब दिसले की तोंड लपवत राहिला.

● ●

साहेबांचे दोन महिने संपायला पंधरावीस दिवसांचा अवकाश होता. तेवढया अवधीत प्रेमाला हालचाल करायची होती. नंतर साहेब मागण्या नामंजूर करून कामगारांचा गळा घोटणार होते आणि प्रेमाकरवी प्रभाकरला ताब्यात ठेवून त्यांची पॉलिसी दामटणार होते.

प्रेमा यशस्वी व्हावी आणि होईल अशी साहेबांची अपेक्षा होती. कारण प्रेमाकडे शरीराचं आणि सौंदर्याचं भांडवल भरपूर होतं. प्रभाकर तरुण होता आणि अविवाहित होता. शिवाय ते दोघेही जवळजवळ राहतील ही व्यवस्था झालेलीच होती. ह्या कामात प्रेमा स्वतः पुढाकार घेणार होती, त्यामुळे प्रश्नच नव्हता. प्रश्न होता तो म्हणजे दोघांचं जमल्यावर प्रेमा त्याला किती मुठीत ठेवते आणि तो प्रेमाच्या कितपत मुठीत जातो.

पण आपल्या इंटेलेक्चुअल लेव्हलवर साहेब खूष होते. त्यांनी कालच प्रभाकरला ऑफिसात बोलावून त्याच्याशी बोलणी केली. त्याला उपदेशही केला. बोलता बोलता साहेबांनी प्रभाकरला एक गोष्ट सुनावली—

'असं बघा मिस्टर शेलार, मी अगदी सुरुवातीपासून म्हणत आलो आहे की, कामगार अविचारी असतात. तुम्हाला एक गोष्ट सांगतो. दोन गवंडी होते. दोघेही हुशार होते, पण त्यांपैकी जो एक गवंडी होता त्याचा आपल्या कुशलतेवर फाजील भरवसा होता. तो तडकाफडकी काहीही ठरवायचा. भिंत बांधा म्हटलं तर भराभर विटा एकमेकांवर ठेवायचा. ओळंबा वापरायचा नाही. दोघांनाही उंच भिंत बांधायची होती. ओळंबा न वापरणारा एकावर एक वीट ठेवत राहिला. दुसरा ओळंबा वापरून भिंत बांधू लागला. ओळंबा न वापरल्याने त्या अविचारी गवंडयाच्या अंगावर त्यानेच बांधलेली भिंत कोसळली आणि त्याच्याखालीच चिरडून तो मेला. दुसरा मात्र त्याची भिंत पुरी करू शकला. माणसाला जीवनात असाच आपल्या बुद्धीचा ओळंबा वापरावा लागतो.'

ही गोष्ट सांगून प्रभाकरची मनःस्थिती बिघडवायची आणि आत्मविश्वास घालवायचा असा साहेबांचा हेतू होता. प्रभाकरला त्या गोष्टीत बोध दिसला. पण त्याने त्याचा फारसा विचार केला नाही. तो जे करीत होता ते योग्यच होतं, ह्यावर त्याचा विश्वास होता.

आज बरेच दिवसांनी साहेब घरी पोटभर जेवले. आणि जेवल्यानंतर प्रदीर्घ धूम्रपान झाले नाही.

● ●

खटाखट कार्ड पंच होऊ लागली. वेळ सकाळी सव्वासात-साडेसातची होती. प्रेमाला कालच कार्ड मिळालं होतं. प्रेमा जेव्हा पंचिंगम शिनच्या क्लॉकबोर्डजवळ गेली तेव्हा बोर्ड रिकामा होता. कार्ड कसं पंच करायचं ह्याची माहिती तिला हवी होती. ती विचार करीत राहिली. चटकन तिला प्रभाकरची आठवण झाली. अजून त्यांची ओळख झालेली नव्हती. पण प्रभाकर सर्वांच्या आधी डिपार्टमेंटमध्ये हजर असतो, ह्याची माहिती तिला कालच मिळाली होती.

ती चटकन ॲसेंब्लिंग डिपार्टमेंटला गेली. प्रभाकर नुकताच येऊन बसला होता. उचापुरा, पिळदार शरीराचा, सावळा तेजस्वी प्रभाकर प्रेमावरच छाप टाकून गेला.

'अं. आपलं नाव काय ?' प्रेमाने गोंधळून विचारले.

'आपण कोण ?' प्रभाकरचा खणखणीत प्रतिप्रश्न.

'माझं नाव प्रेमा नाईक. मी इथे पॅकिंग खात्यात नवीनच आले आहे. कालपासून.'

'मी प्रभाकर शेलार. इथे ॲसेंब्लिंगला काम करतो. बोला, माझ्याकडे काय काम ?'

'अं. तसं काही नाही. एक छोटंसंच काम होतं. कार्ड कसं पंच करायचं ते दाखवाल का जरा ?'

'हो हो, चला.'

मग कार्ड कसं पंच करायचं हे प्रभाकरनं प्रात्यक्षिक करून प्रेमाला दाखवलं. प्रभाकर ही चीज फालतू नाही हे ती समजून चुकली. पण शेवटी तिचा तिच्या कलेवर विश्वास होताच. प्रभाकरला भुलवणं, हे तिला फक्त आव्हान वाटलं.

● ●

सतत चार दिवस प्रभाकर आणि प्रेमा यांची अर्थपूर्ण नेत्रपल्लवी चालली होती. प्रेमाच्या गालावर खळी पडली की, प्रभाकराच्या मशिनचा तोल सुटायचा. दोन-तीन वेळा पाहिल्यानंतर प्रभाकरचं दुर्लक्ष सुपरवायझरच्या लक्षात आलं. त्याने हलकेच इशारा दिला–

'शेलार, मशिनकडे लक्ष ठेवा. हात सापडेल.'

'हूं हूं'–सुपरवायझर काय म्हणाला हे प्रभाकरला कळलंच नाही. त्यानं नुसतंच हूंहूं केलं. पण पुढच्याच क्षणी बोलाफुलाशी गाठ पडली. प्रभाकरचा हात मशिनमध्ये अडकला, तेव्हा प्रभाकरने जोरात किंकाळी मारली. जखम फार मोठी झाली नाही, पण हातावरच्या त्वचेला धक्का पोचला. ती सोलवटली. हात प्लॅस्टरमध्ये टाकावा लागला. दोन दिवस प्रभाकर हॉस्पिटलात होता. तेव्हा प्रेमाने दोन दिवस बिनपगारी रजा मारली. आणि ती जातीने प्रभाकरच्या सेवेसाठी थांबली. दिवसभर.

संध्याकाळी प्रभाकर प्रेमाला म्हणाला, 'कशाला तुम्ही माझ्यासाठी उगाच इतका त्रास घेता. कालच आपली ओळख झाली.'

'वा. म्हणून काय झालं. माझ्याकडे लक्ष होतं तेव्हा तुमचा हात दुखावला. मी तिथे नसते तर तुम्हाला काही झालं नसतं. माझ्यामुळेच हे झालं.'

'छे छे. तुम्ही काहीतरीच समज करून घेतलाय. दोष माझा होता.'

'दोष तुमचा का माझा ह्यावर आपण नंतर बोलू. पण मी इथे हॉस्पिटलात थांबले ते तुम्हाला आवडलं नाही का?'

'नाही नाही. तसं नाही. उलट तुमच्या उपकारांच्या ओझ्याखालीच मी दबलो.'

'मी अगदी मनापासून, मनात काहीही न ठेवता हे करतेय आणि तुम्ही उपकारांची भाषा बोलता. हे मला नाही आवडलं.' प्रेमाने बेमालूम आव आणला होता. तेव्हा जगातली सर्वश्रेष्ठ अभिनेत्री म्हणूनसुद्धा तिची निवड झाली असती.

प्रेमाने प्रभाकरचे पाय दाबले, घरच्यासारखी सेवा केली. वेळेवर औषध-गोळ्या दिल्या. बाहेरून फळं आणवली, आणि करायचा त्यापेक्षा जास्त स्पर्श करून प्रभाकरला चिवडलं.

मासा गळाला लागला होता.

● ●

भागवत उस्ताद ह्या नावाने पुकारला जायचा. प्रभाकरला पाहायला हा म्हातारा हॉस्पिटलात आला तेव्हा प्रेमा त्याला डोस देत होती. कडू डोसामुळे प्रभाकर तोंड वेडंवाकडं करीत होता. भागवत लहरी होता. त्याला मूड असला म्हणजे बोलण्यात तो सगळा दिसायचा. आज भागवतचा दिलखुश मूड होता. त्यानं तोंड वाजवलंच–

'हां, प्रभ्या! काय डोस पिणं चाललंय काय?'

प्रभाकरने मान हलवली.

'अरे, मान काय हालवतोस. बैल व्हायला वेळ आहे तुला. थोडा धीर धर.'

'अनुभव वाटते तुमचा, उस्ताद!'

'हां, अरे यार! तू आता कडू डोस पिऊन तोंड वेडंवाकडं करतोयस, पुढे खुलशील.'

असं बोलणं सुरू झालं की, प्रेमा साचेबंद लाजायची आणि प्रभाकर फुलायचा. ह्याच भागवतने प्रेमाला मस्तानी हे नाव ठेवलं. 'साली मस्तानीसारखी गोरी आहे. पान खाईल तर रस गळताना दिसेल घशातून,' हे भागवतचेच शब्द. पुढे प्रभाकरची मस्तानी हा शब्दप्रयोग भागवतनीच रूढ केला. असा हा सगळ्यांचा उस्ताद.

● ●

दोन दिवसांनी प्रभाकर पुन्हा कामावर आला. हाताला नाममात्र प्लॅस्टर होतं. प्रेमाकडे पाहून हसत हसत तो मशिनवर काम करीत होता. तो दिवस त्याला अतिशय आनंदाचा होता. संध्याकाळी शिफ्ट सुटली तेव्हा प्रभाकरला प्रेमाने एकाकी गाठलं.

'मला तुमच्याशी काही बोलायचंय...' प्रेमा लाजत म्हणाली.

'बोला. आम्ही ऐकतो.' प्रभाकरचं मोठं उत्तर.

'ऊं...'

'उं उं नको. स्पष्ट बोला. मला स्पष्टपणा आवडतो.'

'आणि मला तुम्ही आवडता.' बोलता बोलता प्रेमाने प्रभाकरच्या गळ्याला मिठीच घातली. प्रभाकरला ते स्वप्न वाटलं. पण भानावर येऊन त्यानं जवळपास–भोवती पाहिलं असतं तर रुजू लागलेलं रहस्य चटकन फुटलं असतं. आपला सुंदर मुखडा प्रेमाने प्रभाकरच्या कुशीत लपवला होता. 'तिच्या चेहेऱ्यावर लज्जेचा समुद्र' वगैरे काव्य प्रभाकरला तिथेच सुचू लागलं. प्रभाकरने प्रेमाला घट्ट प्रतिसाद दिला आणि तो चटकन भानावर आला. कारण कुणीतरी सायकलवरून येताना दिसलं. तो कंपनीचा वॉचमनच होता. प्रभाकरचं नशीब, त्याला काही कळलं नाही.

'तुम्ही मला नीट ओळखत नाही. माझ्यावर एकदम प्रेम बसण्याचं कारण?' प्रभाकरनं प्रश्न केला. प्रेमा आता धीट बनली होती.

'मी पहिल्या दिवशी आले तेव्हा प्रत्येकाकडून मला तुमचे गुणगान ऐकायला मिळाले. तुम्ही कार्ड पंच करायला शिकवलंत तेव्हाच तुम्ही माझे झालात.' प्रेमा हुकमी लाजली.

'उद्या शिफ्ट सुटली की, आपण फिरायला जाऊ. तो अकरा नंबरचा बस स्टॉप माहितंय नं. तिकडं मी उभी राहीन. उद्या हं.' प्रभाकरला जाळं पडल्याचं समजलं नव्हतं.

प्रेमा तीन हजार रुपयाला उपवर झाली होती.

● ●

साहेब जेव्हा एकदम खूष असायचे, तेव्हा ते पाईप ओढायचे. आजही ते असेच पाईप काढून ओढत बसले होते. प्रेमाला कंपनीत आणल्याचं सार्थक झालं होतं. त्यांनी जुगार जिंकला होता. आता ह्या जुगारात त्यांना जिगर दाखवायची होती. प्रभाकरला निष्प्रभ

## प्रभाकरचा मासा गळाला लागला होता....

करायचा होता. आता ते त्यांना सोपं वाटत होतं.

साहेब पाईप ओढत इकडे तिकडे फिरत होते. उंची कापडाचा गाऊन घातलेला त्यांचा देह वनात सिंह फिरावा तसा इकडे तिकडे फिरत होता. बाहेर बागेची पाहणी करण्यात त्यांनी बराच वेळ घालवला. गुलाबाच्या वाढलेल्या फांद्या कापून टाकायच्या आणि पिकलेल्या पपया उद्या काढायच्या असं त्यांनी ठरवलं. लीलाताईंनाही आज साहेब प्रसन्न दिसले. विकासलाही त्यांनी आज बऱ्याच गोष्टी सांगितल्या. डोकं मोकळं असलं की, ते फार किमती बोलायचे. दुसरा ऐकत राहायचा.

आज संध्याकाळी प्रेमाने येऊन जी हकीकत सांगितली, तेव्हा ब्रेव्हो करून त्यांनी एकदम उडीच मारली. इतका त्यांना आनंद झाला. त्यांची मुदत संपायला आता फार दिवस उरले नव्हते. पण ते निष्काळजी होते.

चालता चालता ते पडवीत आले. द्वारका उदास चेहरा करून बसला होता. त्याची नजर 'प्रेमा' शोधत होती. 'कारे उदास असा ?' साहेबांनी विचारलं. पण ते चालतच राहिले. द्वारकाने नुसतं 'ऊं' केलं.

● ●

बागेत हिरव्याजर्द झुडुपाखालच्या अंधाऱ्या जागेत प्रेमा आणि प्रभाकर बसली होती. प्रेमाच्या मांडीवर प्रभाकरने डोकं ठेवलं होतं. आठ-दहा दिवसांच्या कालावधीनंतर त्याच्या मागण्यांचा निर्णय ठरणार होता. त्याचाच तो विचार करीत होता.

'कसला विचार करतोस ?' प्रेमाने विचारलं. तिची लांबसडक पांढरी-लाल बोटं त्याच्या केसाच्या झुपक्यात रुतून नांगरल्यासारखी फिरत होती.

'विचार ? अगं, काही दिवसांच्या कालावधीनंतर आमच्या मागण्या मान्य होणार आहेत, त्यासंबंधी विचार करीत होतो.'

'पण समजा, तुमच्या मागण्या मान्य केल्या नाहीत, तर तुम्ही काय कराल ?'

'काय कराल ? अगं भारी [illegible]ल मॅनेजमेंटला. बेमुदत संप घडवून आणू. त्या वाल्यासाहेबाला तीन दिवस सतत घेरावात पकडून उपाशी ठेवू. साला, काय चेष्टा आहे काय ?'

'अरे, अरे. तू माझ्यावरच भडकलास.'

'तुझ्यावर नाही ग.' पडल्या पडल्याच तिची चिमुकली हनुवटी कुरवाळत प्रभाकर म्हणाला.

'पण प्रभा, तू ह्या कामगारांच्या लफड्यातून स्वतःला सोडवून का घेत नाहीस ?'

'अगं, माझं जीवनच कामगाराचं आहे आणि कामगार-चळवळीसाठीच माझा जन्म आहे. ह्यात निवृत्ती नाही. लढा आहे. फक्त लढा!'

'तुझं बोलणं समजतच नाही.'

'तुला नाही समजायचं ते.' प्रभाकर हताश झाल्यासारखा म्हणाला.

'पण समजा, तुझ्यापुढे प्रश्न पडला की, एक तर मी तरी मिळेन किंवा तुमचा कामगार लढा तरी यशस्वी होईल. तर तू काय उत्तर देशील ?'

'हे म्हणजे तुझा हा मुलगा मारू की तो, असं आईला विचारण्यासारखं आहे.' प्रभाकर चटकन म्हणाला.

प्रेमा खळखळून हसली.

● ●

आज बुधवार होता. बुधवारी आपलं डोकं विशेष चालतं, असा साहेबांचा समज होता. प्रेमाच्या मदतीनं प्रभाकरचा काटा कसा काढता येईल, ह्याचा ते विचार करू लागले. बुधवार आहे म्हणून विचारांती काही जबरदस्त सुचेल यावर त्यांचा विश्वास होता. त्यांनी चटकन सिगरेट पेटवली आणि ते त्यांच्याच सिगारेटच्या धुराकडे अणुबॉम्बच्या धुरासारखे पाहू लागले.

साहेबांनी जेवढ्या सिगरेटी ओढल्या त्यांची लांबी कमीत कमी दोन फूट तरी झालीच असती. तेवढ्या सिगरेटींची थोटकं आत्ताच्या आत्ता त्या ॲश ट्रेला पोटात घ्यावी लागली. पचवावी लागली.

शेवटच्या झुरक्याला साहेब जोरात ओरडले, 'ब्रेव्हो, ब्रेव्हो.' साहेबांचा आवाज ऐकून दोन नोकर धावले. 'अरे अरे शिवराम, धन्या, ब्रेव्हो ब्रेव्हो.'

शिवराम, धन्या बिचारे एकमेकांकडे पाहून प्रश्नार्थक चेहरे करू लागले. 'धनीराम, बेट्या पोपई काढलीस का ? चांगली पिकली होती ती ?'

'होय मालक. कालच काढली.'

'हो का. वा वा. जा, फ्रीज उघडून चार फोडी आणा प्लेटमध्ये. बाकीच्या सगळ्यांना वाटून टाका. तुम्ही खा. चला चला.'

शिवराम, धनीराम पळतच सुटले. पुन्हा साहेब ओरडले, 'अरे बेट्यांनो, बाईमाणूस पाहून पोपई वाटा. तुमच्या बायका नं दुसऱ्यांच्या बायका. काय ?' त्या दोघांनी माना हलविल्या. फुटलेलं हसू दाबत ते पुन्हा कामाला लागले.

साहेबांचं डोकं बुधवारीच चाललं होतं. आणि ही कल्पना महाधूर्त होती. प्रभाकर जिवंतपणी मरणार होता. संपणार होता.

● ●

'प्रेमा, आलीस, बरं झालं.' संध्याकाळी ऑफिस अवर्सनंतर साहेब त्यांच्या केबिनमध्ये आणि संपूर्ण ऑफिसमध्ये एकटेच असायचे. दुसरी शिफ्ट चालू झालेली असायची. त्यामुळे कामगार वर्कशॉपमध्ये असायचे. बाहेर चिटपाखरू नसायचं. फक्त फर्लांगभर अंतरावर कडेकडेने एक एक वॉचमन जांभया देत उभा किंवा बसलेला असायचा.

'प्रेमा, आलीस, बरं झालं. बस.' साहेब उतावीळ होऊन म्हणाले. 'हे बघ, तुझ्यावर मी एक जबरदस्त कामगिरी सोपवणार आहे आणि ती फत्ते करशील, असा तुझ्याबद्दल मला विश्वास वाटतो.'

'कसली कामगिरी ?'

'सांगतो. हे बघ...पण मला अगोदर सांग की, प्रभाकर शेलारचा जेवणाचा डबा मिळवायला तुला काही अडचण पडेल का?'

'नाही. मागितला तर तो देईल.'

'नो नो नो नो नो. तू डबा घेतला होतास हे त्याला मुळीच कळता कामा नये. गुपचूप त्याचा डबा हस्तगत करायचा, हेच ह्याबाबत फार महत्त्वाचं आहे.'

'डबा गुपचूप मिळवला. पुढे काय ?'

'पुढे असं की, त्या डब्यात कंपनीचे काही तयार स्पेअर पार्टस टाकून ठेवायचे आणि हे काम संध्याकाळीच शक्यतो करायचं. असा स्पेअर पार्टस टाकलेला डबा प्रभाकर घेऊन जाऊ लागला की तावडतोब मला खबर द्यायची. अगदी तावडतोब. तो मेनगेटवर पोचायच्या आत. लक्षात आलं ?'

'हो. पण त्याचा उपयोग काय ? तो डबा घेऊन घरी जाईल.'

साहेब हसले. म्हणाले, 'जाऊ दे, फक्त तुला सांगितलं तेवढं कर. काही अडचण असेल तर विचार.'

'साहेब मी प्रयत्न करून बघते. पण अमुकच दिवशी जमेल असं नाही सांगता येणार.'

'हे बघ, दोन-चार दिवसांत कसंही जमव, पण मला ताबडतोब कळव.'

'बरं बघते.'

'प्रभाकरशेठ काय म्हणतायत आणखी?'

'काही नाही. परवा मी विचारलं तुमच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत तर, तुम्ही काय कराल? तर तो म्हणाला, बेमुदत संप करू आणि तुम्हाला तीन दिवस घेराव टाकू.'

साहेब एखाद्या राक्षसासारखे बराच वेळ हसत राहिले.

● ●

प्रभाकरच्या जेवणाच्या डब्यात स्पेअर पार्टस् टाकण्यात प्रेमा यशस्वी झाली आणि ते साहेबांना कळलं. तर, प्रथम साहेबांनी मेनगेटवरच्या सिक्युरिटी ऑफिसरला फोन केला असता. प्रभाकरची कसून झडती घ्यायला सांगितली असती. झडतीत त्याच्या डब्यात स्पेअर पार्टस् सापडले असते.

त्याच्यावर चोरीचा आरोप सिद्ध झाला असता. कारण चोरी रेडहॅंड पकडलेली होती. प्रभाकर डिसमिस झाला असता आणि प्रभाकरच्या युनिअन्चे बाराच काय, तीन-तेराही वाजले असते, आणि तसंच होणार होतं. साहेबांना बुधवारी सुचलेली महाधूर्त कल्पना हीच.

● ●

तीन-तीन वेळा प्रेमाने डबा गडप करण्याचा प्रयत्न केला, पण ती यशस्वी झाली नव्हती. तिलाही हे थोडं कठीण वाटत होतं.

आज मात्र प्रभाकरचं नशीब फुटणार होतं.

फर्स्ट शिफ्ट सुटण्याचा भोंगा वाजला. प्रभाकर हातपाय धुण्याच्या विचारात होता. लॉकर उघडून त्याने कपडे आणि डबा बाहेर काढला. डबा समोर ठेवून कपडे बदलले आणि तो बाहेर आला. तेवढ्यात समोरून प्रेमा येताना दिसली. प्रेमाकडे डबा देत प्रभाकर म्हणाला, 'जरा डबा पकड ग, मी तोंड धुऊन येतो.' एवढं बोलून प्रभाकर भरकन टॉयलेटकडे गेला. पण जाता जाता भागवतनी त्याला थांबवलाच. 'हा हा हा, डबा आमच्याकडे दिला असता तरी चाललं असता हा प्रभ्या.' भागवतच्या बोलण्याकडे लक्ष न देता प्रभाकर टॉयलेटमध्ये घुसला. भागवत प्रेमाकडे जात म्हणाला, 'काय बाई, काय म्हणतोय प्रभाकर?'

'अगबाई, माझा रुमाल खात्यातच राहिला.' म्हणत प्रेमा पॅकिंग डिपार्टमेंटमध्ये घुसली.

'हां हां हां हां, आम्हाला एवढं लाजायची गरज नाही. आम्ही चाललो.' म्हातारा भागवत तरातरा निघून गेला.

प्रेमाने त्याच्या डब्यात जेवढे मावतील तेवढे स्पेअर पार्टस् घातले आणि ती पूर्ववत उभी राहिली. प्रभाकर आपलं प्रसाधन आटोपून ताजा टवटवीत होऊन बाहेर आला. त्याच्या हातातल्या लोंबकळणाऱ्या बॅगेत त्याचा डबा टाकत ती म्हणाली, 'चल जाऊ या.'

चार पावलं न चालतोय तोच प्रेमा म्हणाली, 'अरे तू हो पुढे, माझी चावी लॉकरलाच राहिली काय पाहून येते.'

'बरं, मी बसस्टॉपवर उभा राहतो,' म्हणत प्रभाकर चालू लागला.

प्रेमा श्वास रोखून ऑफिसकडे धावली. साहेब केबिनमध्ये नव्हते. नेमके गेले तरी कुठे साहेब? तेवढ्यात एका कामगाराला सीरिअस ॲक्सिडेंट झाला होता. त्याची व्यवस्था पाहण्यासाठी साहेब गेले होते. वास्तविक कामगारांचे ॲक्सिडेंड वगैरे बाबी साहेबांच्या दृष्टीने क्षुल्लक होत्या. त्यात ते कधी तोंड घालत नसत. त्यांना ते आवडतही नसे. कामगार आणि ते ह्यांच्यात ते जमीन-अस्मानाचा फरक समजत. पण आज ते गेले होते खरे.

प्रेमाने त्याना जवळपास शोधले पण जवळपास ते नव्हतेच. वर्कशॉपजवळ उभ्या असलेल्या ॲम्ब्युलन्सजवळ ते होते. साहेब आले तेव्हा प्रेमा जवळजवळ ओरडूनच म्हणाली, 'साहेब, प्रभाकर डबा घेऊन गेलाय!!'

साहेब अक्षरशः उडाले. आणि विजेसारखे फोनकडे धावले. फार फार फार फार त्यांनी डायल फिरवली. 'हॅलो हॅलो. सिक्युरिटी! मेन गेट?...एम. डी. हियर. आता तिथून प्रभाकर शेलार वगैरे कामगार येतील. प्रत्येकाची झडती घ्या. पिशवी, बॅग, खिसे जेवणाच्या डब्यापासून सगळं तपासा. हल्ली फॅक्टरीमधून स्पेअरपार्टस् गडप होतायत. मला आता बातमी आलीय. कुणी तरी काही तरी बाहेर नेतोय.'

'साहेब, प्रभाकर शेलार वगैरे मंडळी आताच गेली.' गेटवरच्या सिक्युरिटी ऑफिसरने सांगितले.

'झडती घेतली? प्रभाकर शेलारसकट सगळ्यांची.'

'हो, रोजच्याप्रमाणेच घेतली.'

'काही सापडलं?' श्वास आणि कान रोखून साहेब विचारत होते.

'काही नाही साहेब.'

साहेबांनी फोन आपटला. आणि क्रुद्ध होत ते उद्गारले, 'ओ ऽ ऽ, हेल विद द लक'

● ●

त्याचं असं झालं की, प्रभाकर नेहमीसारखा झपाझप चालत मेनगेटपाशी पोचला. तेथे वॉचमनसमोर त्यानं हॅन्ड्स् अप केल्यासारखे हात वर केले. वॉचमनने खिसे आणि वरवर तपासले. पिशवी उघडून पाहिली, पण जेवणाचा डबा उघडण्याइतका तो खोलात गेला नाही. आणि नेहमीच्या प्रथाताप्रमाणे त्याने प्रभाकरला सोडून दिला.

जर त्या कामगाराचा ॲक्सिडेंट झाला नसता आणि साहेब केबिनमध्ये असते तर प्रभाकर पकडला गेला असता. कंपनीतून डिसमिस झाला असता. म्हणजेच जिवंतपणी मेला असता.

● ●

डबा उघडला तेव्हा प्रभाकर उडाला. डब्यात स्पेअर पार्टस असतील ह्याची पुसटशी कल्पनाही प्रभाकरला असणं शक्य नव्हतं. ते कंपनीचे स्पेअर पार्टस पाहून प्रभाकरच्या अंगावर सरसरून काटा उभा राहिला. वॉचमनने डबा उघडून पाहिला असता तर काय झालं असतं, ही कल्पना करणं अशक्य होतं.

**'साहेब, प्रभाकर डबा घेऊन गेलाय.'...आणि साहेब अक्षरशः उडाले.**

हा चावटपणा कुणाचा असेल त्याचा विचार प्रभाकर करू लागला. परंतु त्याचं डोकंच चालेना. दिवसभर तर डबा लॉकर-मध्ये बंद होता. चावी फक्त माझ्याकडेच होती. डबा समोर ठेवला आणि कपडे बदलले. मग टॉयलेटला गेलो, तेव्हा प्रेमाकडे डबा दिला. प्रेमाचे हे कृत्य नसेल? नाही नाही, प्रेमाला असल्या गोष्टी काय करायच्यात? मग हे कुणाचं कारस्थान? मला पोचवायचं हे कारस्थान कुणाचं?

कुठल्या मित्रानं तर हे केलं नसेल. नीट काहीच आठवेना. पण असं...अशी मस्करी कुणी करणार नाही. जबरदस्त जीवघेणा प्रकार!

मग? मॅनेजमेंटचं कारस्थान? पण हे कुणामार्फत केलं? छा: छा:! डोकं सुन्न होऊन जातंय. लॉकरला डुप्लिकेट चावी लावून हे कारस्थान केलं नसेल? नाही. तसं जमण्याची शक्यता नाही. लॉकरमध्ये जाणारे–येणारे आपल्याला दिसतात. पण मग कोण? कोण????

प्रभाकरच्या डोक्यात किडे पडले.

● ●

दुसऱ्या दिवशी प्रभाकरने सर्वांना ही घटना खाजगीत सांगितली. पण कुणीही ही मस्करी केली नव्हती. सगळे शपथेवर सांगू लागले. त्यांचे निष्पाप डोळे पाहून प्रभाकरही त्यांना समजू शकला. शेवटी उस्ताद भागवतला त्यानं गाठला. कदाचित त्या उस्तादाचं हे कृत्य असणं शक्य होतं. पण त्याला विचारलं तेव्हा त्यानं एकदम प्रेमाचाच संशय घेतला. बाकी भागवत निर्दोष होता.

शेवटी प्रभाकरने प्रेमाला हा प्रकार सांगितला. प्रेमा म्हणाली, 'तुझ्या हातून डबा घेतला आणि तुझ्याच पिशवीत ठेवला.' चेहऱ्यावरून तीही निर्दोष होती आणि तिला असं काही करून काय मिळणार होतं?

'पण डबा जेव्हा तू हातात घेतलास तेव्हा जड होता का?' प्रभाकरनं विचारलं.

'हे बघ, आता एवढं आठवत नाही. पण डबा हलका नव्हता, बहुतेक.' प्रेमाने छान कोड्यात उत्तर दिलं.

'छा: छा:! हे मॅनेजमेंटचंच कारस्थान. मग त्यांनी मला पकडलं का नाही? छा: छा:! वेड लागेल वेड.'

प्रभाकरने विचार सोडून दिला खरा, पण हे डबा–प्रकरण त्याच्या हृदयावर कोरलं गेलं. ते तो कधीच विसरणार नव्हता.

● ●

मध्येच द्वारकाची तब्येत अचानक बिघडली. डॉक्टरी उपायानं ती सुधारलीही. पण त्याला हवापालट करण्याचा सल्ला डॉक्टरांकडून मिळाला. साहेबांनी द्वारकाला नाशिकला पाठवून दिलं. नाशिकचा त्यांचा राखीव बंगला सुटी, ट्रीप, हवापालट वगैरें-साठीच उपयोगी यायचा. दोन जबाबदार नातेवाईक आणि दोन नोकरमंडळींसह द्वारकाची रवानगी नाशिकला झाली.

अर्थात त्या बंगल्यातही पडवी होतीच. आणि त्याच पडवीत द्वारकाचा हवापालट व्हायचा होता.

● ●

बोर्ड–मीटिंगच्या आदल्या दिवशी दुपारी युनिअनला एक नोटीस आली. उद्याच्या बोर्ड मीटिंगमध्ये मागण्या मान्य होणार होत्या. पण नोटीस भलतीच होती. बेमुदत संप काहीही कारणं नसताना करण्याचा ठराव युनिअनच्या मीटिंगमध्ये पास झाला असल्याचं मॅनेजमेंटला समजल्यावरून युनिअनला असा आदेश देण्यात आला की, कोर्टाची परवानगी नसल्यास असा संप बेकायदेशीर समजण्यात येईल.

वास्तविक असा कोणताही ठराव युनि-अनच्या सभेत झालेला नव्हता. पण संप रोखण्याचं दहशतीचं साधन म्हणून ती नोटीस पाठविण्यात आली. मागण्या जर मान्य झाल्या नाहीत, तरच बेमुदत संप होणार होता.

● ●

बोर्ड–मीटिंग झाली. पण मागण्यांबद्दल काहीच कळलं नाही. बोर्ड मीटिंगच्या अजेंड्यावर हा मागण्यांचा विषय मांडण्याचं विसरल्यानं पुढील बोर्ड–मीटिंगमध्ये ह्यावर निर्णय होईल, अशी छोटीशीच नोटीस सगळ्या बोर्डांवर लावली. प्रभाकर चव-ताळला. कामगार भडकले. नोटीस बोर्डांवर दगडफेक झाली. खाळखाळ काचा फुटल्या.

युनिअनची औपचारिक मीटिंग झाली आणि वालावलकरसाहेबांना बेमुदत घेराव घालण्याचा निर्णय घेतला गेला. ह्या मीटिंग-मध्ये चाललेली बोलणी प्रेमा ऐकत होती. त्यांचा निर्णय ऐकून ती चटकन उठली आणि दिसेनाशी झाली. थोड्याच वेळात साहेबांची गाडी हाय स्पीडने कंपनीच्या गेटबाहेर पडली. दुपारी शेकडो कामगार ऑफिसात घुसले, पण साहेब तीन दिवस रजेवर गेले होते.

● ●

प्रभाकर जाम चरफडला. आपण घेराव घालणार आणि संप करणार हे त्यांना कळलंच कसं? घेरावचा निर्णय होताच त्यांचं तातडीने निघून जाणं आणि प्रेमाचं मीटिंग-मधून निघून जाणं ह्यांची सांगड त्याला समजू शकली नाही. तो नुसताच विचार करीत राहिला. आपण घेराव घालणार हे कदाचित साहेबांनी ताडलं असण्याची शक्यता होती. किंवा ती अनौपचारिक मीटिंग कंपनीच्या आवारातच भिंतीच्या एका आडोशाला चालू असता त्यातील बोलणं एखाद्या ऑफिसरनं ऐकलं असण्याचीही शक्यता होती. पण सगळेच फासे उलटे आणि रहस्यमय का पडावेत, ह्याची कारणं शोधता शोधता प्रभाकर हैराण झाला.

● ●

कोर्टात चालू असलेल्या युनियनच्या दुसऱ्या एका केसचंही तसंच चाललं होतं. कोर्टात साक्षीदार काय साक्षी देणार आहेत, ह्याची माहिती मॅनेजमेंटला अगोदरच सम-जायची. मग युनियनच्या वकिलाची कोर्टात भंबेरी उडायची. प्रभाकर हे सगळं पाहून जळत होता. तरफडत होता. वकील म्हणा-यचा, 'तुमच्यातलाच कोणीतरी फितूर आहे!'

त्या सूर्याजी पिसाळाचं नाव कळलं असतं, तर त्याची धडगत नव्हती.

● ●

प्रभाकरचं डोकं अलीकडे ठिकाणावर नव्हतं. प्रेमाबरोबर फिरायला गेला तरी, तो काय वाटेल ते बडबडायचा. कोर्ट, कचेऱ्या, साक्षीदार, पुढचे डावपेच, सारं सारं तो प्रेमा-समोर फेकळं करायचा.

आणि सकाळीच दोन-तीन कामगार प्रभाकरकडे आले. त्यांचे शब्द ऐकून प्रभा-करला धक्काच बसला. प्रेमा वालावलकर-साहेबांच्या केबिनमध्ये बऱ्याचदा जाते, हे ऐकून तो आवाक झाला.

ते निघून गेल्यानंतर अण्णा सामंत आला. अण्णा सामंत दोनदोन–तीनतीन महिने

कामावर नसायचा. पगार झाला की, हमखास पैसे संपेपर्यंत पिऊन टाईट असायचा. युनियन वगैरेचं त्याला सोयरसुतक नसायचं. गोठ्यातल्या जनावरापेक्षाही त्याचं जिणं भयंकर होतं. पण आज अण्णा शुद्धीत होता. त्यानं आल्या आल्याच हलक्या आवाजात सांगितलं, 'लीडर, पॅकिंग डिपार्टमेंटला ती नवी बाय आलंय ना ती बाजारातली रांड आहे.' त्याचे शब्द ऐकून प्रभाकरने जीव एकवटून त्याच्या श्रीमुखात भडकवली. अण्णा धपकन खाली पडला. प्रभाकर वैतागून एका बाजूला निघून गेला. नंतर डोळे चोळत अण्णा सामंत हळूहळू निघून गेला.

तो गेल्यानंतर आणखी काही कामगार आले. त्यांनी प्रेमाच बातम्या फोडीत असणार म्हणून आरोप केले. हे काय चाललंय, हेच प्रभाकरला कळेना. कोणावर विश्वास ठेवावा, कोणावर संशय घ्यावा हेच त्याला कळत नव्हतं. मात्र अण्णा सामंत जे बोलला ते त्याला मुळीच सहन झालं नव्हतं. खरीखुरीच प्रेमा पूर्वाश्रमी वेश्येचा धंदा करीत होती, हे सिद्ध झालं असतं तरी देखील मोठ्या मनाने प्रभाकर तिचा स्वीकार करायला तयार होता. खूप विचाराती घेतलेला त्याचा हा निर्णय होता. पण कामगारांशी गद्दारी केल्याचं सिद्ध झालं तर, तो प्रेमाला क्षमा करणार नव्हता. मात्र त्याचा विश्वास होता की, कामगारांशी गद्दारी प्रेमाने केलेली नाही. तशी तिला गरजच काय ?

प्रभाकरनं स्वतःला सावरलं आणि प्रेमाची परीक्षा घेण्याचं ठरवलं.

● ●

प्रेमाबरोबर फिरायला जाणं हे आजचं प्रभाकरचं निमित्त होतं. प्रेमावर त्याचं अपार प्रेम होतं. आणि तिचा स्वच्छ स्वभाव, निर्दोषता वगैरे उद्या–परवा मित्रांना दाखवून देणार होता. चालता चालता प्रभाकर प्रेमाला म्हणाला, 'अगं आज कुठं फार लांब जायचं नाही.'

'का ?'

'माझी कामं आहेत युनियनची.'

'कसली ?'

'उद्या...सांगणार नाहीस नं कोणाला ?'

'छे !'

'उद्या वालावलकरसाहेबांच्या बंगल्याजवळ आम्ही मोठी दंगल करणार आहोत. त्यासाठी सोडावॉटरच्या बाटल्या, सळ्या वगैरे आणायच्यात.'

एवढेच सांगून प्रभाकरने आपली सुटका करून घेतली. ही गोष्ट प्रभाकरने फक्त प्रेमालाच सांगितली होती आणि ती खोटी होती.

● ●

साहेबांच्या बंगल्याजवळचा सशस्त्र पोलीस पहारा आणि पोलीस व्हॅन पाहून प्रभाकर पेटला. ह्या सगळ्या मुळाशी प्रेमाच होती. डबा तिच्याकडे दिला होता. भागवत म्हणतो ती पॅकिंग डिपार्टमेंटमध्ये डबा घेऊन गेली होती. स्पेअर पार्टस तिथलेच होते. शिवाय डबा तिनं पिशवीत टाकला.

लोक म्हणतात, तिला वालावलकरसाहेबांच्या केबिनमध्ये जाताना पाहिली.

अण्णा सामंत म्हणतो, 'ती...' म्हणजे पैशासाठी तर ती असं...

कोर्ट, कचेऱ्या, साक्षीदार, डावपेच ह्यासंबंधी तिच्याकडे आपण सविस्तर बोललो. घेरावचा निर्णय असाच फुटला.

आणि हे फासे असे उलटे पडत गेले. ज्याच्यासाठी आज, तमाम बाराशे कामगार, डोळ्यात रक्त आणून अशक्तपणी लढताहेत, त्यांचं रक्तही बाई पिऊ पाहातेय. युनियनसाठी, नेत्यासाठी जीवन बरबाद करणारे नऱ्या कांबळेसारखे कामगार कुठे आणि खोटं प्रेम करून कपट साधणारी ही बाई ! प्रभाकरचे डोळे, विस्तवासारखे तापले. त्याच्या डोक्यात शेगडी पेटली. कानशिलं तापून लाल झाली. प्रभाकर जीवनात पहिल्यांदाच एवढा नागवला.

● ●

दुसऱ्या दिवशी सकाळी प्रभाकर सातलाच आला. रात्रभर न झोपल्यानं त्याचे डोळे आणखीनच लाल झाले होते. रात्रभर विचार करून त्याचं डोकं चढलं होतं. अंगात इस्त्रीसारखा ताप होता.

प्रभाकर प्रेमाची वाट पाहत होता. शिफ्ट सुरू झाली तरी ती दिसत नव्हती. त्याने डोळे मोठे करून तिला शोधली. पण डिपार्टमेंटमध्ये ती दिसेना. त्याच्या मनात एकदम काय सणक आली कोणास ठाऊक.

तो उठला तो तडक ऑफिसात आला. वालावलकरसाहेबांच्या केबिनचा दरवाजा धाडकन उघडून गेला. आत प्रेमा साहेबांबरोबर बोलत बसली होती. तिला पाहताच त्याचे डोळे आग ओकू लागले. पण पुढच्याच क्षणी तो केबिनचा दरवाजा आपटून निघून गेला.

प्रेमाने नंतर चौकशी केली तेव्हा कळले की, बरं नसल्याने आज तो लौकर गेला.

● ●

संध्याकाळी शिफ्ट सुटली तेव्हा साहेबांना भेटून प्रेमा कंपनीबाहेर पडली. शेट्टीच्या हॉटेलात प्रभाकर बसला होता. डोळे होते तसेच लाल होते. येणाऱ्या–जाणाऱ्याकडे पाहत प्रभाकर मान हालवत होता. आयुष्यात पहिल्यांदा त्याने हातभट्टीची घेतली होती.

प्रेमानं जेव्हा शेट्टीच्या हॉटेलात प्रभाकरला पाहिलं तेव्हा प्रेमा त्याच्याजवळ गेली आणि तिनं विचारलं, 'काय म्हणतेय तब्येत ?'

प्रभाकरने कंबरेजवळ हात नेऊन रामपुरी काढला आणि क्षणात प्रेमाच्या गोऱ्या पोटाचा कोथळा बाहेर काढला. शेट्टीच्या हॉटेलात पातेलंभर रक्त सांडलं. त्यात प्रेमा धापकन पडली आणि लगेच तिनं मान टाकली.

'खून, खून, खून, खून, खून खून–' ह्याच शब्दाचे कितीतरी आवाज एकदम घुमले. वातावरण भलतंच भयाण झालं. एकदम प्रचंड गर्दी उसळली, तेवढ्यात पोलिसांची गाडी आली. प्रभाकरला बेड्या पडल्या आणि त्याला व्हॅनमध्ये बसवला

त्या गर्दीतून मार्ग काढत वालावलकरसाहेबांची पांढरी मर्सिडीझ सुर्रकन निघून गेली. शेजारी कुठेतरी, काहीतरी उत्सव होता. लाऊडस्पीकरवर नेमकं गाणं वाजत होतं.

'पाश गुंतले नियतीचे हे
तुझ्या नि माझ्या भेटीत
कुठं पळू मी कशी पळू मी

**आणि हे फासे असे उलटे पडत गेले. शेवटी प्रभाकरने ठरवले....**

गेले मी हरवूनी
सख्या रे घायाळ मी हरिणी.

● ●

ही घटना मधमाशीच्या पोळ्यासारखी फैलावली. पहिला प्रतिध्वनी उमटला—कामगारांमध्ये दुसरी शिफ्ट आपोआप बंद पडली. सगळे कामगार बाहेर पडले. प्रभाकरचा उजवा हात देवळीकर ह्याने सर्व कामगारांना कामावर न जाण्याचा आदेश दिला. मग देवळीकर भागवतसह आठ-दहा जेष्ठ कामगार पोलीस स्टेशनात गेले. युनिअनचा वकीलही गेला. पण त्यांना ताबडतोब भेट मिळू शकली नाही.

आत सवाल-जबाब चालले होते. पण प्रभाकरने गुन्हा मान्य केला होता.

● ●

घरी गेल्या गेल्या वालावलकरसाहेबांना पन्नास फोन आले. फोनवरच त्यांना ती घटना समजली. साहेबांनी पाईप काढला आणि ते मजेत ओढू लागले. नियतीने झुकतं माप त्यांच्या पदरात टाकलं होतं. साहेब बिनशर्त यशस्वी झाले होते. त्यांच्या दृष्टीने सापही मेला होता लाठीही तुटली नव्हती.

साहेब एकदम खूष होते. पाईप ओढता ओढता ते शीळ घालीत होते. सर्वांसाठी त्यांनी ताबडतोब मिठाई मागविली. नोकरांना दहा दहा रुपये पगार वाढवला. द्वारकालाही दोन-चारशे रुपये द्यायचे असं त्यांनी ठरवलं. विकासला स्कूटर आणि लीलाताईंना चार तोळे सोन्याचं बजेटही त्यांनी ठरवलं. तेवढ्यात कंपनी सेक्रेटरीचा फोन आला. त्याचं बोलणं ऐकण्यापूर्वीच साहेबांनी त्याला पुढच्या आठवड्यात बोर्ड ऑफ डायरेक्टर्ससाठी कॉकटेल पार्टी अँरेंज करायला सांगितली. सेक्रेटरी मात्र गंभीर होता. त्याने कामगारांनी काम बंद केल्याचं सांगितलं. कामगार चिडले आहेत. कोणत्याही ऑफिसरला व खुद्द साहेबांना धोका असल्याचेही सेक्रेटरीने त्यांना सांगितलं. कामगारांना शांत करण्याचा उपाय सुचवला. परिस्थिती अशीच चालू राहिली तर कंपनीतील मालमत्ता व जीवित धोक्यात असल्याचंही त्याने सांगितलं. साहेबांनी विचार केला. अर्ध्या तासाने फोन करतो म्हणून सांगितलं. त्यांनी पाईप ठेवला आणि सिगरेट पेटवली.

बरोबर अर्ध्या तासाने फोन खणाणला आणि सेक्रेटरी उडाला. फोन साहेबांचाच होता. साहेब आता काय हुकूम करतात ह्यासाठी सेक्रेटरीने कान टवकारले. गेटबाहेर त्यालाही धोका होता. तशा परिस्थितीत सर्व कामगारांना मॅनेजमेंटच्या बाजूस ओढून घेणं आवश्यक होतं. मागण्या न्याय्य होत्या. आज ना उद्या द्यायलाही हव्या होत्या. मात्र कामगारांना मुठीत ठेवणं, ही साहेबांची आवडती गोष्ट होती. कामगारांच्या आवाजाखाली दबणं हे त्यांना मान्य नव्हतं. खूप विचार झाल्यानंतर त्यांनी सेक्रेटरीला आदेश दिला, 'कामगारांच्या सर्व मागण्या जशाच्या तशा आणि बिनशर्त मान्य झाल्याची नोटीस लावा.' त्याचप्रमाणे गेल्या दोन महिन्यांचे हिशेबाप्रमाणे पैसे दिले जावेत, असंही त्यांनी सांगितलं. सेक्रेटरी अवाक झाला. त्याने फोन बंद केला.

मागण्या मान्य झाल्याचे कळताच कामगार अत्यानंदाने नाचणार, मॅनेजमेंटचा जयजयकार करणार, प्रभाकरचा धिक्कार करणार, प्रभाकरची युनियन मोडणार, ह्याची साहेबांना खात्री होती. पुढचे डावपेचही ठरलेले होते. आता एक नवी 'पगारी' युनियन कंपनीत आणून प्रभाकरच्या युनियनची मान्यता काढून घ्यायची असंही त्यांनी ठरवलं. प्रभाकरच्या युनियनचा अशा प्रकारे शेवट केल्यानंतर कामगार मुकाटपणे काम करतील, कोणताही लेबर प्रॉब्लेम उपस्थित होणार नाही, अशी खात्री त्यांना वाटत होती. कामगारांच्या मागण्या मान्य करण्यापूर्वी त्यांना युनियनचा बळी घ्यायचा होता.

● ●

सर्व मागण्या बिनशर्त मान्य झाल्याच्या नोटिसा कंपनीच्या गेटवर आत बाहेर सर्वकडे लागल्या आणि पैसे चार दिवसांत मिळतील, असे आश्वासनही दिले गेले. ह्यामुळे कामगारांमध्ये प्रचंड खळबळ उडाली. पुन: देवळीकरने आदेश दिला की, कोणीही कंपनीचे वाढीव पगाराचे पैसे घ्यायचे नाहीत. प्रथम आपला लीडर सुटू द्या,हा आदेश बाहेर पडताच शेकडो कामगार त्या नोटिसांवर थुंकले आणि त्या नोटिसा फाडून टाकल्या. पुन्हा एकदा 'प्रभाकर शेलार हमारा लीडर है', 'प्रभाकर शेलार झिंदाबाद', 'युनियन झिंदाबाद' अशा घोषणा घुमल्या.

देवळीकर, भागवत वगैरेंनी दुसऱ्या दिवशी जेलमध्ये प्रभाकरची भेट घेतली. सर्वांचे चेहेरे निस्तेज झाले होते, पण चिडीने पेटले होते. देवळीकरने प्रभाकरच्या मागण्या मान्य झाल्याचे सांगितले. पण तितक्याच त्वरेने कामगारांनी त्या अव्हेरल्याचे सांगितले.

प्रभाकर म्हणाला, 'बंधूनो, आपल्या मागण्या मान्य झाल्या ही मी एक आनंदाची बातमी समजतो. ज्यासाठी आपण लढत होतो ती गोष्ट आज साध्य झालेली आहे. आपल्या यशाचे आपण स्वागतच केले पाहिजे. सर्वांनी ते पैसे स्वीकारावेत असं माझं मत आहे.' प्रभाकर शांतपणे बोलत होता.

देवळीकर भांबावला. 'पण प्रभा, तू आल्याशिवाय आम्ही त्या पैशाला हात लावणार नाही. आम्ही 'ते पैसे घ्या' असं सगळ्यांना कसं सांगू?'

'हे बघा, मागण्या मान्य झाल्या, कारण सर्वांनी लढा दिला म्हणूनच. मॅनेजमेंटने काहीही मेहरबानी केलेली नाही. लढा काही मी एकट्याने दिलेला नाही. तुम्ही—आम्ही—कामगारांनी कुणासाठीही अडून राहावयाचं नाही. सर्वांनी तो पैसा घ्या. आज सर्वांना त्याची गरज आहे. सावकाराचं व्याज फुगू लागलंय. पैसा नाही म्हणून पोट मारण्याची पाळी कामगारांवर येऊ लागलीय. अशा वेळेस तुम्ही एकासाठी हजारोंना नाडणार का? पण एक करा, लढ्याचं एक प्रकरण संपलेलं आहे, हे लक्षात ठेवा. आपली एकजूट कोणत्याही परिस्थितीत अखंड राहील, भक्कम राहील ह्याची काळजी घ्या. ह्यापुढेही तुम्हाला लढावं लागणार आहे. पण क्रांती करण्याचं भाग्य तुम्हाला लाभो, हीच माझी इच्छा आहे. आपले हक्क स्वीकारा. ह्यापेक्षाही कटू आणि कडू प्रसंग येतील. लढताना डगमगू नका. एकजूट कायम ठेवा. मालकांना, भांडवलदारांना माजू देऊ नका. तुमच्या लढ्यात कुणी पडला म्हणून माघार घेऊ नका. लढा अखंड चालू ठेवा. हा न संपणारा लढा आहे. क्रांतीपाशी तो थांबेल. क्रांतीची वाट पाहा. हा माझा संदेश सर्व कामगारांना कळवा. एका प्रभाकरच्या रक्तातून हजारो प्रभाकर उभे राहणार आहेत, हे लक्षात ठेवा.'

प्रभाकरचा निर्धार ऐकून देवळीकर, भागवत वगैरे मंडळी गंभीर झाली. कष्टी झाली.

त्यांनी हृदय दाबून प्रभाकरचा निरोप घेतला. फॅक्टरीतले कामकाज पुन्हा सुरू झाले. मात्र एकजूट कायम होती. अधिक भक्कम झाली होती. प्रभाकरने तुरुंगातून एक पत्रक काढले होते. ते वाचून हजारो कामगार ओक्साबोक्शी रडले.

● ●

शेट्टीच्या हॉटेलांतली ती घटना दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात सविस्तर छापून आली. मोठमोठे मथळे दिले गेले. प्रभाकरचा व प्रेमाचा मोठा फोटो छापला गेला. मात्र वालावलकरसाहेबांनी, पोलिसांना दिलेली माहिती चीड आणणारी होती. त्यांची जबानी वर्तमानपत्रांनी जशीच्या तशी छापली होती. त्यात ते म्हणाले,

'प्रेमा ही एक वेश्या होती. तिची काही कारणाने माझ्याशी भेट झाली. एक तरुण स्त्री त्या नरकवासातून वाचावी म्हणून तो धंदा सोडण्यासाठी मी तिचं मन वळवलं. खुद्द तिलाच तो नरकवास नको होता. तिला उदरनिर्वाहासाठी म्हणून मी माझ्या कंपनीत नोकरी दिली. परंतु प्रेमाचं दुर्दैव संपलेलं नव्हतं.

'आमच्या कंपनीतला युनिअन लीडर प्रभाकर शेलार तिच्याशी लगट करू लागला. त्याबद्दल तिनं एक–दोन वेळा माझ्याकडे तक्रारही केली. मी शेलारना एक–दोन वेळा समज दिली. पण युनिअनचं राजकारण खेळून त्यांनी त्रास मलाही दिला आणि प्रेमाचा छळ चालूच ठेवला. प्रेमा त्याला नेहमी झिडकारत असे. परंतु दमदाटी करून शेलार तिच्याशी सलगी करत. तिला फिरायला घेऊन जात. शेवटी शेवटी हे असह्य होऊन प्रेमानं शेलारना जाब विचारला तेव्हाच शेलारनी चिडून तिचा खून केला असावा."

साहेबांच्या मनातला राक्षस ही जबानी देतेवेळी पर्वत हादरतील असा हसत होता.

● ●

वर्तमानपत्रे नाशिकला पोचली. पडवीत पडलेल्या वर्तमानपत्रात प्रेमाचा फोटो पाहून द्वारका चमकला. लागलीच प्रेमाचा खून झाल्याचेही त्याला कळले. दाजीच्या कंपनी-तल्या माणसाने तिचा खून केलेला कळल्या-नंतर द्वारका थरथर कापू लागला. त्याला दाजीने प्रेमासमोर मारलेली थोबाडीत आठवली. त्या प्रकरणानंतर वस्तीतून निघून गेलेली प्रेमा आठवली. म्हणजे प्रेमा गावाला गेली नव्हती. दाजीने आपल्याला हे सर्व सांगितले नाही. द्वारका असाच विचार करीत राहिला. त्या वेळेला तो वेडाच्या आणि शहाणपणाच्या सीमेवर उभा होता.

त्या सीमेवर असतानाच तो एकदम उठला आणि नाशिक ते अंबर बंगला एवढा पल्ला त्याने त्या भरातच कापला. वेळ सायं-काळची. द्वारका बंगल्यावर आला. आल्या-बरोबर साहेबांनी द्वारकाचे स्वागत केले आणि शंभराच्या चार-दोन नोटा देऊन त्याला 'जा, कुठेही जा, तुझा दाजी खूष आहे,' असं सांगितलं.

साहेब निघून गेला. द्वारकाने त्या नोटा टराटरा फाडून टाकल्या. त्याचं मन कमा-लीचं आक्रंदत होतं. प्रेमा मेली म्हणून दाजींनी आपल्याला दोन-चारशे दिले. प्रेमा मेली म्हणून दाजी खूष होता. प्रेमाच्या जुन्या स्मृती चाळवून चाळवून अंथरुणात तोंड घालून द्वारका सारखा रडत होता. त्याच्याशी लग्नाला तयार झालेली प्रेमा दाजींनी मारली होती, म्हणून दाजी खूष होता.

● ●

दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रांचे नेहमीचे कागद बातम्यांना पुरेनात. आज मथळ्याची बातमी वाचून कधी नव्हे एवढी चर्चा सुरू झाली. बातमीच तशी होती.

'सुप्रसिद्ध उद्योगपती वालावलकर यांचा भीषण खून. वेडसर भावाला अटक.'

द्वारकाच्या प्रेमाला दाजीने मारले म्हणून मध्यरात्री द्वारका दाजीच्या खोलीत शिरला होता. स्वतःची पडवी सोडली होती आणि माळ्याच्या काळ्या धारदार कोयत्याने त्याने दाजीला उभा–आडवा फाडला. दाजीला क्षणाचीही उसंत दिली नाही. क्षणाचीही.

वर्तमानपत्र भरकन संपली आणि लोक म्हणू लागले, 'वालावलकरशेटका भाई पागल है, कोर्ट उसको छोड देगा.'

स मा प्त

## नेहरू आणि सावरकर : पृष्ठ १२ वरून

देशाला दिला. पण ही ध्येये प्रत्यक्षात आण-ण्यास आवश्यक असे कणखर नेतृत्व आणि संघटना कुशलता यांचा अभाव त्यांच्या नेतृत्वाच्या मर्यादा होत्या. नेहरूकन्येच्या काळात ध्येयवाद शब्दापुरताच राहिला आणि सत्ता मिळविणे, टीकविणे व त्यासाठी कारवाया करणे या सत्तेच्या राजकारणावरच सारे लक्ष केंद्रित झाले.

नेहरूंपेक्षा सावरकरांच्या राजकारणाची बैठकच निराळी. त्यांच्या हिंदुत्ववादाबद्दल मतभेद होतील, पण त्यांचा प्रखर बुद्धिवाद ध्येयवाद, क्रांतिवाद आणि समाजसुधारणा-वाद या बद्दल मतभेद होण्याचे कारण नाही. सशस्त्र क्रांतिकारक, समाजसुधारक आणि हिंदुत्ववादी हे त्याच्या चरित्राचे तीन टप्पे. अहिंसेवर त्यांचा विश्वास नव्हता पण जन-तेच्या मनातील भीती घालवून तिला संघ-टित प्रतिकारास गांधीजींच्या अहिंसा मार्गाने तयार केले हे कसे अमान्य करता येईल? सावकारांसारख्या सशस्त्र क्रांतिकारकांचा ध्येयवाद, जिद्द, त्याग त्यांनी सोसलेल्या हालअपेष्टा यामुळे त्यांच्याबद्दल जनतेत आदर होता पण सशस्त्र क्रांतीच्या मार्गाच्या मर्यादा स्पष्ट झाल्या होत्या.

अंदमानातून मुक्त झाल्यावर सावरकरांना रत्नागिरीस स्थानबद्ध करण्यात आले. राज-कारणात भाग घ्यावयाचा नाही असा निबंध त्याच्यावर होता त्यामुळे या काळात समाज सुधारणेवर त्यांनी लक्ष केंद्रित केले. सामा-जिक सुधारणांसंबंधी त्यांचे लेख 'किर्लोस्कर' मध्ये याच काळात प्रसिद्ध झाले. 'गाय हा उपयुक्त पशु आहे' असे मत एका लेखात त्यांनी मांडले होते. त्यांच्या हिंदुत्ववादी भक्तांना हा सुधारणावाद पेलणारा नव्हता. 'यंत्राने का बेकारी वाढते?' या लेखात आधुनिक यंत्र युगाचा पुरस्कार त्यांनी केला होता व बेकारी यंत्रांनी वाढत नसून चुकीच्या अर्थव्यवस्थेमुळे निर्माण होते असे मत मांडले होते. सावकारांच्या या विचारांमुळे ते समाजवादी चळवळीकडे झुकतील असे काहींना वाटत होते त्यांच्या तर्कशुद्ध बुद्धि-वादाची तीच योग्य परिणती झाली असती.

पण निबंध उठल्यावर त्यांनी हिंदुमहा-सभेच्या राजकारणास वाहून घेतले. त्यांचे हिंदुत्ववादी राजकारण जनमताची पकड घेऊ शकले नाही, जनतेपासून ते अलग पडले. पण १९०८ च्या क्रांतिकारक सावकारां-बद्दल जनतेच्या मनात अजूनही आदराचे स्थान होते. याच भावनेतून त्यांच्या मृत्यू-नंतर सबंध देशाने आपले मतभेद विसरून या त्यागी, झुंजार क्रांतिकारकाला श्रद्धांजली वाहिली, क्रांतिकारक सावरकर समाजवादी चळवळीकडे न वळता हिंदुत्ववादी राज-कारणाकडे का वळले याबद्दल अधिक संशो-धन होणे आवश्यक आहे. □

सर्वोत्तम लेखक ('टाईम') वरून

# थॉमस मॅन

परिचय : जे. एन. पोंडा
(फिनिक्स लायब्ररी, पुणे)

आता थॉमस मॅन (१८७५-१९५५) कडे बघू या. या जर्मन कादंबरीकाराला १९२९ मध्ये नोबेल पारितोषिक दिले गेले होते. त्यांनी समीक्षणे व लघुकथासुद्धा लिहिल्या आहेत. थॉमस मॅनला प्राऊस्ट आणि जॉईस यांच्या पंक्तीत सहज बसवता येईल. थॉमस मॅनने तंत्राला कमी महत्त्व दिले आहे, परंतु माणसांतला माणूस शोधणे याला जास्त महत्त्व दिले आहे. The Magic Mountain व Joseph and his Brothers ही मॅनची पुस्तके 'विसाव्या शतकातील सर्वोत्तम पुस्तके' या यादीत आहेत. The Magic Mountain ही एक dialectical (संवादाची व युक्तिवाद शास्त्राची) कादंबरी आहे. पाश्चिमात्य माणसाचा व संस्कृतीचा ती वेध घेऊ पाहते. पण त्यापुढे थॉमस मॅनने जी प्रणाली लिहिली त्यात मात्र त्याने माणसाचे origin, essence व goal काय याचाच आढावा घेतला आहे.

'Life is sucking and secreting entity and voluptuous impurity!' असली वाक्ये थॉमस मॅन लिहितो. हे वाक्य The Magic Mountain मधील आहे.

मॅनच्या बहुतेक सर्व लिखाणात मनुष्याचा मृत्यूवरचा विजय आणि काळ व वेळ याविषयी वेध घेतलेला असतो. एक दृष्टिकोन असा आहे की, थॉमस मॅन यांनी कला व neurosis आणि sickness व genius यामध्ये निश्चितच संबंध आहे असे त्यांच्या साहित्यात दाखवले आहे.

पहिल्या विश्वयुद्धाची सुरुवात झाली मात्र, आणि या संवेदनाशील जर्मन लेखकाने लेखणी तात्पुरती खाली ठेवली. युद्धाच्या काळात मॅनला साहित्यनिर्मिती करायचे फारच कठीण होऊन बसले. तरी पण त्यांनी थोडा वेळ गेल्यानंतर Reflections of an Unpolitical Man हे पुस्तक लिहिले. पहिल्या विश्वयुद्धानंतर थॉमस मॅन हा खऱ्या अर्थाने युरोपिअन लेखक झाला. त्या आधी तो फक्त जर्मन लेखकच होता.

दुसऱ्या महायुद्धात नाझींच्या आगमनानंतर थॉमस मॅनने जर्मनी सोडली. तो स्वीत्झलँड व त्यानंतर अमेरिकेत राहू लागला. तिकडून त्याने फॅसिझमविरुद्ध लढत दिली. थॉमस मॅनचे शेवटचे महत्त्वाचे पुस्तक म्हणजे डॉ. फॉस्टस. या पुस्तकात कलाकार व त्याचे जगात स्थान, जर्मनीचे पतन व जर्मनीची शक्ती या विषयांना थॉमस मॅनने गवसणी घातली आहे.

एक प्रश्न थॉमस मॅनला पुष्कळ वेळा सतावीत असे आणि तो म्हणजे कलाकारांनी स्वतःला किती शिस्त लावून घ्यावी व त्यांनी किती बेछूटपणे वागावे. पण मला वाटते हा प्रश्न जेवढा कलाकाराच्या जिव्हाळ्याचा आहे, तेवढाच सामान्य व्यक्तीचा. कलाकार हा शेवटी माणूसच असतो, मग त्यांच्या बाबतीत व समाजाच्या बाबतीत दुहेरी धोरण ठेवून कसे चालेल? या जगात प्रत्येकाला स्वतः व स्वतःचे कार्य हेच जास्त महत्त्वाचे वाटते. पण प्रत्यक्षात अर्थात तसे नसते.

जर्मन साहित्यात विनोदी कादंबरी जवळ जवळ नाहीच. पण थॉमस मॅनने तेही करून दाखवले. १९५४ मध्ये त्याने Confessions of Swindler Felix Crull ही विनोदी कादंबरी लिहिली.

# विल्यम कथबर्ट फॉकनर

(१८९७-१९६२)

या अमेरिकन कादंबरीकार व लघुकथालेखकाला १९४९ मध्ये नोबेल पारितोषिक व १९५५ मध्ये पुलीत्झर पारितोषिक मिळाले होते. फॉकनरची थीम म्हणजे मानवी मनातला संघर्ष. त्याने जवळजवळ वीस कादंबऱ्या लिहिल्या. या पुस्तकात त्यांनी मानवी मनातल्या संघर्षाची परिणती हिंसेत कशी होते ते दाखवले आहे. त्याच्या कादंबऱ्यांची पार्श्वभूमी बहुतेक दक्षिण अमेरिका असते. तेथील काल्पनिक नाव त्याने योकनापाटावपा काउंटी असे दिलेले असते. त्यात दक्षिण अमेरिकेतील झालेल्या यादवीयुद्धाच्या आख्यायिका भरपूर असतात. फॉकनरच्या आजोबांची स्वतःची रेल्वे कंपनी

सर्वोत्तम लेखक ('टाईम'वरून) या माझ्या लेखमालेबद्दल वाचकांकडून मला बरीच पत्रे आली आहेत. त्यातील थोड्या पत्रांवरून व काही वाचकांच्या समक्ष भेटी झाल्या त्यावरून असे वाटते की, वाचकांचा समज असा आहे की, ही लेखमाला मी 'टाईम' मासिकातून भाषांतरित करीत आहे. वस्तुस्थिती तशी नाही. ७ मार्च १९७७ च्या 'टाईम'मध्ये फक्त विसाव्या शतकातील सर्वोत्तम लेखकांची नावे व त्यांच्या पुस्तकांची नावे इतकेच काय ते आले होते. या लेखांसाठी कधी कधी संदर्भग्रंथांतून व माझ्याकडे असलेल्या कात्रणांतून मी माहिती घेतली आहे. बाकी सर्व माझे स्वतःचे आहे.

होती व वडीलांचा घोड्यांची पागा होती. त्यामुळे फॉकनरने घोडेस्वारीचा भरपूर अनुभव घेतला. व त्याची ही अश्वारुढ झालेल्या व्यक्तींची "अश्वनिष्ठ" वर्णने त्याच्या पुस्तकात आढळतात. त्याने कविताही लिहिल्या आहेत.

विल्यम फॉकनर हा सुद्धा जेम्स जॉईस व मार्सेल प्राऊस्टसारखा Stream-of-Consciousness expert होता. कधी कधी त्याच्या एकाच कादंबरीत दोन कथानके असतात. वरवर या कथानकांचा संबंध नसतो व कथानकांची सुरुवात भूतकाळापासून होते. म्हणजे फॉकनर तुम्हाला भूतकाळातून भविष्यकाळाकडे नेतो. जिथे जिथे Stream-of Consciousness भाग येतो तिथे तिथे तो इटॅलीक्स वापरी. यामुळे एकाच विचारमालेचे वेगळे वेगळे पैलू वाचकाला कळतात. कधी कधी पुढे काय झाले व होईल हे वाचकाच्याच कल्पनेवर सोडत असे. The Sound and The Fury मध्ये दोन भावांमधला Stream-of-Consciousness चा वेध फॉकनर घेतो व मानसिकरीत्या पंगू असलेल्या तिसऱ्या भावाच्या मनाचे पापुद्रेसुद्धा तो अत्यंत कौशल्याने उलगडतो.

विल्यम फॉकनर प्रकाशझोतात आला तो Sanctuary या पुस्तकामुळे. जसजसे फॉकनरचे वय वाढत गेले तसतशी त्याची शैली अलंकारिक व थोडीशी पोकळ होत गेली. तो एकदा म्हणाला होता; "Purity is a negative state and therefore contrary to nature." Purity is sterile, non-life. God created sin, that life might proceed." स्वतःच्या अनुभवावरून, स्वतःच्या स्वभावधर्मावरून मनुष्यप्राण्याला अशी Sweeping विधाने करण्याची सवय असते. फॉकनरने कधी पावित्र्य पाहीलेच नाही, अनुभवलेच नाही म्हणून जीवनात पावित्र्य नाहीच हे म्हणणे किती गैर आहे ते कळून येईल. तरीपण पतनातसुद्धा माणूस स्वाभिमानी राहू शकतो असे फॉकनरची पात्रे आपल्याला जाता जाता सांगून जातात. ज्याला empathy म्हणतात (म्हणजे दुसऱ्याच्या व्यक्तिमत्त्वात शिरून कल्पनेने त्याच्या अनुभवविश्वात वावरायचे) ती फॉकनरने पुष्कळच प्रमाणात साधली होती. □

## जोसेफ कॉनरॅड
## (१८५७–१९२४)

त्याची तीन पुस्तके यादीत आहेत– 1. Nostromo. 2. The Secret Sharer 3. Heart of Darkness.

वीस वर्षांपर्यंत हा लेखक नाविक होता. अर्थात सर्व कलाकृतीत (कादंबरीतसुद्धा) आत्मचरित्रात्मक मजकूर बराच असतो. जोसेफ कॉनरॅडनेही त्याच्या कादंबऱ्यांत सागरातील भयानक वादळाची वर्णने केली आहेत, व जंगलातल्या निरव स्तब्धतेची चित्रणे आहेत. कॉनरॅडचे तंत्र म्हणजे वेगवेगळे लोक त्यांच्या दृष्टीकोनातून कथानक उलगडतात. त्यामुळे त्यात एकप्रकारची असंबद्धता येते. त्याशिवाय त्याच्या पुस्तकात अरेबिअन नाइटस्सारखे कथानकातून कथानक निर्माण होते. विषयांतरही होते. त्याचे हे तंत्र चित्रकाराच्या Impressionist तंत्रासारखे आहे. कॉनरॅडची बरीच पात्रे एकाकी असतात आणि त्या पात्रांना तो एकाकीपणा घालवायची संधी फार उशीरा मिळते.

कॉनरॅड हा जातीने Pole होता. त्याचे संपूर्ण नाव थीओडॉर जोसेफ कॉनरॅड कॉरेझेनी ऑवस्की असे होते. इंग्लंडमध्ये त्याने २१ व्या वर्षी प्रवेश केला व इंग्रजी भाषा शिकायला त्या वेळेलाच सुरुवात केली. तरीपण कॉनरॅडच्या हातात इंग्रजी भाषा जणू प्लॅस्टर ऑफ पॅरीससारखी होती. त्याला पाहिजे तशी तो वाकवत होता, फिरवत होता, आकार देत होता. □


**–नवीन दाखल झालेली काही पुस्तके–**

| | | |
|---|---|---|
| १. | सिंहासन–(कादंबरी) अरुण साधू | रु. २५/– |
| २. | वाळवंटातील चंद्रकोर– (अरब देशाचे प्रवासवर्णन) गिरीजाकीर | रु. १२/– |
| ३. | वेवखुणा–(कादंबरी) श्रीपाद जोशी | रु. १०/– |

–English–

| | | |
|---|---|---|
| 1. | **The Loch Ness Story** (Inside Story of the fantastic monster) | Rs. 11–20 |
| 2. | **The Territorial Imperative** –(Bestseller-Behavioural psychology) – (Robert Ardrey) | Rs. 14–40 |
| 3. | **How The Good Guys Finally Won**– (Bestseller–A. (warn & funny book about the fall of Nixon.) — Jimmi Breslin. | Rs. 16–45 |
| 4. | **The Super Secs** – (Bestseller–Sex lives of Hollywood Stars) | Rs. 11–20 |
| 5. | **The Violent Enemy** – (Bertseller–Suspense thriller) – Jack Higgins | Rs. 9–60 |
| 6. | **Valency Girl** – (Best Seller–Novel) – Robin Moore | Rs. 18–35 |

- Watching TV will make you a conformist but bookreading will make you an individualist!

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव पोस्टासमोर पुणे ३०

# टेक इट लाईटली

संजीव मंगरूळकर

## □ देव्हारे

वेळ दुपारची. अगदी भर उन्हाची. डोक्यावर रणरणतं ऊन–दुपारचा बाराचा सुमार असावा. उन्हाच्या माऱ्यानं पुर्ण निपचित पडलेलं. लक्ष्मीनारायण थिएटरसमोरचा परिसर मात्र अगदी माणसांच्या गर्दीनं फुलून गेला होता. अगदी या असल्या उन्हातसुद्धा माणसं अगदी एकमेकांना ढकलत, खेटून, शिव्याशाप देत–घेत रस्त्याच्या कडेला उभी होती. थिएटरच्या दारात तर माणसांचा एक आख्खा ढीग एकमेकांवर चढून उभा राहिला होता. गॉगल्स डोळ्यावर चढवून, हॅट्स् घालून, रुमालानं तोंड पुसत पुढे पुढे सरकू बघणारी उत्साही तरुण मंडळी, त्यांच्या उत्साहाला आवर घालण्यासाठी पोलिसांच्या दोन-तीन गाड्या थिएटरच्या परिसरात रिकाम्या केलेल्या होत्या. आणि पोलीस मंडळीही अगदी अग्रहक्काने पुढे येणाऱ्या लोकांना मागे ढकलून मागच्यांना पुढे आणण्याचा खेळ खेळत होती. कुणी रुबाबदार असामी उगीचच मधून जमलेल्या मंडळींना "पीछे हटो",चे आदेश देऊन जात होता.

तर अशी दीडदोन हजारांची प्रचंड गर्दी थिएटरबाहेर जमून राहिलेली. अमोल पालेकर नावाच्या एका त्यांच्या लाडक्या नटाला डोळे भरून आणि फुकटात पाहाण्यासाठी (फक्त) जमलेली. कुठल्याशा संस्थेच्या वतीने सादर होणारा एक चॅरिटी शो. त्याला पालेकर येणार अशी जाहिरात. आणि त्यासाठी अट्टाहासानं जमलेला उत्साही फॅन्सचा हा एक जथा. त्या दिवशी भर दुपारी पोलिसांना त्यांच्या उत्साहाशी निकराने लढावे लागले.

आणि अखेर गाडी आली. पालेकरांची गाडी आली. आला...आला...अशी प्रथम कुजबूज आणि मग एकच हाकाटी. इतका वेळ पोलिसांच्या शिस्तीला थोड्या फार सौजन्याने आणि सहानुभूतीने जुमानणारा मॉब आता मात्र पुरता उधळला. आणि विलक्षण झोंबाझोंबी सुरू झाली. आपल्या लाडक्या सिनेनटाला मंडळींनी घेराव घातला आणि त्याला ते पाहू लागले. अगदी मनसोक्त पाहू लागले. तो चालतो कसा रुबाबदार, त्याचे केस किती सुंदर, नाकही रेखीव, कपाळ रुंद, साधेपणा...तरी...किती...वगैरे वगैरे. पण एवढ्या दृश्य–समाधानावरही भागेना. मंडळींनी त्याच्याशी हस्तांदोलन करून पाहिलं, कुणी त्याच्याशी बोलून पाहिले. त्याचा आवाज ऐकला. अगदी जवळून आणि त्याला "हात लावून" पाहाण्यासाठी मंडळींची झुंबड उडाली. मागची मंडळी पुढच्यांवर ओणवी होऊन हवेत हात मारू लागली, कुठे तो सापडतो का ते अजमावू लागली. त्याच्या हाताच्या, शर्टच्या पुसटत्या स्पर्शासाठी आसुसलेल्या हातांचा एक उसळणारा जथाच त्याच्याभोवती नाचू लागला. कितीतरी घामट हातांचा नकोसा स्पर्श आणि घायाळ नजरांचा ससेमिरा चुकवीत अखेर त्यांचा आवडता नायक थिएटरमध्ये शिरला. आणि मग त्याच्या दर्शनाने डोळे आणि स्पर्शाने पुनीत झालेले हात घेऊन आणि थ्रिलिंग आणि धाडसी प्रसंगाच्या सुखद स्मृती मनांत घोळवीत नाइलाजानेच हळूहळू परत फिरू लागली. तेव्हा दुपार पुन्हा एकदा तापू लागली होती.

□ □

अशीच एक संध्याकाळ–बालगंधर्व रंगमंदिराच्या प्रवेशद्वारातली–तलत मेहमूदच्या गाण्याचा कार्यक्रम. त्याच्या चाहत्याची रंगमंदिरावर झुंबड उडालेली. नेहमीचं रंगमंदिरावर दिसणारं रंगीबेरंगी गर्दीचं सुवासिक चित्र. आणि अचानक तलत मेहमूदांची गाडी येते. पुन्हा एकदा तीच हाकाटी, धावपळ, झोंबाझोंबी, त्यांच्याभोवती गराडा घालणे, त्यांच्याशी हस्तांदोलन करणे, सहीसाठी चिठोरे पुढे करणे, त्यांना आपली फर्माईश देणे. हा प्रकार सगळा नेहमीचाच. अगदी न चुकता दरवेळी होणारा. पण एका रसिकाचे एवढ्याने समाधान होईना. पठ्ठ्याने जीव तोडून लोकांना मागे टाकले. तलतसमोर येऊन उभा ठाकला आणि सरळ लोटांगण घातले. त्याच्या या आक्रमक लोटांगणापुढे फॅन्सची गर्दीही क्षणकाळ थबकली. थिजल्यागत, तलत मेहमूदही अस्वस्थ. त्यांनी भारावून त्या रसिकाला उठवले. तो बाजूला झाला तेव्हा त्याच्या डोळ्यातले पाणी पाहून आसपासच्या सर्वच मंडळींनी त्याच्या मर्मज्ञ रसिकतेचे कौतुक केले. अगदी मनापासून. तलतजी रंगमंदिरात गेले आणि हळहळू रसिकांचा हा समूहही पांगू लागला.

□ □

ही आणखी कितीतरी उदाहरणं आहेत आमच्या श्रद्धेची. अगदी वेड्या भक्तीची. काही नाही तरी आम्ही भक्ती मात्र अगदी मनापासून करतो. आमचे देवही हे असे ठरलेले. प्रत्येक क्षेत्रात, प्रत्येक ठिकाणी असे देव शोधून काढायचे फक्त. मग आम्ही त्यांना आमच्या निष्ठा, इमान, बुद्धी अगदी इमानेइतबारे अर्पण करून मोकळे होतो. रोज हरघडी त्यांची पूजा बांधतो. त्यांचा उदोउदो करून सोडतो. वेड्यासारखे त्यांच्या मागे धावतो. सगळीकडे त्यांचंच अनुकरण करतो. या भक्तीला पर्याय नाही. देव फक्त बदलतील. कुणी अमोल पालेकर मानेल, कुणी तलत, कुणी रविशंकर तर कुणी महात्मा गांधीसुद्धा. प्रत्येक क्षेत्रात मानायचे देव वेगळे. आणि मग आमच्यावर कुणीही येऊन असं राज्य करू लागतं. कुणी रजनीश भल्याभल्यांना झपाटून टाकतो आणि आम्हीही अभिमानानं झपाटून मिरवतो. कुणी नेहरू आम्हाला असंच वेड लावतो. आम्ही पुन्हा त्याच्याही भजनी लागतो. त्याचे मनसोक्त गुणगान करतो. अगदी

त्याच्या गुलाबाच्या फुलाचंसुद्धा! काळ बदलतो. त्याबरोबर आमचा देवही. कुणी इंदिरा गांधी आम्हाला अशीच देवी सापडते. आम्ही मग तिच्या पायी सर्वस्व वाहून मोकळे होतो. तिच्या आवाजाचे कौतुक करतो. तिच्या तडफेचे, तिच्या चालण्याचे कौतुक करतो. तिच्या मुलाचे कौतुक करतो. आणि 'एकदा नेसलेली साडी ती पुन्हा नेसत नाही म्हणे,' याचेही कौतुकच! आम्ही कौतुक करायला सोकावलोच आहोत.

आता पुन्हा एकदा जमाना बदलला आहे. आमचे देवही बदलू घातले आहेत. 'अंधेरेमें एक प्रकाश–जयप्रकाश जयप्रकाश'चे नारे आम्ही आता देऊ लागलो आहोत. आता आम्ही जयप्रकाशांना वाहू लागलो आहोत. मग भले आम्हाला त्यांचे विचार माहीत नसोत. आम्ही आता त्यांना देव्हाऱ्यात बसवणार. त्यांच्या प्रकृतीच्या बातम्या रोज वाचणार, अमेरिकेतल्या त्यांच्या डॉक्टरचे कौतुक करणार. अमेरिकेत गेल्यावर त्यांना प्रथम इडली खावीशी वाटली आणि ती आमच्या पुणेकरांनी त्यांना पुरवली, याचेही कौतुक आम्ही करणार. पुणे ते सिॲटल असा इडलीचा रोमहर्षक प्रवास आम्ही वर्णन करणार. त्या प्रवासाच्या बातम्या अगदी पहिल्या पानावर छापणार. कारण आमच्या भक्तीला सीमा नाही. ती अशीच अखंड वाहत राहणार.

आम्ही कुणा पालेकरामागे धावतो याचे दुःख नाही, कुणा तलत मेहमूदचे आम्ही भर रस्त्यात पाय धरतो याचे दुःख नाही, कुणा नेहरू घराण्याचे आम्ही पोवाडे गातो याचे दुःख नाही किंवा आमचे देव असे बदलतात यांचेही दुःख नाही.

दुःख आहे ते फक्त आम्ही असे देव्हारे माजवतो याचे! कारण आम्ही खरं तर दुबळे आहोत...अगदी असहाय्य दुबळे!

खरं दुःख आहे ते आमच्या या दुबळेपणाचं आणि प्रश्न आहे तो एवढाच की, आम्ही नेहमी फक्त कुणाच्या तरी मागे असे असहाय्यपणे वाहतच जाणार की काय? या दिशाहीन वाहण्याला काहीच पर्याय नाही की काय?

□

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

२८।५।७७ ते ३।६।७७

### मेष : प्रभाव पडेल

आजच राशिस्वामी मंगळ राशीत येत आहे. उद्या शुक्र देखील राशीत येत आहे. दुसरा गुरू व रवी आहेत. ही ग्रहरचना म्हणजे तुमच्या आगामी कार्यकर्तृत्वाची पावतीच होय. यावेळी तुम्ही कोणतेही काम हाती घ्या, कोणतीही योजना आखा, यश तुमच्या पदरात पडल्याशिवाय राहणार नाही. नोकरी असो वा धंदा असो, प्रगतीकडे वाटचाल होईल. अनेक लाभ दृष्टिपथात येतील. जे घडणे अवघड आहे असे वाटत होते, तेच सहज घडून जाईल. आता तुम्ही पैशाची अजीबात काळजी करू नका. बचतीचे काम सोपे होईल. कोर्टकचेरीतील कामे सफल होतील. आरोग्य सुधारेल. शुभ दिनांक–२९–३१.

महिलांना : नोकरीत स्वतंत्र स्थान मिळेल.

विद्यार्थ्यांना : नवे ज्ञान पदरात पडेल.

### वृषभ : संमिश्र फल

रवी–गुरू राशीत तर शुक्र–मंगळ बारावे, असे हे ग्रहांचे चक्र आहे. परस्पर विरोधी ग्रहांचे जेव्हा प्राबल्य कुंडलीत उभे राहाते, तेव्हा सुवर्णमध्य स्वरूपाचा अनुभव येतो, तसाच यावेळी येईल. राजकीय वा धंद्याच्या क्षेत्रात तुमची पावले यशाचा कळस वाढवितील. ज्या योजना तुम्ही यापूर्वी आखल्या होत्या, त्याचे फळ यावेळी पदरात पडेल. धंद्यातील अडचणी दूर होतील व प्रगतीचा नवा टप्पा तुम्ही गाठू शकाल. त्याचबरोबर साधारण का होईना, खर्चाचे प्रमाण वाढणार आहे. अनपेक्षित खर्च उभा राहाणार आहे. मात्र पैशाची व्यवस्थाही होईल. नोकरीत समाधान राहील. अचानक प्रवास घडण्याची शक्यता आहे. अनेक दिवसांचे एखादे स्वप्न साकार होईल. अविवाहितांचे विवाह पार पडतील. शुभ दिनांक-३०, १.

महिलांना : नव्या व आवडत्या वस्तू खरेदी करता येतील.

विद्यार्थ्यांना : कलावंतांना प्रोत्साहन मिळेल.

### मिथुन : अडचणी नाहीत

बारावा रवी व गुरू याची तुम्ही मुळीच पर्वा करू नका. आजच मंगळासारखा समर्थ व पराक्रमी ग्रह अकरावा आला आहे. त्याप्रमाणे शुक्रदेखील उद्या त्याला भेटणार आहे. त्यामुळे सध्याच्या अडचणीचा बाऊ अजीबात करू नका. सोमवारनंतर तुमच्या अनेक अडचणींचा निरास होईल. प्रामुख्याने आर्थिक क्षेत्रातील घसरगुंडी थांबून तेथे नवे पर्व सुरू होईल. पैसा हवा तसा तुम्हाला मिळणार आहे. प्रयत्नांना यश येणार आहे. व्यापारात नवे साहस अवश्य करा. शेतीचे नवे काम हाती घ्या. रेस–लॉटरीतून देखील हाती काही रक्कम पडू शकेल. लेखक–प्रकाशकांना काळ चांगला आहे. नोकरीत स्थिरपणा येईल. वरिष्ठांची मर्जी राहील. बेकारीचा प्रश्न सुटेल. प्रवास घडेल, तब्येत सुधारेल. गाठीभेटी यशस्वी होतील. शुभ दिनांक–२८-३१.

महिलांना : नोकरीत बढती–प्रमोशन मिळेल.

विद्यार्थ्यांना : आवडती शाळा व शिक्षक मिळतील.

### कर्क : स्वप्ने साकार होतील

आजच दशमस्थानी येणारा स्वगृहीचा उच्चीचा मंगळ, उद्या येणारा शुक्र, तसे लाभस्थानी असलेले गुरू, रवी एवढी समर्थ ग्रहरचना तुमच्या पाठीशी असताना तुम्हाला काय हवे? आगामी काळातील तुमच्या उच्च महत्त्वाकांक्षेच्या सफलतेची ही ग्वाहीच होय. आणि ते सारं आता सफल होईल. नोकरीत तुमचे स्थान उंचावणार आहे. प्रतिष्ठा वाढणार आहे. तुमची भाषा इतरांना प्रभाव पाडणार आहे. तुमच्या हातून श्रेष्ठ दर्जाचे लेखन होणार आहे. तुम्ही कलावंत असाल तर, तुमची लोकप्रियता पराकोटीला पोचणार आहे. तपचा चाहता

वर्ग वाढणार आहे. सिनेकलाकार, चित्रकार व रंगभूमीचे नट या सर्वांनाच खूप पैसा मिळणार आहे. आजवर उराशी बाळगलेली स्वप्ने साकार झाल्याचा आनंद मिळणार आहे. शुभ दिनांक ३१, २.

**महिलांना :** फार छान हा काळ आहे. इच्छा-आकांक्षा सफल होतील.

**विद्यार्थ्यांना :** हुशारीचे कौतुक होणार आहे.

## सिंह : नोकरीत प्रमोशन

भाग्यात मंगळ, दशमस्थानी रवी अशी फार छान ग्रहांची स्थिती तुमच्या वाट्याला आलेली आहे. असे ग्रह असतात तेव्हा यशाचा व सामर्थ्याचा प्रत्यय येतो. यावेळी अनेक प्रकारे तुमचे नाव गाजणार आहे. तुमची उपेक्षा संपून प्रगतीचे नवे पर्व सुरू झाल्याचा प्रत्यय येणार आहे. चालू नोकरीत आजवर हुकलेल्या संधी अचानक पुन्हा मिळणार आहेत. प्रमोशन वा बढती असे काही तरी तुम्हाला मिळणार आहे. तुम्ही कोणत्याही नोकरीत असा, राजकारणात तुमचे मत ग्राह्य धरले जाईल. प्रतिष्ठा व पैसा असे दुहेरी यश यावेळी तुमच्या वाट्याला येणार आहे. बदली होऊ शकेल. मात्र ती प्रतिकूलच असे नाही. नोकरी संपुष्टात येणार आहे. शुभ दिनांक २९, ३१.

**महिलांना :** परिश्रमाचे चीज होईल. लाभ पदरात पडेल.

**विद्यार्थ्यांना :** शैक्षणिक इच्छा-आकांक्षा पुऱ्या होतील.

## कन्या : कष्ट पडणार आहेत

कन्या राशीच्या व्यक्तींना मूळातच कष्ट फार पडणार. बुद्धी चमकदार असते, पण कष्टाशिवाय कोणतेही काम होत नाही. यावेळी देखील त्याचा प्रत्यय येणार आहे. तुमचे एखादे महत्त्वाचे काम असेल तर कष्टाने होणार आहे. खूप धावपळ करून नंतर फळ तुमच्या पदरात पडणार आहे. भाग्यस्थानी गुरू व रवी आहेत. त्यामुळे प्रगतीला कुठेही खिळ बसणार नाही, याची खात्री बाळगा. नोकरीतील स्थिती समाधानकारक राहील. सहकारी कसेही वागले तरी, वरिष्ठांची मर्जी राहील. आर्थिक बाजू समाधान देईल. लेखनात थोडीफार प्रगती होईल. शारीरिक व मानसिक स्थिती फारशी चांगली नसली तरी, वाईटही असणार नाही. अनेक महत्त्वाच्या कामांना यश येईल. पत्रव्यवहार यशस्वी होईल. शुभ दिनांक. २८, २९.

**महिलांना :** धावपळीत व धांदलीत दिवस जातील.

**विद्यार्थ्यांना :** बुद्धीचा प्रभाव पडेल.

## तूळ : अडचणींवर मात

सातवा मंगळ, बारावा राहू व आठवा गुरू-रवी ही ग्रहरचना तशी काही फारशी उपकारक आहे, असे म्हणता यावयाचे नाही. गेले काही दिवस तुमची रास ही आघाडीवर होती. त्या वेळी ज्याप्रमाणे सर्वत्र उत्साहवर्धक प्रत्यय येत होता, तसा यावेळी येऊ शकणार नाही. तरी पण अडचणींवर तुम्ही मात करू शकाल. कारण शनी अनुकूल आहे. काही वेळा त्रासदायक अनुभव आला तरी, अखेरीस यश येईल. नोकरीच्या बाबतीत तसा वाईट अनुभव येणार नाही. आहे त्या परिस्थितीत ठीक चालेल. आर्थिक बाजू कमकुवत राहणार नसली तरी, पैसा कसा खर्च होतो हे कळणे फार कठीणच होणार आहे. रेस व लॉटरीत लाभ होऊ शकेल. कला-वादक या क्षेत्रांत कर्तबगारीला वाव मिळेल. तब्येत उत्साहाची राहील. शुभदिनांक ३०-२.

**महिलांना :** इच्छा-आकांक्षा सफल होत असल्याचा प्रत्यय येईल.

**विद्यार्थ्यांना :** मनासारखी शालेय सोय उपलब्ध होईल.

## वृश्चिक : प्रगतीची कमान

अकरावा राहू व तोही स्वगृहीचा ही एकच गोष्ट आज तुमचे कल्याण करायला पुरेशी आहे. राहू-केतू ही जोडी वाईट असते, असा समज मनातून काढून टाका. ते चांगल्या जागी असले तर, चांगले फळ देतात. यावेळी हा राहू तुमची आर्थिक बाजू बरीच बळकट करणार आहे. अनपेक्षित अर्थलाभ ही यावेळची खास बाब आहे. नोकरीत हितवर्धक घडेल. प्रमोशनचा योग आहे. वरिष्ठांची मर्जी राहील. बेकारांना नोकरी मिळेल. शेतीचा धंदा व्यवस्थित चालेल. प्लॉट अगर शेतीसाठी जमीन घेणे असेल तर, त्याला अनुकूल दिवस आहेत. सार्वजनिक कार्यात प्रतिष्ठा व कीर्ती मिळेल. तुमचे नाव चमकेल, गाजेल. बचतीची इच्छा पुरी होईल. अनेक बाजूंनी स्वप्ने पुरी होत असल्याचा प्रत्यय येईल. शुभ दिनांक २९-१.

**महिलांना :** प्रतिष्ठा व यश असा घरगुती व सार्वजनिक कामात प्रत्यय येईल.

**विद्यार्थ्यांना :** इच्छेप्रमाणे मोठे यश पदरात पडणार आहे.

## धनू : नोकरीत शुभ

राशिस्वामी गुरू सहावा तेवढासा अनुकूल नाही. पण एकंदरीत सध्या तुम्हाला कोणतेच ग्रह वाईट नाहीत. पाचवा मंगळ, दहावा राहू असे ग्रह आहेत. ते शुभ फळे देणार आहेत. मनातील शंकाकुशंका काढून टाका. अडचणींवर मात होईल. कोणत्याही क्षेत्रात तुम्हाला अडचणी जाणवत असल्या तरी, त्यातून तुम्ही यशस्वीपणे पार पडणार आहात. पैसा कमी पडणार नाही. गरजेपुरता पैसा नक्कीच मिळेल. कौटुंबिक व संसारातील अनेक समस्या मार्गी लागतील. मित्र वा सहकारी यांनी केलेल्या सहकार्यामुळे लाभ होईल. नोकरीच्या बाबतीत एकूण वातावरण बरेच अनुकूल राहील. वरिष्ठांबरोबर चांगले संबंध जुळून येतील. धंद्याच्या क्षेत्रात पाऊल प्रगतीचे पडेल. नव्या योजना साकार होतील. तब्येत उत्साहवर्धक राहील. शुभ दिनांक ३१-२.

**महिलांना :** अनेक प्रकारच्या अडचणींतून मार्ग निघेल.

**विद्यार्थ्यांना :** प्रगतीचे नवे पर्व सुरू होईल.

## मकर : प्रगतीची नवी दिशा

गेले अनेक दिवस तुम्ही अडचणीतून प्रवास करीत आहात. धंदा, नोकरी, इतर व्यावसायिक क्षेत्रे या सर्वच बाबतीत रखडणे चालू होते. आता तुम्ही बाहेर पडणार आहात. राहू, गुरू, मंगळ असे अनेक ग्रह सहकार्य देण्यास अनुकूल आहेत. त्यामुळे अनेकांचे सहकार्य मिळेल. अपेक्षित व्यक्तीकडून काम होईल. उद्योगास भांडवलाची उभारणी होईल. नव्या धंद्याची सुरुवात करू शकाल. धंद्यांत आकर्षक व लाभदायक योजना अमलात आणू शकाल. स्वतंत्र असे व्यावहारिक नवे क्षेत्र धुंडाळणारास यश येईल. आर्थिक बाजू आटोक्यात राहील. नोकरीची परिस्थिती समाधानकारक राहील. बेकारांना नोकरी मिळू शकेल. सरकारी नोकरीस असणारांनी चुका टाळाव्यात. शुभ दिनांक २९-३१.

महिलांना : शारीरिक अडचणी निवारण होतील.

विद्यार्थ्यांना : निराशपणाला आशेचा किरण दिसेल.

**कुंभ : कर्तबगारीचा गौरव**

कुंभराशीच्या व्यक्तींना मध्यंतरी खूपच चढउताराच्या परिस्थितीतून जावे लागले आहे, परंतु वाईट काळ फार दिवस बसून राहात नाही, यांचा प्रत्यय याच आठवड्यात तुम्हास येऊ लागेल. तिसरा मंगळ, चौथा गुरू, रवी हे ग्रह उपकारक आहेत. मनाची स्थती शंकेने भरलेली राहिली तरी रोजच्या कामात अगर नव्या योजनात त्यामुळे कोणताही अडथळा निर्माण होणार नाही. एकूण परिस्थिती सुधारणेची राहील. राजकीय कर्तृत्व व नोकरीव्यवसाय यात तुमची जिद्द व हुषारी प्रभाव पाडून जाईल. बढती–प्रमोशन असे काही तरी होईल. चालू नोकरीत बदल करायला हा सप्ताह अनुकूल आहे. बदलीचे प्रयत्न सफल होऊ शकतील. वरिष्ठांच्या मर्जीचा प्रत्यय येईल. घरचे वातावरण समाधानकारक राहील. शुभ दिनांक २९–३१.

महिलांना : बरेच हितकारक असे बदल राहतील.

विद्यार्थ्यांना : नवे पर्व उत्साह निर्माण करील.

**मीन : यश मिळेल**

राशिस्वामी गुरू रवीबरोबर तिसरा व मंगळ स्वग्रही दुसरा आहे. हे ग्रह सध्या तुमच्यावर फार खूष आहेत. तुम्ही आजवर मनाशी ठरवलेले बेत यावेळी पार पडणार आहेत. व्यवसाय व सार्वजनिक कार्य याबाबतीत प्रतिष्ठा मिळून तुमचा प्रभाव वाढणार आहे. उत्साहाचा नवा काळ सुरू होणार आहे. तुम्ही जर लेखक, पत्रकार, अध्यात्मवादी असाल तर तुम्हाला चांगला अनुभव येणार आहे. तुमचा गौरव होणार आहे. सरकारातील एखाद्या उच्चपदस्थ व्यक्तीबरोबर नवे संबंध प्रस्थापित होतील. व्यवसायांत नवे पर्व सुरू होणार आहे. नोकरीत तुम्हाला तुमच्या कामाचे योग्य श्रेय मिळणार आहे. बेकारांना हा आठवडा आशादायक आहे. व्यवसाय अगर नोकरी यापैकी काही तरी होईल. एकूण सारे वातावरण उत्साहाचे राहील. शुभ दिनांक १, २.

महिलांना : संसारातील आशा सफल होतील.

विद्यार्थ्यांना : अभ्यासाची नवी दिशा दिसेल.

□

## महाराष्ट्र काँग्रेस शिबिर : पृष्ठ ४ वरून

का, असा प्रश्न त्यांच्याच विधानांच्या आधारे निर्माण होतो.

□

मंत्र्यानेच मुख्यमंत्र्यांनी बनवलेल्या मंत्रिमंडळाविरुद्ध व पक्षाच्या कार्यपद्धतीविरुद्ध टीका केली. त्यातून काँग्रेस पक्षात एकसंधपणा किती राहिला आहे, याची कल्पना येते. त्यापेक्षाही कार्यकर्त्यांनी केलेल्या टीकेच्या प्रहाराने महाराष्ट्र काँग्रेसवर विदारक प्रकाश पडला आहे. महाराष्ट्रातील पराभवाला शंकरराव चव्हाण यांचे नेतृत्व कारणीभूत आहे असे सांगून त्यांना बाजूला केले. शिबिरात त्यांच्यावर टीका झाली तरी वसंतदादा पाटील व ज्यांच्यापुढे दादा मान तुकवू लागले आहेत अशा वसंतराव नाईक यांच्यावर टीकेचा रोख होता. दादांच्या मंत्रिमंडळाचा विस्तार पाहिल्यावर २५ टक्के मंत्र्यांना त्यांनी रिकामे करावे व पक्षकार्यासाठी त्यांना काम करू द्यावे. १९६३ साली मंत्र्यांना कामराज योजना लागू केली तशी महाराष्ट्राच्या मंत्र्यांना लागू करावी. सध्याच्या मंत्रिमंडळात जे चेहरे आहेत, त्या ठोकळ्यांशिवाय दुसरे चेहरे तुम्हाला दिसतच नाहीत काय? ज्यांना मंत्री केलं आहे त्यांचे स्वरूप काय आहे? त्यातील काही भ्रष्ट मंत्री आहेत. चारित्र्याने स्वच्छ नाहीत. रम-रमा-रमी यातच तज्ज्ञ आहेत, अशांना मंत्रिमंडळात घेतले आहे, अशी टीका अनेक कार्यकर्त्यांनी केली. श्री. तुषार पवार व श्री. पां. ना. राजभोज यांची भाषणे काँग्रेसचे खरे अंतरंग दाखवून देणारी होती. 'यशवंतराव, तुम्हाला मंत्रिपद हवे, तुम्हाला विरोधी पक्षनेतेपद हवे. सत्तेचा त्याग तुम्ही करणार नाही. तुम्हाला मात्र सत्ता हवी आणि इतरांना सेवा करायला सांगता?' असे श्री. राजभोज यांनी यशवंतरावांच्या तोंडावर सांगितले. व्यासपीठावर बसलेल्या एका सरचिटणीसाकडे हात करून श्री. राजभोज म्हणाले, 'आता यांचेच पाहा, यांना सरचिटणीस केलं आहे. काय यांची लायकी आहे? यांचा अभ्यास आहे, का त्याग–सेवा आहे? त्याग, सेवा, कार्य यांचा विचार न करता चमचेगिरी करणारांना पक्षात वाव दिला जातो!'

'भ्रष्ट लोकांना मंत्रिमंडळात स्थान राहता कामा नये. भ्रष्टाचारी लोक तुमच्या मंत्रिमंडळात आहेत आणि हे लोक आहेत तोपर्यंत तुम्ही समाजवादी नाही. शोषण करणारांविरुद्ध उभे राहिले पाहिजे. आपण समाजवादी असू तर, हितसंबंधितांविरुद्ध संघर्ष केला पाहिजे. या संघर्षाशिवाय गरिबी हटणार नाही.' असे श्री. तुषार पवार म्हणाले. शंकरराव चव्हाण यांनी हा पवित्रा घेताच त्यांची काय वाट लावली गेली, हे तुषार पवार विसरलेले दिसतात. बड्या जमीनदारांची जादा जमीन ताब्यात घेण्याचे, तिचे वाटप करण्याचे काम सुरू केले, ऐपत असूनही कर्जाची परतफेड न करणारांकडून सक्तीने वसुली सुरू केली, हा हितसंबंधितांविरुद्धच्या संघर्षाचाच भाग नव्हता काय? या संघर्षाची सुरुवात होताच काँग्रेसजन कसे एक झाले? त्यामुळे सध्याची काँग्रेस शोषण करणाराविरुद्ध उभी राहणारी आहे की, शोषणमुक्ती-शोषणमुक्तीचा जप करत हितसंबंधितांच्या हिताची जपणूक करणारांची आहे, याचा विचार पवार-मोहिते आदी मार्क्सवादी तत्त्वज्ञान हे ज्यांच्या वैयक्तिक बैठकीचा आधार आहे त्यांनी करावा. जनसंघाची वैचारिक बैठक जैसे थे वादी होती म्हणणाऱ्यांनी जैसे थे वादी महाराष्ट्र काँग्रेसमध्ये सत्तास्थानी बसलेले नाहीत काय, याचा विचार अवश्य करावा? परस्परविरोधी विचारांची जपणूक करणारांचा काँग्रेस हा कुंभमेळा नाही काय? हे शोषण करणारांविरुद्ध संघर्ष छेडला पाहिजे, असे म्हणणारांनी शोधले पाहिजे.

□

नेतृत्वाविरुद्ध कार्यकर्ते शिबिरात टीकेची झोड उठवत होते, तर वरिष्ठ नेते एकमेकांना टांग मारण्याचे राजकारण खेळत होते. माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी यशवंतराव चव्हाण यांनाच अडचणीत आणले. 'यशवंतराव लोकसभेत विरोधी पक्षाचे नेते आहेत. द्विपक्षीय पद्धतीमध्ये शॅडो कॅबिनेट असते. तेथे विरोधी पक्षाचा नेता पुढचा पंतप्रधान असतो. पुढचा पंतप्रधान महाराष्ट्राचाच झाला पाहिजे. त्यासाठी पडेल तो त्याग करण्याची तयारी ठेवली पाहिजे,' असे वसंतराव नाईक म्हणाले. नाइकांच्या या विधानामुळेच यशवंतराव चव्हाण यांना पुन्हा भाषण करावे लागले. 'पुढचा पंतप्रधान होण्यासाठी मी विरोधी पक्षाचा नेता झालेलो नाही. मला अकारण शत्रू निर्माण करू नका,' असे यशवंतरावांना सांगावे लागले. परमेश्वरा, मला माझ्या मित्रांपासून वाचव, असा म्हणण्याचा प्रसंग यशवंतरावांवर नाइकांनी आणला. आज यशवंतराव पुढचे पंतप्रधान म्हणून प्रचार झाला की, काँग्रेसमधील त्यांच्याविरुद्ध असलेली नेतेमंडळी यशवंतरावांना काटशह देतील व अखिल भारतीय राज-

कारणात आपले घोडे महाराष्ट्राचा नेता म्हणून पुढे दामटण्याचा डाव वसंतराव नाईक खेळले आहेत, त्यासाठी त्यांनी ही घोषणा केली, असा अर्थ लावला जात आहे.

□

महाराष्ट्र काँग्रेसच्या शिबिरात ही जी चर्चा झाली, तिचे पडसाद जिल्हा पातळीवर उमटले की, पक्ष ऐक्य, पक्षाची मजबुती व पुनर्बांधनी कशी होणार हा प्रश्नच आहे. राज्यपातळीवर शिबिर घेतले तशीच शिबिरे जिल्हा पातळीवर घेण्याचा काँग्रेसचा कार्यक्रम आहे. जिल्हा पातळीवर शिबिरे घेतली की, असेच विचार त्या शिबिरात मांडले जातील. त्यावेळी कार्यकर्ते परस्परविरोधी विचार, आरोप-प्रत्यारोप ऐकून घेतील की, कडवटपणा अधिकच वाढेल? शत्रुत्व कायम राहील, ही भीती असल्यामुळे जिल्हा पातळीवरील शिबिरे भरण्याची शक्यताच कमी वाटते. काँग्रेसमधून बाहेर पडण्याची प्रक्रिया थांबवावी, काँग्रेसत्यागाची लाट थोपवावी या हेतूने महाराष्ट्र काँग्रेसचे शिबिर घेण्यात आले. शिबिरात त्यावर भर देण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु त्याला फारसे यश येईल असे वाटत नाही. मेअखेर किंवा जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत काही आमदार, त्यांच्याबरोबर असलेले कार्यकर्ते, जिल्हा परिषदेचे सदस्य काँग्रेस पक्ष सोडू लागतील. उत्तर भारतात विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला की, महाराष्ट्रातही काँग्रेसत्याग करण्याचे प्रमाण वाढत जाईल. काँग्रेसच्या हातात सत्ता राहात नाही असे होईल तेव्हा काँग्रेसला चिकटून राहण्याची निष्ठा आजच्या काँग्रेस कार्यकर्त्यांत आहे असे म्हणणे धाडसाचे होईल! मग काही कार्यकर्ते जनता पक्षात जातील, काही नेत्यांसह सो. का. पक्षात जातील अथवा काँग्रेसमधील मोठा गट, पर्यायी काँग्रेस म्हणा अथवा दुसरा नवा पक्ष काढतील. **पण काँग्रेस आता फुटीपासून वाचत नाही, हे नक्की!** या निमित्ताने १९६२ च्या निवडणुकीतील काँग्रेस-प्रचारासाठी काँग्रेसचे घरचे कवी श्री. ग. दि. माडगूळकर यांनी लिहिलेल्या गाण्याची आठवण होते. संयुक्त महाराष्ट्र समितीला उद्देशून त्यांनी,

'डोंग्या खोकला झाला ग बाई । आता काय पोरगी वाचत नाही
डॉक्टर लोहिया आलेच नाही । आता काय पोरगी वाचत नाही'

असे गाणे 'रचले' होते. त्यात थोडा बदल करून 'फुटीपासून काँग्रेस आता काही वाचत नाही' असे म्हटले पाहिजे. □

# शहादे आंदोलन : नवा टप्पा

चार वर्षांपूर्वी धुळे जिल्ह्यातील शहादे-तळोदे या आदिवासी भागात स्व. अंबरसिंग यांच्या नेतृत्वाखाली भूमुक्ती आंदोलन सुरू झाले व अनेक तरूण कार्यकर्त्यांनी त्यात स्वतःला झोकून घेतल्यामुळे भूमुक्ती बरोबरच किमान वेतन, रोजगार हमी इत्यादी या भागातील गरीब आदिवासी जनतेचे महत्त्वाचे प्रश्न खूपच धसाला लागले.

आता भरपूर पाऊस पडणाऱ्या या भागात चार महिने पिण्याच्या पाण्याचेही दुर्भिक्ष असावे, शेतीयोग्य जमीन असूनही गरीब शेतकऱ्याला सुरक्षित पाणी पुरवठा न होऊ शकल्याने ती पडीक राहावी किंवा तिच्यातून अगदी जुजबी उत्पन्न निघावे, या वस्तुस्थितीकडे कार्यकर्त्यांनी लक्ष पुरवण्याचे ठरवले आहे व त्यादृष्टीने येत्या २९ मे ला खाली दिलेल्या ठिकाणी एक 'पाणी पुरवठा परिषद' आयोजित केलेली आहे. तज्ज्ञांच्या मते, अगदी कमी खर्चात या डोंगराळ भागात छोटी छोटी धरणे बांधून पाणी पुरवठ्याचा प्रश्न या भागापुरता सुलभतेने सोडवता येईल व त्यामुळे या भागातील बहुसंख्य गरीब आदिवासी जनतेच्या जीवनमानात खूपच सुधारणा घडू शकेल. तरी सर्वांनी या परिषदेला उपस्थित राहून व अन्य तऱ्हेने सक्रिय साहाय्य करून भूमुक्ती परिषदेप्रमाणेच ती यशस्वी करावी ही विनंती आहे.

आपले : **छायाताई अंबरसिंग सुरतवंती, गणपत भिल्ल, भुरीबाई, डॉ. डोईफोडे, प्रभाकर बिरारी, भाऊ मुंदडा, गोविंदराव शिंदे**

**परिषदेची जागा :** शहादे-दरा रस्त्यावरील शहाद्यापासून सुमारे दहा मैलांवर असलेले 'आमोदा' हे गाव.

**दिवस व वेळ :** रविवार दि. २९ मे १९७७ रोजी दुपारी दोन वाजता.

**प्रमुख पाहुणे : एस. एम. जोशी**

**ग्राम-स्वराज्य समिती । सर्वोदय छापखाना । मु. पो. शहादे, (जि. धुळे)**